भरत प्रणीत

# नाट्य मण्डप

२७५
१
प्र/२७५/१

डॉ. र. पु. कुलकर्णी



'चित्रकर्मणि चालेख्याः ..... चरितं चात्मभोगजम्'

महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई.

भरतमुनिप्रणीत

म. रा. सा. सं. मं. ग्रंथालय
प्र 205/1
ग्रंथालय

# नाट्यमंडप

[ टीपा, आकृत्या व विस्तृत प्रस्तावनेसह ]

डॉ. रघुनाथ पुरुषोत्तम कुलकर्णी
बी. ई. (स्थापत्य), एम्. टेक्. ( मृद्यांत्रिकी व आधारभूमी स्थापत्य )
पीएच्. डी. ( स्थापत्य )

महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई

प्रथमावृत्ती : जुलै १९८५

© प्रकाशकाधीन

प्रकाशक :
श्री. सू. द्वा. देशमुख,
सचिव,
महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

मुद्रक :
श्री. ग. दीक्षित,
व्यवस्थापक,
दी प्राज्ञ प्रेस,
३१५ गंगापुरी,
वाई-४१२ ८०३ (जिल्हा सातारा)

किंमत रुपये १५

# प्रस्तावना

गेल्या काही शतकांत श्री. भरतमुनी यांचे नाव पंडितजनात माहीत आहे ते रससिद्धांताचा कर्ता म्हणून मम्मट, विश्वनाथ, क्षेमेन्द्र, आनंदवर्धन, अभिनवगुप्त, पंडितराज जगन्नाथ, अप्पय दीक्षित यांनी तर रससिद्धांतासंबंधी भरताचे ऋण मानलेच आहे. हीच परंपरा आधुनिक मराठी पंडितांनी पुढे चालविली. भरताने केवळ एवढेच केले असा समज होण्याचे कारण भरताचे नाटयशास्त्र कुणी वाचतच नसत. ते आणि त्यावरील अभिनवभारती हा टीकाग्रंथ कालप्रवाहात कुठेतरी लुप्त झाले होते. पुढे सुदैवाने नाटयशास्त्राच्या हस्तलिखित प्रती २० व्या शतकाच्या सुरुवातीला कुठेतरी सापडल्या आणि निर्णयसागर, चौखंबा इत्यादींनी त्या मुद्रण करून प्रकाशात आणल्या. पुढे श्री. रामकृष्ण कवी यांच्या संशोधनामुळे नाटयशास्त्रावरील अभिनवभारती हा टीकाग्रंथही उपलब्ध झाला आणि नाटयशास्त्र आणि अभिनवभारती अशी एक प्रत बडोदा ओरिएण्टल सीरिजने प्रकाशित पण केली. पं. सीताराम शास्त्री यांनी या प्रतीचे मूळ संपादन केले आणि कै. पदेशास्त्री यांनी दुसऱ्या आवृत्तीकरिता तिचे संपादन केले. कदाचित अनेक वर्षे लुप्त झाल्यामुळे असेल, पण संस्कृत आणि मराठी पंडितांनी भरताच्या नाटयशास्त्रातील संकल्पनांचा अभ्यास मम्मट, विश्वनाथांना "वाट पुसतच" केला. आणि त्यामुळे भरताच्या मूळ नाटयशास्त्रावर कधी हवा तसा प्रकाश पडलाच नाही. रस म्हणजे आस्वाद, रस म्हणजे आनंद या कल्पनेच्या आहारी आम्ही इतके गेलो की, नाटयशास्त्रात सांगितलेल्या निरनिराळया रस, भाव, सिद्धी आदि संकल्पना, तसेच दशरूपकाच्या नावाखाली केलेले नाटक–प्रकार–विवेचन आणि नृत्याकरिता आवश्यक असलेल्या नाटयधर्मी मुद्रा इत्यादिकांच्याकडे आमचे दुर्लक्षच झाले. नाटयशास्त्र हे प्रयोगशील नाटकाचे Performing art चे तंत्र सांगणारे शास्त्र आहे याचा आम्हाला विसर पडला. श्रीमती गोदावरीबाई केतकर यांनी आपला प्रबंध नाटयशास्त्रावर लिहून एक मोलाची कामगिरी केली होती. पण त्याकडेही आम्ही दुर्लक्ष केले. जादुगाराचा जादूचा प्रयोग पाहताना त्यात आपण तल्लीन व्हावे आणि तेवढयात आपल्या नाकावर एखादी माशी बसावी म्हणजे जादुगाराच्या इच्छाशक्तीखाली वाहणारा आपला संज्ञाप्रवाह क्षणभर तुटतो पण लगेच जादुगाराच्या वर्चस्वाखाली आपण येतो. असेच काहीसे मम्मट–विश्वनाथाच्या साहित्यशास्त्रातील वर्चस्वामुळे आमच्यात घडले असावे. भरताचे मूळ नाटयशास्त्र हे नाटकप्रयोगाचे शास्त्र आहे हे आम्ही साफ विसरलो. "तस्मात् प्रयोगः सर्वोऽयं सिद्धयर्थं संप्रदर्शितः" इत्यादी वचनांकडे आम्ही साफ

दुर्लक्ष केले. भरताच्या नाट्यशास्त्रात नाट्यमंडप कसे उभारावेत याचेही वर्णन आहे. प्रयोगशील नाटक करण्याची आमची परंपरा खंडित झाल्यामुळे नाट्यमंडपाकरिता निरनिराळे जे तांत्रिक शब्द वापरण्यात आले त्याही बाबतीत आम्ही अज्ञानीच राहिलो आणि त्यातून भरताने सांगितलेली नाट्यमंडपाची मोजमापविषयक भाषाही आम्हांला कळेनाशी झाली. भाषा प्रचारात न राहिली तर ती दुर्बोध होते आणि हळूहळू वाक्प्रचारही बदलतात. यामुळेही हे घडले असेल. पण याचे खरे कारण आमचे सारे लक्ष काव्यशास्त्रावर केंद्रित झाले होते, प्रयोगशील नाटकाचा ऱ्हास होत चालला होता आणि रस म्हणजे आनंद ही गोष्ट आमच्या मनात पक्की ठसली होती हे होय. भरताने काव्यशास्त्रविषयक संकल्पनांचा ऊहापोह केला नाही असे नाही; पण त्याने तो तेवढाच केला की जेवढा प्रयोगशील नाटकाला आवश्यक होता. वास्तविक मुळात प्रयोगशील नाटकाची म्हणजे नाट्यशास्त्राची परंपरा आणि काव्यशास्त्राची परंपरा वेगळी आढळते. या नाट्यशास्त्राच्या परंपरेत भरत, भट्टलोल्लट, शंकुक, भट्टनायक इत्यादी लोक आढळतात तर काव्यशास्त्राच्या परंपरेत भामह, वामन इत्यादी लोक आढळतात. दंडीने कदाचित या दोन परंपरांत संवाद साधण्याचा प्रयत्न केला असेल. कारण त्याने " रतिः शृंगारतां गता " इत्यादी वाक्ये घालून रसचर्चाही केली आहे. पण नाट्यनिर्मितीचे मूळ शास्त्र जे नाट्यशास्त्र– जे नाटककार, सूत्रधार नट आणि प्रेक्षक यांच्यात संवाद साधते– त्याचे नाटकाचे प्रयोग होण्याचे बंद झाल्याबरोबर प्रयोजनच उरत नाही आणि निर्मितिप्रक्रिया व आस्वादप्रक्रिया ह्या ज्या दोन प्रक्रिया भरताने सांगितल्या त्याऐवजी फक्त आस्वादप्रक्रिया तेवढी शिल्लक उरते. काव्यशास्त्रकारांनी नाट्यशास्त्राचे काव्यशास्त्रात रूपांतर करताना असा अन्याय नाट्यशास्त्रकार भरत यांच्यावर केलेला आहे. प्रयोगशील नाटकातील संकल्पना काव्याला लावण्यात आल्या याचा एक पुरावा आपणास रुद्रभटाच्या शृंगारतिलकात मिळतो.

" प्रायोनाट्यं प्रतिप्रोक्ता भरताद्यैः रसस्थितिः ॥
यथामतिर्मयाप्येषा काव्यं प्रति निगद्यते ॥"

नाट्यशास्त्राचे काव्यशास्त्रात कसे रूपांतर होत गेले आणि नाट्यशास्त्रातील संकल्पना काव्यशास्त्राला कशा लावण्यात आल्या यांचे ऐतिहासिक दृष्टिकोनातून कै. दि. के. बेडेकर यांनी आणि ज्ञानशास्त्रीय दृष्टिकोनातून मी विवेचन केले आहे. हे सर्व १९५० च्या सुमाराला घडले. आम्ही हा जो आवाज फोडला तो परंपरेत पुन्हा विरूनच गेला. पण हळूहळू नाट्यशास्त्रातील संकल्पनांचे पुनरुज्जीवन होत आहे ही आनंदाची गोष्ट आहे. डॉ. कुलकर्णी

यांनी " नाटयमंडप " या शीर्षकाखाली केलेल्या भरताच्या नाटयशास्त्रातील दुसऱ्या अध्यायाचे भाषांतर या दृष्टीने महत्त्वाचे आहे. डॉ. कुलकर्णी हे स्थापत्यशास्त्रज्ञ आहेत. त्यांची डॉक्टरेट ही स्थापत्यशास्त्रातच आहे आणि त्यांचा संस्कृतचा व्यासंगही फार मोठा आहे. त्यांनी नाटयशास्त्राच्या दुसऱ्या अध्यायाचे भाषांतर तर केलेच आहे, पण त्याला अनेक परिशिष्टे पण जोडली आहेत. त्यांत दिलेली माहिती ही जायसेनापती, संगीत चंद्र, विप्रदास नारद इत्यादी लेखकांची आणि नृत्तरत्नावली, भावप्रकाश, संगीत मकरंद, विश्वकर्म वास्तूशास्त्र, शिल्परत्न, विष्णुधर्मोत्तर पुराण इत्यादिकांतील असल्यामुळे प्राचीन काळात नाटयमंडप उभारण्याकरिता आमच्याकडे तंत्र-विशारदांनी काय काय लिहून ठेवले होते यावरही प्रकाश पडतो. शिवाय डॉ. कुलकर्णी यांनी या भाषांतराला ८० पानांची अभ्यासपूर्ण प्रस्तावना पण लिहिली आहे. त्यात भरताच्या मनात तीन प्रकारचे नाटयमंडप कसे होते, हे आकृती-सहित विशद केलेले आहे. या त्यांच्या अभ्यासपूर्ण प्रस्तावनेवरून भरतमुनींच्या काळी नाटयमंडप बांधण्याचे शास्त्र बरेच प्रगत झाले होते असे दिसते. नाटय-मंडपाचे प्रेक्षकगृह, रंगपीठ यांच्यात विभागणी कशी करावी, या विभागांची मापे काय असावीत, ज्येष्ठ, मध्यम व कनिष्ठ मंडप असले तर या मापांत काय फरक पडेल, खांबांची रचना, दरवाज्यांच्या जागा इ. कुठे कुठे असाव्यात यांच्याबद्दलची माहिती दिली आहे. उदाहरणार्थ, नाटयमंडपाची लांबी २५ मीटरपेक्षा जास्त असू नये याचे कारण देताना भरतमुनी म्हणतात, ' नाहीतर लांब असलेल्या प्रेक्षकांना नटांच्या चेहऱ्यावरील हावभाव स्पष्ट दिसणार नाहीत तसेच नटांना आपला आवाज सर्वत्र ऐकू येण्यासाठी ओरडावे लागेल. तसेच प्रतिध्वनीदेखील निर्माण होऊन स्वरोच्चारातील माधुर्य नाहीसे होईल.' भरतांनी नाटयमंडपाची उभारणी करताना किती खोलवर विचार केला होता, हे यावरून दिसते. भरतांनी नाटयमंडपाचे वर्णन करताना मत्तवारिणी, षड्-दारुक इत्यादी शिल्पविषयक तांत्रिक शब्दांचा उपयोग केला आहे. तसेच नाटय-मंडपाची विभागणी करताना रंगपीठ व रंगशीर्षक असे शब्द वापरले आहेत. या शब्दांच्या अर्थाबद्दल आणि नाटयमंडपाची एकंदर विभागणी काय असेल याबद्दल विद्वानांत मतभेद आहेत. डॉ. कुलकर्णी यांनी या सर्व मतामतांची दखल घेतली आहे. विशेषतः या शिल्पशास्त्रविषयक शब्दांचा अर्थ लावताना त्यांनी शिल्पशास्त्रावरील जुनी संस्कृत पुस्तके अभ्यासूनच तांत्रिक वैज्ञानिक शब्दांचा अर्थ निश्चित केला ही अत्यंत अभिनंदनीय अशी गोष्ट आहे.

साहित्य संस्कृती मंडळाकडून डॉ. कुलकर्णी यांचा हा महत्त्वाचा व संशो-धनपर ग्रंथ प्रसिद्ध होत आहे, ही अभिमानाची गोष्ट आहे.

**सुरेन्द्र बारलिंगे**

## दोन शब्द

भरताच्या नाट्यशास्त्रावरील प्रसिद्ध ग्रंथाच्या दुसऱ्या अध्यायात नाट्यमंडपाचे सूक्ष्म वर्णन दिले आहे. या अध्यायात आलेल्या अनेक शिल्पशास्त्रविषयक शब्दांचें अर्थ लेखकाने आतापर्यंतच्या नाट्यशास्त्राच्या टीकाकारांपेक्षा वेगळे दिले आहेत. इतर टीकाकारांनी दिलेले अर्थही उद्धृत केले आहेत. प्रामुख्याने शिल्पशास्त्राच्या निरनिराळ्या ग्रंथांचा आधार घेऊन या शब्दांचा अर्थ देण्याचा प्रयत्न केला आहे.

नाट्यमंडपाची ही व इतर माहिती प्रास्ताविकात देऊन नंतर दुसऱ्या अध्यायाचे मूळ संस्कृत श्लोक व त्यांचे मराठी भाषांतर दिले आहे.

परिशिष्टांमध्ये पहिल्या परिशिष्टात मध्ययुगकालीन निरनिराळ्या नाट्यविषयक व काव्यविषयक ग्रंथांत असलेले नाट्यमंडपाबद्दल माहिती देणारे उतारे दिले आहेत. दुसऱ्या परिशिष्टात शिल्पशास्त्राच्या ग्रंथांत व पुराणग्रंथांतही नाट्यमंडपाबद्दल जी माहिती आली आहे, त्यांचे उतारे दिले आहेत.

हे पुस्तक लिहिताना लागणारी निरनिराळी पुस्तके, मुंबई येथील भारतीय विद्याभवनच्या ग्रंथालयाचे प्रमुख ग्रंथपाल डॉ. पंड्या यांनी पुरविलीत त्याबद्दल लेखक त्यांचा आभारी आहे.

पर्सि ब्राउन यांच्या " Indian Architecture " या पुस्तकातील चैत्यगृहाच्या दोन आकृत्या (काही फेरफाराने) छापावयास परवानगी दिल्याबद्दल त्या पुस्तकाचे प्रकाशक मे. डी. बी. तारापोरवाला सन्स अँन्ड कं. प्रा. लि., मुंबई, यांचाही लेखक आभारी आहे.

महाशिवरात्र,
२९–२–१९८४

र. पु. कुलकर्णी

सर्वशास्त्रार्थसंपन्नं सर्वशिल्पप्रवर्तकम् ।
नाट्याख्यं पञ्चमं वेदं सेतिहासं करोम्यहम् ॥
भा. ना. १.१५ ॥

जग्राह पाठ्यं ऋग्वेदात् सामभ्यो गीतमेव च ।
यजुर्वेदादभिनयान् रसानाथर्वणादपि ॥
भा. ना. १.१७ ॥

सौ. राजलक्ष्मीस

# अनुक्रमणिका


| विषय | पृष्ठ |
|---|---|
| **प्रास्ताविक** | एक |
| भरतमुनींच्या पूर्वी नाट्यशास्त्राची प्रगती | दोन-पाच |
| भरतमुनींच्या नाट्यमंडपावर भाष्य करणारे टीकाकार | पाच-सहा |
| भरतमुनींच्या नाट्यशास्त्रातील नाट्यमंडप | सहा-नऊ |
| नाट्यमंडपाचा आकार व मापे | नऊ-वीस |
| जमिनीची परीक्षा | वीस-सव्वीस |
| नाट्यमंडपाचे विभाग | सव्वीस-एकोणचाळीस |
| मत्तवारणी | एकोणचाळीस-अठ्ठेचाळीस |
| षड्दारुक | अठ्ठेचाळीस-बावन |
| रंगपीठाची प्रेक्षकगृहाच्या पीठापासून उंची | त्रेपन |
| रंगशीर्ष | चोपन-छप्पन |
| नाट्यमंडपाची ध्वनिशास्त्रदृष्ट्या उभारणी | छप्पन-सत्तावन |
| द्वारवेध | सत्तावन-अठ्ठावन |
| दोन मजली (द्विभूमिः) नाट्यगृह | अठ्ठावन-एकसष्ट |
| चौरस नाट्यमंडप | एकसष्ट-पासष्ट |
| नाट्यमंडपातील खांबांची मांडणी | पासष्ट-एकाहत्तर |
| नाट्यमंडपातील दरवाजांची संख्या व स्थान | एकाहत्तर-पंचाहत्तर |
| प्रेक्षकांची बैठक | पंचाहत्तर-सत्याहत्तर |
| वेदिकेसारखे रंगपीठ | सत्याहत्तर |
| समुन्नत व समतल रंगशीर्ष | अठ्ठ्याहत्तर-एकोणऐंशी |
| नाट्यमंडपाचे छप्पर | एकोणऐंशी-ऐंशी |
| सारांश | त्र्यांयशी-चौऱ्यांशी |
| संदर्भग्रंथसूची | चौऱ्यांशी-शांयशी |
| **भरतमुनिप्रणीत नाट्यशास्त्र** | |
| दुसऱ्या अध्यायाचे श्लोकवार भाषांतर | १-२३ |
| **परिशिष्ट १** | |
| अ नृत्तरत्नावली- जाय सेनापति | २४-२६ |
| आ शृङ्गारहार- हम्मीर | २६ |

इ नृत्तरत्नकोश– कुंभकर्ण २६–३३
ई संगीतचंद्र– विप्रदास ३३–३८
ए भावप्रकाशन– शारदातनय ३८–३९
ऐ संगीत नारायण ३९–४०
ओ संगीत मकरंद– नारद ४०


## परिशिष्ट २


अ विश्वकर्मवास्तुशास्त्र ४१–४३
आ राजवल्लभ ४३
इ शिल्परत्न ४३–४४
ई विष्णुधर्मोत्तरपुराण ४४
ए गरुडपुराण ४४
ऐ समरांगणसूत्रधार ४५


## शुद्धिपत्र

## आकृत्यांची अनुक्रमणिका


| क्रमांक | विषय | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ अ | चौरस नाटयमंडप–अभिनवगुप्त | | सत्तावीस |
| १ ब | आयताकार मंडप, चौरस मत्तवारणी–अभिनवगुप्त | | अट्ठावीस |
| १ क | आयताकार नाटयमंडप, आयताकार मत्तवारणी–अभिनवगुप्त (भट्टतोत) | | एकोणतीस |
| २ अ | विप्रकृष्ट मध्य नाटयमंडप | सुरेन्द्रनाथ दीक्षित | तीस |
| २ ब | चतुरस्र नाटयमंडप | सुरेन्द्रनाथ दीक्षित | |
| २ क | त्रिकोणी नाटयमंडप | सुरेन्द्रनाथ दीक्षित | |
| ३ अ | आयताकार मंडप | मनमोहन घोष | एकतीस |
| ३ ब | चौरस मंडप | मनमोहन घोष | बत्तीस |
| ३ क | त्रिकोणी मंडप | मनमोहन घोष | बत्तीस |
| ४ अ | आयताकार मंडप | सुब्बाराव | बत्तीस |
| ४ ब | चौरस नाटयमंडप | सुब्बाराव | तेहतीस |
| ४ क | त्रिकोणी नाटयमंडप | सुब्बाराव | तेहतीस |
| ४ ड | षड्दारुक | सुब्बाराव | तेहतीस |
| ४ इ | मत्तवारणी | सुब्बाराव | तेहतीस |

| | | |
|---|---|---|
| ५ अ आयताकार मंडप | केतकर | |
| ५ ब चौरस नाटचगृह | केतकर | एकेचाळीस |
| ५ क त्र्यस्र नाटचगृह | केतकर | |
| ६ मत्तवारण | | सेहेचाळीस |
| ७ अ, ब, क षड्दारुक– अभिनवगुप्त | | एकोणपन्नास |
| ७ ड षड्दारुक– कुंभकर्ण | | पन्नास |
| ८ द्विभूमि शैलगुहाकार चौरस नाटचमंडप–भरतमुनी | | साठ |
| ९ चौरस नाटचगृह, चौरस व आयताकार मत्तवारणी–अभिनवगुप्त | | चौसष्ट |
| १० भरतमुनींच्या मताने खांबांची योजना | | सहासष्ट |
| ११–१ चौरसमंडप, खांबांची मांडणी, शंकुकमत | | सदुसष्ट |
| ११–२ चौरसमंडप, खांबांची मांडणी, भट्टलोल्लटादी अन्यमत | | सदुसष्ट |
| ११–३ चौरसमंडप, खांबांची मांडणी, वार्तिककारमत | | सदुसष्ट |
| ११–४ चौरसमंडप, खांबांची मांडणी, भट्टतोतमत | | अडुसष्ट |
| १२ कुंभमताने खांबांची योजना | | अडुसष्ट |
| १३ अ, ब, क मंकड यांच्या मताने नाटचमंडप | | सत्तर |
| १४ आयताकार मंडप–याज्ञिक | | एकाहत्तर |
| १५ आयताकार नाटचगृह–पिशारोटी | | चौऱ्याहत्तर |
| १६ अ आयताकार नाटचमंडप | चंद्रभान गुप्ता | पंचाहत्तर |
| १६ ब चौरस नाटचमंडप | चंद्रभान गुप्ता | शाहत्तर |
| १६ क त्रिकोणी नाटचमंडप | चंद्रभान गुप्ता | शाहत्तर |
| १७ प्रेक्षकांच्या बैठकीची रचना–भट | | शाहत्तर |
| १८ वेदिकेचे थरविभाग | | अठ्याहत्तर |
| १९ सभाकार मंडप | | ऐंशी |
| २० नाटचमंडपाच्या छप्पराचा आतून देखावा | | एक्यांशी |
| २१ नाटचमंडपाच्या छप्पराचा बाहेरील देखावा | | ब्यांयशी |
| छायाचित्र १ | मत्तवारणी | पान सेहेचाळीसच्या समोर |
| छायाचित्र २ | सभाकार नाटचमंडप | पान ऐंशीच्या समोर |

## प्रास्ताविक

भरतमुनींनी नाटचशास्त्रावर लिहिलेला ग्रंथ हा त्या शास्त्रावरील उपलब्ध असलेल्या ग्रंथांत सर्वांत प्राचीन व प्रमाणभूत मानला जातो. भरतमुनींच्या अगोदर नाटचशास्त्रावर ग्रंथ लिहिले गेले नाहीत असे नाही. भरतमुनींच्या नाटचशास्त्राच्या शेवटच्या अध्यायात कोहल, वात्स्य, शाण्डिल्य व धूर्तिल या चार प्राचीन नाटचाचार्यांचा उल्लेख आला आहे.¶ पण आज त्यांची केवळ उद्धृत वाक्ये, श्लोक मिळतात; पूर्ण ग्रंथ उपलब्ध नाहीत. भरतमुनींच्या नंतर ज्यांनी ज्यांनी नाटचशास्त्रावर ग्रंथ लिहिलेत, त्यांनी भरतमुनींच्या नाटचशास्त्रावरील या आद्यग्रंथाला प्रमाणभूत मानूनच नाटचाची चर्चा केली आहे.

भरतमुनींचा नाटचशास्त्र हा ग्रंथ मूळ स्वरूपात आपल्यापुढे नाही. त्याचे संपादन दोनदा तरी झाले असावे. श्रीशारदातनयाने 'भावप्रकाशन' या ग्रंथात नाटचशास्त्र आदिभरत किंवा वृद्धभरत यांनी प्रथम रचले व तो ग्रंथ बारा हजार श्लोकांचा होता असे म्हटले आहे. या ग्रंथास 'द्वादश–साहस्री संहिता' म्हणत. त्यानंतर भरतमुनींनी त्याचा संक्षेप केला. सध्या जो त्यांचा नाटचशास्त्रावरील ग्रंथ उपलब्ध आहे, तो सहा हजार श्लोकांचा आहे; म्हणून त्यास 'षट्साहस्री संहिता' असेही म्हणतात.$

भरतमुनींचा काळ विद्वानांच्या मताने इ. स. पूर्व पाचव्या शतकापासून इ. स. पूर्व पहिल्या शतकापर्यंत मानला जातो (विश्वेश्वर, १९६०). भरतमुनींच्या नाटचशास्त्राचा काळ इ. स. पूर्व २०० वर्षे ते इ. स. २०० वर्षे असाही समजतात (केतकर, १९२८).

---

¶ कोहलादिभिरेतैर्वा वात्स्य–शाण्डिल्य–धूर्तिलैः।
एतच्छास्त्रं प्रयुक्तं तु नराणां बुद्धिवर्धनम् ॥ ३६·१०० ॥

$ एवं द्वादशसाहस्रैः श्लोकैरेकं तदर्धतः।
षड्भिः श्लोकसहस्रैर्यो नाटचवेदस्य संग्रहः॥ भावप्रकाशन, पान २८७.

**भरतमुनींच्या पूर्वी नाट्यशास्त्राची प्रगती :**

भरतमुनींचा नाट्यशास्त्र हा ग्रंथच नाटकाची कला ही भरतमुनींच्या कित्येक शतके अगोदर बरीच प्रगतावस्थेत असावी याचा पुरावा आहे. भरतमुनींनी दिलेले नाट्यमंडपाचे सूक्ष्म वर्णन व नाट्यमंडपाची दिलेली लक्षणे ही नाट्यगृह बांधण्याच्या शास्त्रात केवढी प्रगती झाली होती ते दर्शवितात. नाटक उत्तम दिसण्यासाठी व ऐकावयास येण्यासाठी तसेच सर्वकाळ उपलब्ध होण्याच्या दृष्टीनेही उघडया नाट्यगृहापेक्षा भिंत व छप्पर असलेला नाट्यमंडप हा श्रेयस्कर असतो व त्याप्रमाणे तो बांधणे ही गोष्टच नाट्यकलेत फार मोठी सुधारणा झाल्याची द्योतक आहे. खुद्द नाटकातील रसभावपरिपोष वगैरे ज्या गुणांची भरतमुनींनी या नाट्यशास्त्रात चर्चा केली आहे, तीसुद्धा भरतमुनींच्या काळी नाट्याची कला केवढी परिणतावस्थेत होती हे सांगण्यास पुरेशी आहे.

भरतमुनींच्या अगोदर नाट्यकला अस्तित्वात होती व तिचा विकास होत होत भरतमुनींच्या अगोदरच्या काळीही तिचे शास्त्रात रूपांतर झाले होते याबद्दलचे काही पुरावे खाली देतो.

ब्रह्मदेवाने ऋग्वेदापासून पाठ्य, यजुर्वेदापासून अभिनय, सामवेदापासून गायन व अथर्ववेदातून रस घेऊन नवीन नाट्यवेद तयार केला असे भरतमुनी म्हणतात.*[६]

ऋग्वेदातील संवादसूक्ते (सरमा–पणी, यम–यमी, पुरुरवा–उर्वशी) ही प्राथमिक अवस्थेतील नाटकेच असावीत. ऋग्वेदाच्या चवथ्या मंडलातील इंद्र व वामदेवांचा संवाद असलेली सूक्ते साभिनय म्हणत असतील.[१०]

वैदिक यज्ञसंस्थेत लौकिक घटनांचे अनुकरण काही ठिकाणी अभिनयपूर्वक करावयाचे असते. यज्ञात शूद्रापासून ब्राह्मण सोम विकत घेतो व नंतर त्याला काठी उगारून हाकून देतो हे नाट्यात्मक उदाहरण कदाचित लोकव्यवहारातून घेतले असावे.[१०]

---

* जग्राह पाठ्यं ऋग्वेदात् सामभ्यो गीतमेव च।
यजुर्वेदादभिनयान् रसानाथर्वणादपि ॥ ना. शा. १.१७॥

महाव्रत यज्ञामध्ये नृत्य, वाद्य व पद्य यांना महत्त्वाचे स्थान होते. नृत्याकरिता नटी व नटांना बोलावीत.[१०]

यजुर्वेदातील रुद्राध्यायाच्या चवथ्या अनुवाकात विश्वरूप हा शब्द येतो. येथे विश्वरूपाचा अर्थ आहे बहुरूपी. $.[६]

तैत्तिरीय ब्राह्मणात तिसऱ्या अष्टकाच्या चवथ्या प्रपाठकात पुरुषमेधातील बलींच्या यादीत शैलूष शब्द आला आहे. शैलूष म्हणजे नट. या यादीत शेवटला शब्द वंशनर्ती म्हणजे कुलपरंपरागत नाचणारा असा आहे. तेव्हा शैलूष म्हणजे नर्तक नसून नट असा अर्थ असावा.[६]

ऐतरेय ब्राह्मणाच्या तेहतिसाव्या अध्यायात दिलेले शुनःशेपाख्यान नाटक म्हणून रंगू शकेल.[१०]

पाणिनीच्या अष्टाध्यायीत 'छन्दोगौक्थिकयाज्ञिकबाह्वृचनटाञ्यः' ( अष्टाध्यायी ४.३.१२९ ) या सूत्राने छंदोग, औक्थिक, याज्ञिक, बाह्वृच व नट यांचा धर्म किंवा ग्रंथ ह्या अर्थी ञ्य प्रत्यय येतो असे सांगितले आहे. यावरून नटांचाही आम्नाय ग्रंथ असावा. अशा प्रकारचे ग्रंथ असल्याचा पुरावा पाणिनीच्या ग्रंथात इतरत्रही सापडतो. 'पाराशर्यशिलालिभ्यां भिक्षुनटसूत्रयोः' ( अष्टाध्यायी ४.३.११० ) या सूत्राने शिलालि याने लिहिलेली नटसूत्रे शिकणाऱ्यास शैलालिन् म्हणावे असे सांगितले आहे. कृशाश्वाने दिलेली नटसूत्रे शिकणारा तो कृशाश्विन् असे 'कर्मन्दकृशाश्वादिनिः' ( पाणिनी, अष्टाध्यायी ४.३.१११ ) या सूत्रात दिलेले आहे. यावरून पाणिनीस दोन नटसूत्रांचे ग्रंथ माहीत होते. शिलालीचे नाव शतपथ ब्राह्मण (१३.५.३.३) व आपस्तंब श्रौतसूत्रात (६.४.३) आलेले आहे. कृशाश्वाच्या सूत्रांस कार्शाश्वीय म्हणतात असे पाणिनीच्या 'वुञ्छण्...' (४.२.८०) इत्यादी सूत्रांत आलेले आहे.[६]

पातंजल महाभाष्यात रंगमंचावर 'कृष्णावर प्रत्यक्ष हल्ला करतात किंवा बलिराजाला बांधतात' असे म्हटले आहे.[१०]

---

$ नम आव्याधिनीभ्यो विविध्यन्तीभिश्च...नमो नमो विश्वरूपेभ्यो विश्वरूपेभ्यश्च वो नमो नमो महद्भ्यश्च क्षुल्लकेभ्यश्च...

इसवी सनाच्या पहिल्या शतकात झालेल्या अश्वघोषाची नाटके सापडली आहेत. तसेच कालिदासाच्या पूर्वी होऊन गेलेल्या भासाची नाटकेही प्रसिद्ध झाली आहेत. कालिदास 'प्रतिथयशसां भाससौमिल्ल-कविपुत्रादीनां' (मालविकाग्निमित्र) असा भासाचा आदरपूर्वक उल्लेख करतो.

नाट्यशास्त्रात भरतमुनींच्या शंभर मुलांचा उल्लेख आहे व त्यांची नावेही दिली आहेत (१.२६–३२). यांत कोहल, दत्तिल, शालिकर्ण (शातकर्ण), बादरायण (बादरि), नखकुट्ट व अश्मकुट्ट यांची नावे [३४] नाट्यशास्त्राचे प्रामाणित आचार्य म्हणून आलेली आहेत.

कोहलाचे उल्लेख अभिनवगुप्ताच्या नाट्यशास्त्राच्या टीकेत, कुट्टनीमत, भावप्रकाश तसेच रसार्णवसुधाकर इत्यादी ग्रंथांत मिळतात.

दत्तिल (किंवा धूर्तिल) यांचा उल्लेख वात्सायनाच्या कामसूत्रांत आलेला आहे. कामसूत्रांत असा संकेत दिला आहे की पाटलीपुत्र येथील गणिकांच्या विनंतीवरून त्यातील 'वैसिक' भागाची रचना दत्तकाचार्य यांनी केली. अभिनवभारतीत ध्रुवा, आतोद्य तसेच ताल यांच्या वेळी दत्तिलाचार्यांचे मत दिले आहे. त्यांच्या नावावर 'गांधर्ववेदसार' या ग्रंथाचा उल्लेख रामकृष्ण कवीने केलेला आहे. मात्र ग्रंथ अप्राप्य आहे.

वात्स्य व शाण्डिल्य यांची नावे नाट्याचार्य म्हणून जरी भरतमुनींनी दिली असली, तरी त्यांची उद्धृते अथवा त्यांची मते कोठेही सांगितलेली नाहीत.

इ. स. पूर्व पहिल्या शतकांत शालिकर्ण (शातकर्णि) हा राजा होऊन गेला. सागरनन्दीच्या नाट्यलक्षणरत्नकोश (पृष्ठ ११०१–११०३) तसेच त्याच्या रुचिपतिकृत टीकेत शातकर्णीचे मत दिले आहे.

नखकुट्ट व अश्मकुट्ट यांचे उल्लेख सागरनन्दीच्या नाट्यलक्षण-रत्नकोशात (पृष्ठ ८३, ४३७, २७६६, २७६७, २७७४, २७७५)

मिळतात. तसेच साहित्यदर्पणकार विश्वनाथाने ( पृ. २९४ ) त्यांना नाटचाचार्य मानले आहे.

बादरायण ( बादरि ) यांचा उल्लेख सागरनन्दीने ( पृष्ठ १९९२–१९९४ तसेच २७७०–७१ ) केलेला आहे.

वरील उल्लेखांवरून भरतमुनींच्या पूर्वकाळीही नाटचकला प्रगतावस्थेत होती असे स्पष्ट दिसते. भरतमुनींनी इतके प्रगल्भ नाटचशास्त्र लिहिले हाही एक त्या वेळच्या नाटचकलेच्या प्रगतीचा पुरावा होऊ शकतो; कारण कला अगोदर परिणतावस्थेत येते व मग तिचे शास्त्र बनते. असो.

**भरतमुनींच्या नाट्यमंडपावर भाष्य करणारे टीकाकार :**

भरतमुनींनी दुसऱ्या अध्यायात नाटचमंडपाचे सूक्ष्म वर्णन दिले आहे. त्यावर ज्या निरनिराळ्या विद्वानांनी भाष्य केले आहे त्यांचा परिचय प्रथम देतो.[२४]

अभिनव गुप्त यांनी भरतमुनींच्या नाटचशास्त्रावर अभिनव भारती या नावाची टीका लिहिली आहे. त्यांचे नाव प्रथम घ्यावयास हवे. त्यांनी या टीकेत शंकुक, भट्टलोल्लट, वार्तिककार व स्वतःचे गुरू भट्टतोत यांचीही भरतमुनींच्या नाटचमंडपाच्या रचनेबद्दलची मते दिली आहेत.

अभिनवगुप्त यांचा काल, त्यांनी त्यांच्या निरनिराळ्या ग्रंथांच्या रचनाकालाबद्दल जी माहिती दिली आहे तीवरून इ. स. ९५० ते १०२५ हा असावा.

श्रीशंकुकांचा उल्लेख अभिनवगुप्तांनी १५ वेळा केला आहे व अभिनवगुप्तांच्या अगोदरचे भरतमुनींच्या नाटचशास्त्राचे श्रीशंकुक हे टीकाकार असावेत. ते काश्मीरचा राजा अजितापीड याच्या काळी इ. स. ८१३त होऊन गेले असावेत.

भट्टलोल्लट यांचाही उल्लेख अभिनव भारतीत दहा-बारा वेळा आलेला आहे. यांचाही काल इ. स. आठवे शतक असावा.

वार्तिककारांचा उल्लेख सागरनन्दी (नाटचरत्नलक्षणकोश पृष्ठ ३२२५) तसेच भावप्रकाशनात (पृ. २३८) शारदातनय यांनी

हर्षविक्रम असा केला आहे. तेव्हा वार्तिककार म्हणजे हर्ष अथवा हर्षविक्रम या नावाचे नाट्याचार्य असावेत. यांचा नाट्यशास्त्रावर टीकाग्रंथ नसून त्या विषयावर स्वतंत्र ग्रंथ असावा असा विद्वानांचा होरा आहे.

भट्टतोत हे अभिनवगुप्त यांचे गुरू होते तेव्हा समकालीन होते असे म्हणावयास हरकत नाही. मत्तवारणी व द्विभूमी नाट्यमंडप यांची रचना कशी असावी याबाबत अभिनवगुप्त भट्टतोत यांच्या मतांचा उल्लेख करतो.

रामकृष्णकवींच्या भरतकोशात नाट्यमंडपाबद्दलची माहिती देताना ज्यांची टीका दिलेली आहे त्यांची माहिती आता देतो.[३]

नृत्तरत्नावलीचा लेखक जाय सेनापति हा दक्षिणेकडील काकतीय राजांच्या कारकीर्दीत इ. स. ११ व्या शतकात होऊन गेला.

संगीतराज तसेच नृत्यरत्नकोशाचा कर्ता कुंभकर्ण हा इ. स. १४४९ त होऊन गेला. संगीत दामोदराचा लेखक शुभङ्कर हा इ. स. १५०० नंतर व संगीतचंद्राचा लेखक विप्रदास हा इ. स. १६२५ च्या अगोदर होऊन गेला.

भरताच्या नाट्यमंडपाच्या रचनेवर ज्यांनी भाष्य केले आहे असे आधुनिक विद्वान म्हणजे केतकर[६], डॉ. व्ही. राघवन[२१], डॉ. ह. रा. दिवेकर[११], सुरेन्द्रनाथ दीक्षित[१२], प्रो. डी. आर. मंकड[१५], आर. के. याज्ञिक[२८], चंद्रभान गुप्ता[८], प्रो. सुब्बाराव[४१], विश्वेश्वर सिद्धान्तशिरोमणि[१४] व बापूराव नाईक[१३]*.

प्रो. भानूंनी[६] नाट्यशास्त्राचे मराठीत व प्रो. मनमोहन घोष[९] यांनी इंग्रजीत भाषांतर केले आहे. या सगळ्यांच्या नाट्यमंडपाच्या रचनेबद्दलच्या मतांचा योग्य त्या ठिकाणी परामर्ष घेतला आहे.

**भरतमुनींच्या नाट्यशास्त्रातील नाट्यमंडप**

भरतमुनींच्या नाट्यशास्त्रातील दुसरा अध्याय हा 'मण्डपविधान' या नावाचा आहे. भरतमुनिकालीन नाट्यमंडपाच्या रचनेची

---

* नाईक यांनी प्रो. सुब्बाराव यांची मते ग्राह्य धरली आहेत. त्यांचे स्वतःचे निराळे असे भाष्य त्यांनी दिलेले नाही. तेव्हा नाईक यांची मते पुढे दिलेली नाहीत.

सूक्ष्म माहिती त्यांनी दिली आहे. साहजिकच भारतीय शिल्पशास्त्राचा अभ्यास करणाऱ्याच्या दृष्टीने नाटचशास्त्रातील हा दुसरा अध्याय महत्त्वपूर्ण आहे. भरतकालीन नाटचमंडप कसा असे हे जाणून घेण्या-साठी या अध्यायाचे मराठी भाषांतर केले आहे. वर दिलेल्या निर-निराळ्या विद्वानांनी भरताच्या नाटचमंडपाच्या रचनेबाबत काय मते दिली आहेत याचा ऊहापोह येथे केला आहे व याबाबतीत प्रस्तुत लेखकाची मते काय आहेत तीही दिली आहेत.

नाटचशास्त्राच्या पहिल्या अध्यायात, संध्योपासनादी जपजाप्य पुरे झाल्यानंतर कोणा एका अनध्याय असलेल्या दिवशी ऋषींनी भरतमुनींकडे येऊन त्यांनी नाटचवेद सांगावा अशी विनंती केली. या ग्रंथाचा विस्तार ऋषींचे प्रश्न व त्यांना भरतमुनींनी दिलेली उत्तरे असा झाला आहे. पहिल्या अध्यायात देवांच्या करमणुकी-साठी नाटचकलेची उत्पत्ती कशी झाली याची माहिती भरत-मुनींनी दिल्यावर आता दुसऱ्या अध्यायात ऋषी त्यांना नाटच-गृहाची माहिती विचारीत आहेत. प्रथम त्यांनी रंगमंडपाकरिता जो यज्ञविधी करतात त्याची माहिती विचारली. पण नंतर त्यांच्या लक्षात आले, की रंगमंडपाच्या यज्ञविधिअगोदर नाटचगृहाच्या रचनेची माहिती असावयास हवी; कारण अगोदर रंगमंडप बांधा-वयाचा व नंतर त्याच्यासाठी यज्ञविधी करावयाचा. तेव्हा अधिक सुसंगत असे तीन प्रश्न त्यांनी नंतर केलेत कीं अगोदर नाटचमंड-पाची रचना, त्याची आकार परिमाणादी लक्षणे व नंतर पूजाविधी ही सांगावीत. त्यात पुन्हा भविष्यकाळी मानवांनी करावयाच्या नाटचमंडपाबद्दलची माहिती सांगावी, असे स्पष्टीकरण केलेले आहे. भरतमुनींनी उत्तर देताना सांगितले की, 'ऋषिजनहो, मी तुम्हाला नाटचमण्डपाची लक्षणे व पूजाविधी सांगतो.' यात नाटचमण्डप कसा बांधावा ( क्रियाः ) याचा वेगळा उल्लेख भरतमुनींनी केलेला नाही. याचे कारण अभिनवगुप्तच्या मताने चवथ्या श्लोकात दिलेलें आहे. त्यांच्या मताने त्याशिवाय चवथ्या श्लोकातील मजकुराची संगती लागत नाही.

नाट्यमण्डप कसा बांधावा याचा उल्लेख भरतमुनींनी का केला नाही तर त्याचे उत्तर असे, की देव संकल्पमात्रेकरून नाट्यमण्डप उभारू शकतात, तेव्हा एकदा त्यांना मण्डपाची आकार परिमाणादी लक्षणे माहीत झाली की तो नाट्यमण्डप उभारण्याची क्रिया करावयाची गरज त्यांना वाटत नाही. म्हणून त्याचा उल्लेख भरतमुनी करीत नाहीत. केवळ 'दिव्यानां मानसी सृष्टिः... ' या श्लोकार्धाची संगती लावण्यासाठी अभिनवगुप्तांनी एवढे सूक्ष्म कारण दिले आहे. वास्तविक त्याची गरज नाही. कारण नंतर भरतमुनींनी नाट्यमण्डपाची दिलेली माहिती पाहता ते त्याची केवळ लक्षणे व पूजाविधी देऊन थांबले नाहीत; तर खांब किती, ते कोठे उभारावेत, प्रेक्षकांची बसण्याची रचना कशी असावी, दारे कोठे व किती असावीत वगैरे नाट्यमण्डपाच्या रचनेची सर्व माहिती ते देतात. तेव्हा लक्षणे या एका शब्दात रचनेची क्रिया व आकार परिमाणादींची माहिती ही दोन्ही येतात व त्याच अर्थी हा शब्द भरतमुनींनी वापरला असावा. शिवाय श्लोक २.६ त 'श्रूयतां तद्यथा यत्र कर्तव्यो नाट्यमंडपः ।' असा क्रियेचाही स्पष्ट उल्लेख त्यांनी केला आहे. तेव्हा श्लोक २.५ ची संगती जरा निराळ्या तऱ्हेने लावावयास हवी. नाट्यगृहाबद्दलची सूक्ष्म माहिती भरतमुनी देत आहेत व ती देण्याचे कारण म्हणून त्यांनी श्लोक २.४ मध्ये देव संकल्पमात्रेकरून निर्मिती करू शकतात असे म्हटले आहे. नाट्यकलेची उत्पत्ती प्रथम देवलोकात झाली. ती कला मनुष्यलोकात न्यावयाची असेल तर त्यासाठी पहिली कृती म्हणजे नाट्यमंडप बांधणे. देवांनी संकल्पमात्रेकरून नाट्यमंडप उभारला तरी भूलोकी तो उभारण्यास मानवी प्रयत्न लागतात. त्यासाठी त्याची रचना, लक्षणे व पूजा ही सूक्ष्मपणे माहीत पाहिजेत. म्हणून नाट्यमंडप कसा उभारावा, त्यासाठी द्रव्य काय लागते व हे सर्व प्रयत्न यशस्वी होण्यासाठी जो पूजाविधी करावा लागतो तो मी यथास्थित सांगतो (श्लोक २.६), असे ते म्हणतात. मानवांना नाट्यमण्डप उभारण्यासाठी त्याची सूक्ष्म व यथास्थित माहिती लागते, मानव देवांप्रमाणे संकल्पमात्रेकरून

नाटचगृह उभारू शकत नाहीत हे सांगण्यासाठी म्हणून श्लोक २.५ येथे आला आहे.

या प्रास्ताविकानंतर भरतमुनींनी नाटचमंडपाचे आकार व मापे दिली आहेत.

**नाटचमण्डपाचा आकार व मापे**

नाटचमण्डपाचे तीन प्रमुख प्रकार आहेत व ते आकारावरून ठरतात. ते म्हणजे आयताकार, चौरस व त्रिकोणी आकाराचे मंडप. पुन्हा या प्रत्येक मंडपाचे श्रेष्ठ, मध्यम व कनिष्ठ असे तीन प्रकार होतात. श्रेष्ठ प्रकारचा मंडप १०८ हातांचा, मध्यम ६४ हातांचा व कनिष्ठ मंडप ३२ हातांचा असतो. तेव्हा नाटचमंडपाचे एकूण नऊ प्रकार आकार व परिमाण यांच्या भेदांमुळे होतात.

नृत्तरत्नावलीचा लेखक जाय सेनापति† याने नृत्यमण्डप आयताकार व चौरस असतो असे म्हटले आहे व त्यांची मापे भरतमुनींनी दिलेल्या नाटचमंडपाचीच आहेत. (७.२१२–२१८)

श्रृंगारहाराचा लेखक हम्मीर‡ यानेही भरतमुनींप्रमाणेच आयताकार, चौरस व त्रिकोणी असे ज्येष्ठ, मध्यम व कनिष्ठ मंडपांचे आकार सांगितले आहेत (भरतकोश पान ९१८).

नृत्यरत्नकोशाचा कर्ता कुंभकर्ण§ याने आकारानुसार नाटचमंडपाचे चार प्रकार सांगितले आहेत: दीर्घायत, आयत, चौरस व त्रिकोणी. दीर्घायत म्हणजे रुंदीच्या दुप्पट लांबीचा मंडप. आयताकार मंडपात लांबी-रुंदीचे प्रमाण याहून कमी असते. यातील दीर्घायत (विकृष्ट) मंडप श्रेष्ठ, आयत व चौरस (चतुरस्र) मंडप मध्यम व त्रिकोणी मंडप कनिष्ठ प्रकारचा असतो. विकृष्ट नाटचमंडप देवांसाठी, आयताकृती मंडप राजे लोकांसाठी, चौरस मंडप ब्राह्मणवर्गासाठी व त्रिकोणी मंडप हीनवर्णांसाठी (वैश्य व शूद्रांसाठी) असावा असे मत

†परिशिष्ट १ अ

‡परिशिष्ट १ आ

§परिशिष्ट १ इ

दिले आहे. येथे चतुरस्त्र मंडपाचा आयताकार हा प्रकार भरतमुनींनी दिलेल्यापेक्षा निराळा प्रकार आहे ( १.१.३७–४० ).

संगीतचंद्राचा लेखक विप्रदास † याने नाटचमंडपाचे आकारांप्रमाणे वरीलप्रमाणेच चार प्रकार दिले आहेत ( भरतकोश पान ३२० ).

भावप्रकाशनाचा लेखक शारदातनय¶ यानेही रंगमंडपाचे आकारानुसार तीन प्रकार दिले आहेत. मात्र त्यांच्या मताने हे आकार चौरस ( चतुरस्त्र ), त्रिकोणी व वर्तुळाकार आहेत. हे तिन्ही प्रकारचे मंडप राजाच्या उपयोगाकरिता म्हणून सांगितले आहेत. राजाच्या बरोबर असलेल्या प्रेक्षकगणांप्रमाणे मंडपाचा आकार निरनिराळा असतो. राजाने गावातील सभ्य व शिष्ट जनांसमवेत लहानसे संगीत नाटक पाहण्यासाठी गोलाकार नाटचमंडप बांधावा. वारांगना, वैश्य, व्यापारी, अमात्य, सेनापती इत्यादी अधिकारीवर्गासह, मित्र व मुलांसह संगीत नाटक पाहण्यासाठी चौरस नाटचगृहाचा उपयोग करावा. वेदवेत्ते, पुरोहित, आचार्य, अंतःपुरातील स्त्रीवर्ग व पट्टराणी यांच्यासह नाटक बघावयाचे असेल तर त्यासाठी त्रिकोणी नाटचगृहाचा उपयोग करावा ( १०.८–१६ ).

मण्डपाचा आकार ठरल्यानंतर त्याची मापे काय असतील ते पाहू. भरतमुनींनी ज्येष्ठ मंडप १०८ हातांचा, मध्यम मंडप ६४ व कनिष्ठ मंडप ३२ हातांचा असावा असे म्हटले आहे. भरतमुनींनी ‘हस्तदण्ड प्रमाणतः’ असा शब्दप्रयोग केला आहे. तेव्हा मंडपाचे माप ‘हस्त’ प्रमाणात घ्यावे की ‘दण्ड’ प्रमाणात हा मुद्दा उपस्थित होतो. अभिनवगुप्त मंडपाचे आकारानुसार व मापांनुसार नऊ प्रकार व त्यांचे पुन्हा हातांच्या मापाचे व दण्डांच्या मापाचे असे प्रत्येकी दोन प्रकार होऊन मंडपांचे १८ प्रकार होतात असे सांगतात. बहुसंख्य, प्राचीन व अर्वाचीन टीकाकारांच्या मते हस्तदण्ड म्हणजे हाताचे माप, दण्डाचे माप नव्हे.

---

† परिशिष्ट १ ई.

¶ परिशिष्ट १ ए.

जाय सेनापतींनी मंडपाची मापे हातांतच दिली आहेत व बहुधा त्यांच्या मताप्रमाणे १ हात = २४ अंगुले हेच हाताचे माप असावे. दंड प्रमाणाबद्दल त्यांनी काहीही म्हटलेले नाही.

कुंभकर्ण याने १.१.४३ त नाटचगृहाचे माप चार हातांचा एक दण्ड या मापाने घ्यावे असे म्हटले आहे. मात्र त्यांनी भरतमुनींनी दिलेली मापे हातांत ( १ हात = २४ अंगुले ) आहेत असे समजून तीच मापे दण्डात (४ हात = १ दण्ड) दिली आहेत. कुंभाने देवांचे विकृष्ट प्रकारचे नाटचगृह २७ दण्ड ( = १०८ हात) लांबीचे व त्याच्या निम्मे रुंदीचे असते असे म्हटले आहे. तसेच मानवांचे विकृष्ट तऱ्हेचे नाटचगृह १६ दण्ड ( = ६४ हात ) लांबीचे व त्याच्या निम्मे रुंदीचे असते असे म्हटले आहे. तेव्हा हे उघडच आहे की, कुंभाच्या मताने भरतमुनींनी नाटचगृहाची मापे हात (१ हात = २४ अंगुले) या मापाने दिली आहेत.

विप्रदासांच्या मताने विकृष्ट मध्यम रंगमंडपाचे माप ६४ × ३२ हात व चौरस रंगमंडपाचे माप ३२ × ३२ हात असते. त्यांनी येथे २४ अंगुलांचा हात की ९६ अंगुलांचा दण्ड याबद्दल काहीही मत-प्रदर्शन केलेले नाही.

प्रो. सुब्बारावांच्या मताने[१], प्रसन्नकुमार आचार्यांनी त्यांच्या Dictionary of Hindu Architecture या ग्रंथात ‘ हस्तदंड ’ म्हणजे एक हात मापाचा दण्ड, पट्टी असा अर्थ दिला आहे. तेव्हा मंडपाची मापे फक्त २४ अंगुले = १ हात या हस्तप्रमाणातच दिली आहेत. याज्ञिकही[१८] नाटचमण्डपाची मापे हातांत देतात, दण्डांत नाही.

विश्वेश्वरांचे[१९] मत अभिनवगुप्तांच्या मताप्रमाणे मंडपांचे हातांप्रमाणे व दंडमापांप्रमाणे प्रत्येकी नऊ असे १८ प्रकार होतात याला अनुकूल आहे. अभिनवगुप्तांनी दण्डप्रमाणात मण्डपाचे माप भरतमुनींनी द्यावयाचे कारण काय याचे उत्तर दिले आहे. दण्डाच्या मापाचा मंडप हाताच्या मापाने केलेल्या मंडपापेक्षा चार पटीने लांबी-रुंदीचा व क्षेत्रफळाच्या दृष्टीने १६ पट होईल, म्हणजे फारच मोठा होईल; बांधणे शक्य नाही

इतका मोठा होईल. मग त्याचा उल्लेखच करावयाची गरज काय ? तर 'अप्रयुत्रे दीर्घसत्रवत्' या उक्तीप्रमाणे. १२ वर्षे सतत चालणाऱ्या यज्ञाला सत्र म्हणतात. परंतु ब्राह्मणग्रंथांत शंभर किंवा हजार वर्षे चालणाऱ्या यज्ञांचे वर्णन दिलेले असते. एवढ्या लांब कालावधीचे यज्ञ कोणीही करीत नाही; करणे शक्य नाही. तरीही त्यांचे वर्णन ब्राह्मणग्रंथांत दिलेले आहे. ते कशाकरिता तर असेही लांब कालावधीचे यज्ञ असतात हे लोकांना माहिती असावे, त्यांचा संप्रदाय, परंपरा पूर्णतः नष्ट न व्हावी म्हणून हे उल्लेख आहेत. तसेच दंडप्रमाणात नाटचगृह बांधत नाहीत, बांधणे शक्य नाही तरीही त्यांची माहिती दिली आहे ते वरील उक्तीप्रमाणे.

विश्वेश्वरांच्या दुसऱ्या मताप्रमाणे हातांचे दण्डांत रूपांतर करावे, म्हणजे नाटचमण्डपाचे माप ६४ × ३२ हात आहे हेच दण्डात १६ × ८ दण्ड आहे असे भरतमुनींना म्हणावयाचे असावे. हे मत कुंभकर्णांच्या मताशी जुळते आहे.

तेव्हा ज्यांनी या विषयात मत दिले आहे त्यांच्या मताप्रमाणे भरतमुनींनी दिलेली १०८, ६४, ३२ वगैरे मापे ही १ हात = २४ अंगुले या हाताच्या मापांत आहेत. अभिनवगुप्त व विश्वेश्वर यांच्या मताने ती मापे १ हात = २४ अंगुले व १ दण्ड = ९६ अंगुले या दोन्ही मापांत दिली आहेत. पण त्यातही त्यांच्या म्हणण्याप्रमाणे दण्डमापाने नाटचमण्डप बांधत नाहीत, तर 'हस्त' मापाचा उपयोग करीत.

प्रस्तुत लेखकाच्या मताने नाटचमण्डपाचे आकारानुसार तीन प्रकार वमापांप्रमाणे प्रत्येकी तीन प्रकार असे एकंदर नऊ प्रकार आहेत. मात्र भरतमुनींनी नाटचमण्डपाची जी मापे दिली आहेत ती १ हात = २४ अंगुले या परिमाणांत नसून, १ दण्ड = ४ हात या दण्डाच्या मापात दिली आहेत. याची कारणे खालीलप्रमाणे–

दण्डप्रमाणात मापे द्यावयाची नव्हती व ती हस्तप्रमाणातच द्यावयाची होती, तर 'हस्तप्रमाणतः' असा शब्दप्रयोग आला असता.

'हस्तदण्डप्रमाणतः', दण्ड हे हाताचे परिमाण धरून मापे घ्यावीत, असे म्हटले नसते.

पुढे श्लोक २.१३ ते १६ यात अणू या सूक्ष्म मापापासून दण्डापर्यंत जे परिमाणांचे कोष्टक दिले आहे, त्यात दण्डाचे माप द्यावयाचे काहीच कारण नव्हते. जर नाटचमण्डप २४ अंगुले = १ हात या मापाने बांधावयाचा असेल तर पुढे ४ हात = १ दण्ड हे माप देण्याची गरज नव्हती. पण तरीही ते दिले आहे. भरतमुनी दण्डाच्या मापापाशी येऊन थांबतात; तेव्हा त्यांना मंडपाचे माप दण्ड या परिमाणात घ्यावे असे अभिप्रेत असावे व तसे 'निर्दिष्टस्तु प्रमाणतः, अनेनैव प्रमाणेन' असे वाक्यप्रयोग पुढच्याच श्लोकात (२.१६) देऊन हा आपला अभिप्राय त्यांनी ठासून सांगितला आहे.

शिल्पशास्त्रात हाताचे माप असे देण्याची पद्धतच आहे. रथाच्या मापाची माहिती देताना १ वितस्ति = $\frac{1}{2}$ हात असे सांगून रथाच्या सर्व अवयवांची मापे वितस्तीत घ्यावीत असे उल्लेखतात व नंतर रथाची मापे हातांत सांगतात. तेव्हा येथे हात म्हणजे वितस्तीचे माप होय.$

विश्वकर्मवास्तुशास्त्र[३१] या शिल्पशास्त्राच्या पुस्तकात नाटच-मंडपाची माहिती अध्याय ४९त दिली आहे. तेथे नाटचमंडपाचे माप चार दण्डांपासून सुरवात करून दोन दोन दण्डांनी वाढवीत वीस दण्डांपर्यंत घ्यावे असे म्हटले आहे. (४–४$\frac{1}{2}$) एवढेच नव्हे तर याच्या दुप्पट माप घेऊन, ४० दण्डांपर्यंत (१६० हातांपर्यंत), मंडप

---

$ 'विश्वकर्मीय रथलक्षणम्' या हस्तलिखित ग्रंथात रथाची रुंदी ३ वितस्तींपासून ११ वितस्तींपर्यंत असते असे म्हटले आहे. मात्र जेथे रथाची रुंदी ३ ते ११ हातांपर्यंत आहे असे दिले आहे तेथे प्रथम रथाची रुंदी, उंची वितस्तीच्या मापात सांगतात असे प्रथम सांगून नंतर जे माप दिले ते हातांत दिले आहे. येथे हात म्हणजे वितस्तीचे माप हे उघडच आहे. पुढेही एक ते तीनमजली रथांची मापे हातांत दिली आहेत; पण त्याअगोदर ही मापे वितस्तींनी घ्यावीत असे म्हटले आहे.

बांधावा असे म्हटले आहे.§ श्लोक तीनमध्ये रंगशाला देव, गन्धर्व व मानुष्य या तीन भागांत विभागावी असे म्हटले आहे व या प्रत्येक भागाचे ( प्रतिभागं, श्लोक ४½ ) माप २० दण्ड घेतले तर रंगशालेचे माप ६०×६० दण्ड येते. तेव्हा दण्डप्रमाणात नाटचमंडप बांधत नसत असे म्हणता येत नाही.

तेव्हा नाटचगृहाचे माप दण्डपरिमाणांत घ्यावे असे भरतमुनींचे मत असावे.

आता आयताकार, चौरस व त्रिकोणी मंडपांची ज्येष्ठ, मध्यम व कनिष्ठ याप्रमाणे काय मापे असावीत हा पुढला प्रश्न उपस्थित होतो.

विश्वेश्वरांनी दिलेल्या नऊ प्रकारच्या ( हाताच्या मापांच्या ) मंडपांची मापे खाली तक्ता १ मध्ये दिली आहेत. तक्ता २ मध्ये हात व दंड मापाने निरनिराळ्या नाटचमंडपांची मापे मीटर मापांत करून दाखविली आहेत.

तक्ता १
मंडपांची मापे

| आकार (श्लोक ८) | प्रकार (श्लोक ८) | परिमाण हात (श्लोक ९–१०) | उपयोग (श्लोक ११) |
|---|---|---|---|
| १. विकृष्ट | १. ज्येष्ठ | १०८× ६४ | देवतार्थ |
| | २. मध्यम | ६४× ३२ | नृपार्थ |
| | ३. कनिष्ठ | ३२× १६ | लोकार्थ |
| २. चौरस | ४. ज्येष्ठ | १०८×१०८ | देवतार्थ |
| | ५. मध्यम | ६४× ६४ | नृपार्थ |
| | ६. कनिष्ठ | ३२× ३२ | लोकार्थ |
| ३. त्रिकोणी | ७. ज्येष्ठ | १०८ समभुज | देवतार्थ |
| | ८. मध्यम | ६४ समभुज | नृपार्थ |
| | ९. कनिष्ठ | ३२ सममुज | लोकार्थ |

§ चतुर्दण्डं समारभ्य द्विद्विदण्डविवर्धनात् ॥ ४ ॥
विंशद्दण्डान्तकं मानं प्रतिभागं विधीयते । ४½ ।
अथवा यद्द्विगुणितं मानं वा नेयमीरितम् । ५½ ।

म. रा. सा. सं. मं. ग्रंथालय प्र/२७५ ९ मुंबई

तक्ता २

| मंडपाचा प्रकार | माप हात | मीटर (१ हात=२४अंगुले) | मीटर (१ दण्ड = ४ हात) |
|---|---|---|---|
| श्रेष्ठ विकृष्ट | १०८ × ६४ | ४९·२५ × २९·२५ | १९७ × ११७ |
| मध्यम विकृष्ट | ६४ × ३२ | २९·२५ × १४·६२ | ११७ × ५८·५ |
| कनिष्ठ विकृष्ट | ३२ × १६ | १४·६२ × ७·३१ | ५८·५ × २९·२४ |
| श्रेष्ठ चौरस | १०८ × १०८ | ४९·२५ × ४९·२५ | १९७ × १९७ |
| मध्यम चौरस | ६४ × ६४ | २९·२५ × २९·२५ | ११७ × ११७ |
| कनिष्ठ चौरस | ३२ × ३२ | १४·६२ × १४·६२ | ५८·५ × ५८·५ |
| श्रेष्ठ त्रिकोणी | १०८ समभुज | ४९·२५ समभुज | १९७ समभुज |
| मध्यम त्रिकोणी | ६४ समभुज | २९·२५ समभुज | ११७ समभुज |
| कनिष्ठ त्रिकोणी | ३२ समभुज | १४·६२ समभुज | ५८·५ समभुज |

तक्ता १ मध्ये चौरस मध्यम मंडपाचे माप ६४×६४ हात असे असून तो राजाकरिता असावा असे म्हटले आहे. भरतमुनींनी विकृष्ट मध्यम मंडपाचे माप ६४×३२ हात दिले आहे. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे मध्यम मापाचा मंडप हाच उत्तम मण्डप असतो. त्याहून मापाने मोठा असल्यास तो निरनिराळ्या कारणांमुळे योग्य नसतो (ना. शा. २.१७–२१). मात्र पुढे चौरस मंडपाचे माप देताना त्यांनी ते ३२×३२ हात दिले आहे ( ना. शा. २.८६ ). परंतु वरील तक्त्याप्रमाणे तो मध्यम मापाचा मण्डप नसून चौरस कनिष्ठ प्रकारचा मंडप असतो.

जाय सेनापति म्हणून चौरस मण्डप कनिष्ठ प्रकारचा असतो असे म्हणतात ( ७.२१७ ).

विश्वेश्वर तसेच सुब्बाराव यांच्या मताने ज्या अर्थी ६४×३२ हात या मापापेक्षा मोठा मंडप नको, त्या अर्थी चौरस मध्यम ६४×६४ हात मापाचा मण्डप मानवास अयोग्य आहे; म्हणून भरतमुनींनी जरी विकृष्ट मंडपाच्या बाबतीत मध्यम मण्डप उत्तम असतो असे म्हटले असले तरीही चौरस मंडप बांधताना चौरस मध्यम मंडपाचे माप ६४×६४ हात हे ६४×३२ हात या विकृष्ट मंडपापेक्षा जास्त

येत असल्याने चौरस कनिष्ठ मंडपच अधिक योग्य आहे असे म्हटले आहे व ते योग्य वाटते.

मंकड[२५] यांनी ३२×३२ हातांच्या मापाचा चौरस मण्डप हा मध्यम मण्डप यावा म्हणून विकृष्ट व चौरस मण्डपाची ज्येष्ठ ते कनिष्ठ प्रकारची जी मापे दिली आहेत ती त्यामुळे योग्य वाटत नाहीत. मंकड यांनी दिलेली मापे अशी–

विकृष्ट ज्येष्ठ १०८×६४, विकृष्ट मध्यम ६४×३२, विकृष्टावर ३२×१६, चतुरस्र ज्येष्ठ ६४×६४, चतुरस्र मध्यम ३२×३२, चतुरस्रावर १६×१६.

येथे हे लक्षात ठेवावयास हवे, की मंडपांची ज्येष्ठ-कनिष्ठता त्यांच्या मापांवरून ठरते, आकारांवरून नव्हे. श्लोक २.११ नंतर कंसांत दिलेले तीन श्लोक प्रक्षिप्त आहेत. भरतनाटचशास्त्राच्या जवळ जवळ ५० हस्तलिखित प्रती उपलब्ध आहेत. त्यांतील फक्त तीन प्रतींत हे श्लोक दिलेले आहेत. याशिवाय अभिनवगुप्तची या तीन श्लोकांवर वृत्ती नाही. तेव्हा हे श्लोक प्रक्षिप्त आहेत.[३४] त्यातील तिसऱ्या श्लोकात¶ विकृष्ट मंडप ज्येष्ठ, चौरस व त्रिकोणी मंडप अनुक्रमे मध्यम व कनिष्ठ प्रकारचे अशी मंडपांच्या आकारावरून ज्येष्ठ-कनिष्ठता दिली आहे, ती लक्षात घ्यावयास नको.

भरतमुनींनी दिलेल्या मापांपेक्षा निराळ्या मापांचे मंडप मध्ययुगीन आचार्यांनी दिले आहेत ते येथे उद्धृत करतो.

संगीतनारायणाचा* लेखक शुभङ्कर याने संगीतदामोदरात रंगभूमी २० हात रुंदीची असावी असा उल्लेख केला आहे.

नारदांनी‡ लिहिलेल्या (७ ते ११ वे शतक) संगीतमकरंदात चतुरस्र नाटचशाला ८६ हात लांबी-रुंदीची असते, असे म्हटले आहे.

---

¶ कनीयस्तु स्मृतं त्र्यस्रं चतुरस्रं तु मध्यमम् ।
ज्येष्ठं विकृष्टं विज्ञेयं नाटचवेदप्रयोक्तृभिः ।।

* परिशिष्ट १ ऐ

‡ परिशिष्ट १ ओ

नाट्यसर्वस्वदीपिका या भाण्डारकर प्राच्यसंशोधन मंदिरातील हस्तलिखितात विकृष्टमंडपाची लांबी १०८ न देता १२८ हात दिली आहे (मंकड १९५०).

श्लोक २.११ त ज्येष्ठ मंडप देवांसाठी असावा, राजासाठी मध्यम प्रमाणाचा व इतर प्रजेसाठी कनिष्ठ मंडप असावा असे भरतमुनी म्हणतात. येथे अभिनवगुप्तनी असा मुद्दा काढला आहे, की देव जेथे प्रेक्षक म्हणून आहेत तो मंडप ज्येष्ठ प्रकारचा असावा असा वरील 'देवानां तु भवेज्जेष्ठं' याचा अर्थ नसून ज्या नाटकात देवचरित्र दिलेले असते ते नाटक ज्येष्ठ आकाराच्या मंडपात करावे, कारण अशा नाटकात देव-दानवांची युद्धे दाखवितात; म्हणजेच खूप पात्रे असतात. त्या युद्धांकरिता पार्श्वसंगीत म्हणून उपयोगात आणावयाची वाद्ये ही आकाराने मोठी व संख्येने जास्त असतात (व ही प्रेक्षागृहातच ठेवतात). तसेच एका वेळेला १६ नायक असलेली 'डिम' प्रकारची ही नाटके असल्याने रंगमंच फारच मोठा लागतो. तेव्हा अशी देवचरित्रावर आधारलेली नाटके मापाने ज्येष्ठ असलेल्या मंडपात करावी. याचेच पुढील स्पष्टीकरण म्हणजे ज्या नाटकात राजा नायक असतो तेथे मध्यम मापाचा मंडप असावा; तसेच जेथे प्रहसनादी सामान्य लोकांविषयी नाटक असते तेथे पात्रांची व वाद्यांची संख्या कमी असल्याने रंगमंच लहान असला तरी चालतो व तेथे कनिष्ठ मंडप असावा.

अभिनवगुप्त यांचे वरील स्पष्टीकरण योग्य वाटत नाही. 'देवानां तु भवेज्जेष्ठं' याचा अर्थ देव प्रेक्षक असतील तर नाट्यगृह मापाने ज्येष्ठ (१०८×१०८ हातांचा) असावा हाच योग्य वाटतो. कारण पुढे श्लोक २.१९त विकृष्ट मध्यम आकाराचा मंडप मानवांकरिता उत्तम असतो कारण त्याने रंगमंचावर चाललेले नाटक स्पष्टपणे दिसते व ऐकावयास येते अशी त्याची प्रशस्ती भरतमुनींनी केली आहे. ज्येष्ठ विकृष्ट मंडपात नटांचे उच्चारिलेले शब्द व गायन ही लांब बसणाऱ्या प्रेक्षकांना अस्पष्ट ऐकावयास येतील व चेहऱ्यावरील भावाभिव्यक्ती नीट दिसणार नाही म्हणून जो ज्येष्ठ मंडप

देवांकरिता ( देव प्रेक्षक म्हणून असतात ) आहे तो मंडप मानवाने देवांशी स्पर्धा करून बांधू नये. 'देवानां मानसी सृष्टिः... ' इत्यादी श्लोक (ना. शा. २.२२ ) येथे या कारणासाठी परत आलेला आहे. देवांच्या मानसिक शक्तीमुळे त्यांना ज्येष्ठ विकृष्ट मंडपातील नाटक उत्तम पाहता व ऐकता येते. ती शक्ती मानवात नसल्याने जेथे मानव प्रेक्षक आहेत तेथील विकृष्ट मंडप मध्यम प्रकारचा असावा असे म्हटले आहे.

शिवाय अभिनवगुप्तनी केलेला अर्थ बरोबर म्हटला तर मध्यम विकृष्ट मंडपात देवचरित्र असलेली नाटकेच करू नयेत असा अनवस्था प्रसंग यावयाचा. तेव्हा सर्व प्रकारची नाटके मध्यम विकृष्ट मंडपात करता येतात. ज्येष्ठ विकृष्ट नाटयमंडप मात्र देव प्रेक्षकांसाठी उत्तम व जेथे मानव प्रेक्षक आहेत तेथे मध्यम विकृष्ट मंडप असावा.

मानवांकरिता आयताकृती मंडप ६४ हात लांबी व ३२ हात रुंदीचा असावा, या मापाहून जास्त मापाचा बांधू नये असे भरतमुनींनी स्पष्ट म्हटले आहे ( ना. शा. २.१७–१७$\frac{1}{2}$ ). भरतमुनींचे नाटयगृहाबद्दलचे निरीक्षण किती सूक्ष्म आहे हे नाटयमंडपाचे माप ठरविताना त्यांनी जी कारणे दिली आहेत त्यावरून समजून येते.

मंडप वर दिलेल्या मापापेक्षा मोठा केल्यास नटांच्या गायन-संवादामुळे, चेहऱ्यावरील भावाभिव्यक्ती व शरीराच्या अवयवांच्या हालचालींनी जी रसनिष्पत्ती केली जाते ती प्रेक्षकांपर्यंत नीट पोचत नाही. मंडप मोठ्या मापाचा केल्यास सर्व मंडपभर आवाज ऐकावयास जावा म्हणून नटांना फार मोठ्याने बोलावे-ओरडावे लागेल. त्यामुळे रंगपीठाजवळ बसलेल्या प्रेक्षकांना नटांचा उच्चार कर्कश व कान-ठळ्या बसणारा वाटेल; याउलट, दूर बसणाऱ्यांना तो स्वर अस्पष्ट ऐकावयास येईल. तेव्हा जवळच्यांना तसेच दूर बसलेल्यांना नटाने उच्चारलेला शब्द मधुर व जवळजवळ सारखाच स्पष्टपणे ऐकावयास येईल, असे नाटयमण्डपाचे माप असावे. तसेच आयताकार मण्डप जर फार लांबीचा असेल तर नटांनी उच्चारलेल्या शब्दांचा

प्रतिध्वनी निर्माण होऊन उच्चार स्पष्टपणे ऐकावयास येणार नाहीत (नाटचशास्त्र २.१८–२०).

पूर्वीच्या काळी भावाभिव्यक्तीसाठी चेहऱ्यावरील भाव, डोळे, भुवया, ओठ यांचे विभ्रम तसेच हातांच्या निरनिराळ्या मुद्रा यांच्यावर बरीच भिस्त असे. किंबहुना त्या काळचे नाटक चांगले समजण्यासाठी प्रेक्षकाला नृत्यशास्त्राचे ज्ञान असणे आवश्यक असे. तेव्हा प्रेक्षकांचे रंगपीठापासूनचे जास्तीत जास्त अंतर असे असावे की तेथूनही नटाच्या चेहऱ्यावरील भाव, हाताच्या मुद्रा वगैरे त्यास स्पष्टपणे दिसावयास हव्या. नाहीतर तो नाटकात योग्य तो रस घेऊ शकणार नाही. तेव्हा या कारणासाठीही नाटचमण्डपाचे जास्तीत जास्त माप ६४ × ३२ हातांपेक्षा जास्त असू नये, अशी मीमांसा नाटचगृहाची मापे ठरविताना भरतमुनींनी केलेली आहे.

भरतमुनींनी वर सांगितल्याप्रमाणे कदाचित नाटचमण्डपाचे माप दण्डांत (=९६ अंगुले) दिले असेल; परंतु नाटचमण्डपाचे माप हातांतच (= २४ अंगुले) घ्यावयास हवे. त्याची कारणे येणेप्रमाणे–

विकृष्ट मध्यम नाटचमण्डपाचे माप ६४×३२ हातांचे दिले आहे. एक हात २४ अंगुलांचा धरला तर हे माप २९.६२ × १४.३१ मीटर येते; व एक हात ९६ अंगुलांचा धरला तर ११७ × ५८.५ मीटर येते. भरतमुनींनी दिलेली खांबाची रचना आकृती ११ त दिली आहे. येथे खांबांमधील जास्तीत जास्त अंतर १६ हात दिले आहे. ते दण्ड मापात घेतले तर २९.२५ मीटर येते. या खांबांवर छप्पराचे वजन तोलून धरण्यासाठी जी तुळई वापरावयाची तिच्या उंचीचे लांबीशी प्रमाण १:२० जरी घेतले तरी या तुळईची उंची १.४६ मीटर येते. या उंचीची तुळई करण्यासाठी एवढ्या व्यासाचे लाकूड मिळणे केवळ अशक्य आहे. तसेच खांबांमधील कमीत कमी अंतर आठ हात आहे. या खांबावर जी तुळई ठेवावयाची तिची उंची देखील ०.७३ मीटर लागेल. या उंचीचे देखील लाकूड मिळणे दुरापास्त आहे. तेव्हा मंडपाच्या बांधणीच्या दृष्टीने नाटचमण्डपाची मापे ही २४ अंगुलांच्या हाताच्या मापाने घ्यावयास हवीत.

नाट्यमण्डपाची लांबी अशी असावी, की नटाचे हावभाव मुद्राभिनय प्रेक्षकांना नीट दिसावयास हवेत याकडे भरतमुनींचा कटाक्ष आहे. नाट्यगृहाच्या आधुनिक शास्त्राप्रमाणे नटाच्या चेहऱ्यावरील रंगरंगोटी तसेच त्याचा मुद्राभिनय हा प्रेक्षक व नट यांच्यामधले अंतर १५ मीटरपेक्षा जास्त असेल तर प्रेक्षकाला नीट दिसू शकणार नाही. तेव्हा नाट्यगृहाची जास्तीत जास्त लांबी २५ मीटरपेक्षा जास्त असू नये. भरतमुनींच्या विकृष्ट मध्यम नाट्यमण्डपाच्या हातांच्या मापाशी ( २९.२५ मीटर लांबी ) वरील वैज्ञानिक मत बरोबर लागू होते. म्हणूनही नाट्यमण्डपाचे माप हे २४ अंगुलांच्या हाताच्या मापात घ्यावयास हवे. ध्वनिशास्त्रदृष्टचाही नाट्यमण्डपाचे माप २५ मीटरपेक्षा जास्त असू नये.

**जमिनीची परीक्षा**

एकदा नाट्यगृहाचा आकार, त्याची एकंदर लांबी व रुंदी यांची मापे ठरल्यानंतर नाट्यगृहास योग्य अशी जागा शोधावयास हवी. त्यासाठी प्रथम जमिनीची परीक्षा करावयास हवी. मध्ययुगीन शिल्पशास्त्रावरील ग्रंथांवरून ही माहिती खाली देत आहे.

मातीची परीक्षा तिचा वर्ण, गंध, रस, ध्वनी व स्पर्श यांवरून करतात.

**वर्ण**– माती एका रंगाची असावी. पांढऱ्या रंगाची माती सर्वोत्तम, लाल व पिवळ्या रंगाची माती उत्तरोत्तर कमी दर्जाची समजतात. काळी अथवा निळी माती निकृष्ट अतएव त्याज्य समजतात ( समरांगण सूत्रधार ८.४८ व ८.५६; शिल्पदीपक १.२३; राजवल्लभ १.१३; अग्निपुराण ९२.७; मत्स्यपुराण २५३.११–१२).

भरतमुनींनादेखील पांढरी माती उत्तम व काळी माती निकृष्ट हे माहिती होते म्हणून त्यांनी 'कृष्णा गौरी च या भवेत्' (ना. शा. २.२४½ ) असे म्हटले आहे.

**गंध**– मातीचा गंध चांगला हवा. जिचा गंध कुंकू, अगरू, कापूर, चंदन यांच्यासारखा किंवा यांच्या मिश्रणासारखा येतो ती माती

वास्तूच्या पायासाठी उत्तम. किंवा मातीला गोमूत्र, गोदुग्ध, दही, तूप, दारू, आसव किंवा धान्याच्या पिठासारखा गंध येत असेल तर ती माती देखील उत्तम समजतात. मातीला घाणेरडा वास येत असेल, पक्षी, मासे किंवा प्रेत यांच्यासारखा दुर्गंध येणारी माती त्याज्य समजावी (समरांगण सूत्रधार ८.४६–४७ व ५८; शिल्पदीपक १.२३; राजवल्लभ १.१३; मानसार ४.११).

**रस**– ज्या मातीची चव चांगली आहे ती सर्वोत्तम. जिची चव तिखट किंवा आंबट आहे ती मध्यम प्रतीची व जिची चव कडू किंवा मीठासारखी खारट असेल ती निकृष्ट प्रतीची जमीन समजतात (समरांगण सूत्रधार ८.४९ व ६०; शिल्पदीपक १.२४; राजवल्लभ १.१३; बृहत्संहिता ५३.९७; मत्स्य पुराण २५३.१२–१३).

**ध्वनी**– माती ठोकली असताना मृदंग, बासरी, नगारा, हत्तीच्या तुतारीसारखा किंवा घोड्याच्या खिंकाळण्यासारखा खणखणीत व सागराच्या गर्जनेसारखा गंभीर असा आवाज असलेली माती उत्तम असते. उंटाच्या गडगडण्यासारखा, गाढवाच्या ओरडण्यासारखा किंवा फुटक्या मडक्यासारखा बद्द आवाज येणारी माती वास्तू उभारावयास योग्य नाही (समरांगण सूत्रधार ८.५१,६२; तंत्रसमुच्चय १.३०,३२; शिल्पप्रकाश १.१३–१६).

**स्पर्श व तापमान**– उन्हाळ्यात थंड व हिवाळ्यात ऊष्ण लागणारी माती उत्तम. जिचा स्पर्श खरखरीत आहे अशी जमीन योग्य नाही (समरांगण सूत्रधार ८.५०,६१).

जाय सेनापतींनी* नृत्तरत्नावलीत जमिनीच्या तापमानावरून तिची परीक्षा कशी करावी याची माहिती वरीलप्रमाणेच दिली आहे.

याशिवाय त्याज्य जमिनीची लक्षणे अशी–

ज्या जमिनीत फार फटा आहेत, वारुळे, मेलेल्या प्राण्यांचे सांगाडे, केस वगैरे आहेत व जमीन नांगरताना जिच्यातून लाकडाचे

---

* हेमन्ते शिशिरे चोष्णा वसन्तग्रीष्मयोर्हिमा ।
घनागमपगमयोः साधारणगुणा तथा ॥ ७.३ ॥

सडके तुकडे, कोळसा व त्याची राख किंवा हाडे मिळतील तर ती जमीत त्याज्य समजावी (समरांगण सूत्रधार ८.५३–५४; विश्वकर्मवास्तुशास्त्र ५.२६–२७; मानसार ४.८; तन्त्रसमुच्चय १.३१). जमिनीत क्षारांचे प्रमाण कमी असावे (बृहत्संहिता ५३.८८; हयशीर्ष पंचरात्र ८.१० ची टीका; वास्तुविद्या २.३९; अपराजितपृच्छा ५१.२८).

वरील माहिती ज्या संदर्भग्रंथांवरून दिलेली आहे ते भरतमुनींच्या काळानंतर लिहिले गेलेले असले तरी ही माहिती फार पूर्वीपासून चालत आलेली असावी. शतपथब्राह्मणातदेखील यज्ञासाठी चांगली जमीन शोधून काढावी असे सांगितले आहे. चांगल्या जमिनीचे गुणधर्मही तेथे दिले आहेत (३.१.१.१ – २).*

जमीन कितपत मजबूत आहे, पाण्यामुळे ती कितपत मऊ होते हे जाणून घेण्यासाठी काही परीक्षा शिल्पशास्त्रावरील ग्रंथांत दिलेल्या आहेत. त्यांतील दोन महत्त्वाच्या परीक्षांची माहिती देतो :

जमिनीच्या कठिणतेची परीक्षा–

एक हात लांब, रुंद व खोल खड्डा खणावा. त्यातील बाहेर काढलेली माती पुन्हा त्या खड्ड्यात दाबून दाबून भरावी. खड्डा भरल्यानंतरही जर त्यातून खणून काढलेली माती उरली तर ती

---

* आ इ म । देवयजनं जोषयन्ते । स यदेव वर्षिष्ठꣳ स्यात्तज्जोषयेरन्यदन्यद् भूमेर्नाभि शयीतातो वै देवा दिवमुपोदक्रामन्देवान्वाऽएष उपोत्क्रामति यो दीक्षते स सदेवे देवयजने यजते स यद्धान्यद्भूमेरभिशयीतावरतर इव हेष्ट्वा स्यात्तस्माद्यदेव वर्षिष्ठꣳ स्यात्तज्जोषयेरन् ॥ ३.१.१.१ ॥

तद्वर्ष्म सत्समꣳ स्यात् । समꣳ सदविभ्रꣳशि स्यादविभ्रꣳशि सत्प्राक्प्रवणꣳस्यात् ... ॥ ३.१.१.२ ॥

मराठी भाषांतर–

ते यज्ञाच्या स्थलाचा तपास करतात. जी सगळ्यांत उंच जागा असेल तिचा तपास करावा; तिच्याहून कोणतीही जमीन उंच नसावी ... ... ॥ ३.१.१.१ ॥

ती उंच जागा चौरस असावी. चौरस असून पुन्हा स्थिर असावी. स्थिर असून शिवाय पूर्व दिशेकडे उतरती असावी...... ॥ ३.१.१.२ ॥

माती कठिण समजावी व अशी जमीन वास्तूच्या पायास सर्वोत्तम असते. खड्डा पूर्ण भरण्यास सर्व माती लागली तर ती मध्यम प्रकारची माती. मात्र जर सर्व माती खड्डयात भरूनही खड्डा पूर्णपणे भरला नाही तर अशी माती निकृष्ट असून पायासाठी कधीही वापरू नये ( समरांगण सूत्रधार ८.६७–६९; मानसार ५.१७–१८; बृहत्संहिता ५५.९२; अपराजितपृच्छा ५१.७–८; हयशीर्ष पंचरात्र ६.१०; शिल्पदीपक १.२६; राजवल्लभ १.१६ ).

पाण्याचा जमिनीवर परिणाम–

एक हात लांब, रुंद व खोल खड्डा खणावा. त्यात काठोकाठ पाणी भरावे. नंतर खड्डयापासून शंभर पावले सावकाश चालत जावून परत खड्डयाकडे यावे. जर खड्डयातील पाण्याची पातळी मुळीच खाली उतरली नसेल तर ती जमीन सर्वोत्तम. पाण्याची पातळी एक यवाहून ( ३ मि. मी. ) कमी किंवा त्याहून जास्त खाली गेली असेल तर ती माती अनुक्रमे मध्यम व कनिष्ठ प्रकारची समजावी. ( समरांगण सूत्रधार ८.७२; शिल्परत्न ३.१९; ईशानशिवगुरुदेवपद्धति २३.३९–४०; हयशीर्ष पंचरात्र ६.१०; शिल्पदीपक १.२६; राजवल्लभ १.१६ ).

जमिनीची कठिणता तपासण्याची परीक्षा ब्राह्मणकालापासून प्रचलित होती. शतपथब्राह्मणात* तिचे वर्णन दिले आहे.

वरील माहितीवरून समजून येईल की भरतमुनी प्रथम मातीची परीक्षा करावी ( ना. शा. २.२४ ) असे म्हणतात ते उगीचच नव्हे. त्यांच्या काळीही मातीचे परीक्षण करावयाची रीत प्रचलित होती. मात्र येथेच काळी माती असली तरी चालेल, ती कठिण, समतल व स्थैर्ययुक्त असावी असे पुढे जे भरतमुनी

---

* अथ खनति । प्राञ्चमुत्करमुत्किरति... ॥ ३.६.१.६ ॥ अथ मिनोति ... ॥ ३.६.१.१६ ॥ अथपर्यूहति ... ॥ ३.६.१.१.७ ॥ अथपर्युषति । ... समं भूमिपर्युषणं करोति गर्तस्य बाऽउपरि भूम्यथैवं देवता तथा हागर्तमिद्भवति ॥ ३ ६.१.१८ ॥

म्हणतात (ना. शा. २.२४½) ते मात्र वदतोव्याघाताचे उत्तम उदाहरण आहे. काळ्या रंगाची माती कठिण सापडणे अवघडच. पुढे-देखील (ना. शा. २.६९) रंगपीठ काळ्या मातीनेच (प्रयत्नतः) भरून काढावे असा काळी माती वापरण्याबद्दल भरतमुनींनी आग्रह दर्शविला आहे. काळ्या मातीबद्दल त्यांची ही पसंती समजणे जरा अवघड आहे. याबद्दलची अधिक चर्चा पुढे आली आहे.

जमिनीची परीक्षा करून ती कठीण, समतल म्हणजे खड्डे वगैरे नसलेली, तसेच वास्तू उभारल्यावर ती स्थिर राहील इतकी मजबूत आहे अशी खात्री पटल्यावर नंतर ती नांगरून तेथील गवत, गवताची मुळे, हाडे वगैरे असल्यास काढून टाकून जमीन साफ करावयाची. नंतर पुष्यनक्षत्राचा शुभमुहूर्त पाहून, वास्तूच्या आखणीस लागावे. त्यासाठी पांढऱ्या रंगाची दोरी वापरावी (ना. शा. २.२७). भरतमुनी दोरी कापूस किंवा मुंज, बल्बज अथवा झाडांच्या सालींची (वल्कलांची) करावी असे म्हणतात. कापूस तसेच झाडाची साल यांची दोरी तयार करून वास्तूच्या आखणीसाठी उपयोग करतात हे भरतमुनींच्या नाटचशास्त्रावरूनच समजते. शुल्ब सूत्रांत* जेथे वेदी, यज्ञमंडप यांची अचूक आखणी कशी करावी याची माहिती दिली आहे तेथे मुंज, बल्बज या गवताची दोरी करावी असे म्हटले आहे. असो. अभिनवगुप्तला मात्र निराळेच संकट येथे दिसले. ते म्हणजे भरतमुनी प्रथम 'शुक्लसूत्रं प्रसारयेत्' असे दोरीचा रंग पांढरा असावा असे म्हणतात, व ती मुंज वगैरे गवताची किंवा झाडांच्या सालीची करावी असेही म्हणतात. ही संगती कशी लावावयाची ? तेव्हा अखेरीस या आखणीच्या दोऱ्या पीठाने पांढऱ्या कराव्यात § व वापराव्यात असा तोडगा त्यांनी शोधून काढला आहे. लेखकापेक्षा टीकाकार कसा हुशार असतो त्याचे हे उत्तम उदाहरण आहे.

---

* स्पष्टा भूमिर्ऋजुः शङ्कुमौञ्जं शुल्बबन्धुरम्। मानवशुल्बसूत्र १०.३.१.२.

§ 'शुक्लसूत्रत्वं तावत् पिष्टरञ्जनादिना' ना. शा. २.२७ ची अभिनवभारती.

तसेच भरतमुनींनी मुंज, बल्बज, कापूस वगैरे दोरी करावयाच्या पदार्थांची मुद्दाम नावे दिली आहेत कारण चामडयाची दोरी या कामासाठी वापरू नये असे भरतमुनींना म्हणावयाचे आहे, असेही अभिनवभारती म्हणते. चामडयाचे दोर आखणीसाठी वापरावयाची पद्धत फार पुरातन आहे. शतपत ब्राह्मणात† (१.२.५.२) असुरांनी बैलाच्या चामडयाच्या साहाय्याने जमिनीची विभागणी केली असा उल्लेख आला आहे. जमिनीची आखणी चामडयाच्या दोरीने करावयाची प्रथा असुरांत असल्याने अशी दोरी नाटयमंडपाच्या आखणीसाठी वापरू नये, असे म्हटले असावे.

नाटयमंडपाची आखणी अचूक व्हावी म्हणून दोरी मजबूत असावी, यासाठी भरतमुनींनी आखणी करताना दोरी तुटली तर काय भयंकर परिणाम होतील तेही मुद्दाम सांगितले आहे (ना. शा. २.२९–३०). मंडपाची आखणी हा मंडपाच्या उभारणीचा एक लहानसा टप्पा असल्याने भरतमुनींनी त्याचे सविस्तर वर्णन केलेले नाही. येथे एवढे नमूद करावयास हरकत नाही, की आयताकार किंवा चौरस मंडपाची आखणी करताना अचूक काटकोन जमिनीवर आखावयाचे ज्ञान भारतीयांना इ. स. पूर्व आठव्या शतकापासून, बौद्धायन शुल्बसूत्रांपासून माहीत होते. बौद्धायन शुल्बसूत्रांत ३, ४ व ५ हातांचा किंवा १२, १५ व १७ हातांचा त्रिकोण करून जमिनीवर काटकोन कसा आखावा याची माहिती दिली आहेच; पण कर्णावरील चौरसाचा सिद्धांतदेखील दिला आहे. काटकोन त्रिकोणाच्या कर्णावरील चौरसाचे क्षेत्रफळ त्याच्या इतर बाजूंवरील चौरसांच्या क्षेत्रफळाच्या बेरजेइतके असते,¶ हा तो सिद्धांत. त्रिकोणी मंडपासाठी समभुज त्रिकोण जमिनीवर अचूक आखताना, काय

† देवाश्च वा ऽ असुराश्च । उभये प्राजापत्याः प्रस्पृधीरे ततो देवा अनुव्यमिवासुरथ हासुरा मेनिरे ऽ स्माकमेवेदं खलु भुवनमिति ॥१.२.५.१॥
ते होचुः हन्तेमां पृथिवीं विभजामहै तां विभज्योपजीवामेति ता**मौक्ष्णैश्चर्मभिः** पश्चात् प्राञ्चो विभजमाना अभीयुः ॥ १.२.५.२ ॥

¶ दीर्घचतुरस्रस्याक्षणयारज्जुः पार्श्वमानी तिर्यङ्मानी च यत् पृथग्भूते कुरुतस्तदुभयं करोति ॥ बौ. शु. सू. १.४८ ॥

काळजी घ्यावयास हवी व तिन्ही कोण सारखेच कसे येतील याचे ज्ञान भरतमुनिकाळी नक्कीच असले पाहिजे.

**नाट्यमंडपाचे विभाग**

नाट्यमंडपासाठी आखणी करताना त्याचे प्रमुख विभाग आखावयास हवेत. भरतमुनींनी आयताकार मंडपाचे प्रामुख्याने दोन भाग पाडलेत. नेपथ्य, रंगपीठ (त्याचा पृष्ठभाग म्हणजे रंगशीर्ष) हे मिळून प्रेक्षागृह होते व दुसरा विभाग म्हणजे प्रेक्षक जेथे बसतात ते प्रेक्षकगृह. प्रेक्षागृह व प्रेक्षकगृह यांनी नाट्यमंडपाचे दोन सारख्या मापाचे विभाग होतात.

विकृष्ट मंडपाचे माप आहे ६४ हात लांबी व ३२ हात रुंदी. प्रथम त्यातील ६४ हात लांबीचे दोन सारख्या प्रमाणात विभाग पाडावयाचे (ना.शा. २.३३). या दोन विभागांपैकी मागच्या बाजूला जो ३२ हातांचा विभाग आहे, त्याचे १६ हातांचे दोन सारखे विभाग पाडावेत. या दुसऱ्या विभागाचे जे दोन भाग पाडलेत त्यातील पाठीमागचा (पश्चिम दिशेकडील) १६ हात रुंदीचा व ३२ हात लांबीचा भाग नेपथ्यगृहाचा असतो व उरलेल्या १६ हात रुंदीच्या व ३२ हात लांबीच्या भागास रंगशीर्ष म्हणतात (ना.शा. २. ३४–३५). तेव्हा प्रेक्षागृह ३२×३२ हातांचे. त्यातील रंगशीर्ष १६ ×३२ हातांचे व त्यामागील नेपथ्यगृह १६×३२ हातांचे. प्रेक्षकगृह हे ३२×३२ हात मापाचे आहे. भरतमुनींनी एवढेच विभाग दिलेले आहेत. रंगपीठ तसेच मत्तवारणी यांच्यासाठी विभाग आखून दिलेले नाहीत.

निरनिराळ्या टीकाकारांनी नाट्यमंडपाची विभागणी कशी केली आहे ते आता पाहू.

अभिनवगुप्तच्या मताने ६४×३२ हात मापाच्या आयताकृती मंडपात ३२ × ३२ हातांचे पूर्वेकडे प्रेक्षकगृह असते. नंतर पूर्वेकडून पश्चिमेकडे, ८ × ३२ हातांचे रंगपीठ, नंतर ८ × ३२ हातांचे रंगशीर्ष व त्यानंतर १६ × ३२ हातांचे नेपथ्यगृह असते. रंगपीठ पूर्वपश्चिम आठ हातांचे व उत्तरदक्षिण १६ हातांचे असते (आकृती १ अ).




आकृती १ अ
चौरस नाटचमंडप– अभिनवगुप्त

अभिनवगुप्तच्या मताने मत्तवारणी म्हणजे व्हरांडे. ८ × ८ हातांचे चौरस किंवा ८ × १६ हातांचे आयताकृती व्हरांडे रंगपीठा-बाहेर असतात (**आकृती १ ब**).

व्हरांडे हे नेहमी वास्तूच्या बाहेरच्या बाजूला असतात म्हणून मत्तवारणी म्हणजे व्हरांडे हे रंगपीठाच्या बाहेर दाखविले आहेत. या नाटचमंडपाच्या अभिनवगुप्तनी दिलेल्या विभागणीस विश्वेश्वरांनी दुजोरा दिला आहे.




आकृती १ ब

आयताकार मंडप, चौरस मत्तवारणी – अभिनवगुप्त

अभिनवगुप्तचे गुरू भट्टतोत यांच्या मताप्रमाणे नेपथ्य, रंगशीर्ष व प्रेक्षकगृह असे तीनच भाग नाटचगृहाचे होतात. मात्र त्यांनी रंगशीर्ष ३२ × १६ हातांचे आहे असे सांगून त्याच्या दोन्ही बाजूंना दुसऱ्या मजल्यावर, म्हणजेच नाटचमंडपाच्या बाहेरच्या बाजूंना ८ हात रुंद व १६ हात लांब अशा दोन मत्तवारणी सांगितल्या आहेत. तेही मत्तवारणीचा अर्थ व्हरांडा असाच करतात ( **आकृती १ क** ).

मध्ययुगीन टीकाकारांपैकी ( नृत्तमंडपलक्षणाच्या अध्यायात (७.२१९ ) जाय सेनापति, प्रेक्षकगृहाचे वर्णन करताना फक्त रंगशीर्षाचा उल्लेख करतो. रंगपीठाकरिता वेगळी जागा त्याने दिलेली नाही. कुंभकर्ण यांनी ( नृत्तरत्नकोश १.१.४८–४९ ) पश्चिमेकडून नेपथ्यगृह ३२×१६ हातांचे, रंगशीर्ष ३२×८ हातांचे, रंगपीठ ३२×८




आकृती १ क

आयताकार नाटयमंडप, आयताकार मत्तवारणी– अभिनवगुप्त (भट्टतोत)

व त्याच्यापुढे सभास्थान ३२×३२ असे विकृष्ट नाटयमंडपाचे विभाग दिले आहेत. मत्तवारणीचा विभाग त्यांनी दिलेला नाही. विप्रदास-देखील ( भरतकोश पृष्ठ ३२० ) कुंभाप्रमाणेच नाटयगृहाचे नेपथ्य, रंगशीर्ष, रंगपीठ व सभासदस्थान असे वर दिलेल्या मापाचे चार विभाग पाडतात. मत्तवारणीचा विभाग त्यांनीही दिलेला नाही.

प्रेक्षकगृह ३२×३२ हात, रंगपीठ ८×१६ हात, रंगशीर्ष ८×३२ हात, नेपथ्यगृह १६×३२ हात व रंगपीठाच्या शेजारी, मात्र नाटयमंडपाच्या आत ८×८ हातांच्या दोन मत्तवारणी अशी नाटय-




अ
विप्रकृष्टमध्य नाट्यमंडप




ब
चतुरस्र नाट्यमंडप




क
त्रिकोणी नाट्यमंडप

आकृती २ : सुरेन्द्रनाथ दीक्षित

गृहाची विभागणी सुब्बाराव व मनमोहन घोष सोडून इतर आधुनिक विद्वानांनी केलेली आहे. ते विद्वान म्हणजे केतकर, पिशारोटि राघवन्, सुरेन्द्रनाथ दीक्षित, मंकड, याज्ञिक, चंद्रभान गुप्ता हे होत (**अनुक्रमे आकृती ५, १५, २, १३, १४, १६ पहा**).

मनमोहन घोष हे रंगपीठ व रंगशीर्ष हे दोन्ही शब्द एकाच अर्थी मानतात. त्यांनी ३२×४० हात प्रेक्षकगृह, १६×८ हात रंगशीर्ष, त्याच्या दोन्ही बाजूंना रंगमंडपात ८×८ हातांच्या मत्तवारणी म्हणजे व्हरांडे व पाठीमागे ३२×१६ हातांचे नेपथ्यगृह अशी विभागणी दिली आहे (**आकृती ३**).




**आकृती ३ अ**

आयताकार मंडप – मनमोहन घोष

सुब्बाराव मत्तवारणीचा अर्थ व्हरांडा करीत नाहीत व त्यांच्या मते रंगशीर्ष म्हणजे रंगपीठाचा पृष्ठभाग. तेव्हा त्यांनी




ब
चौरस मंडप

क
त्रिकोणी मंडप

आकृती ३ : मनमोहन घोष




आकृती ४ अ : आयताकार मंडप – सुब्बाराव




ब चौरस नाटचमंडप




क

त्रिकोणी नाटचमंडप




ड




इ

आकृती ४

३२×३२ हातांचे प्रेक्षकगृह, ३२×१६ हातांचे रंगपीठ व ३२×१६ हातांचे नेपथ्यगृह असे नाटचमंडपाचे तीनच विभाग पाडले आहेत. प्रस्तुत लेखकाच्या मते हीच नाटचमंडपाची विभागणी भरतमुनींच्या मतानुसार आहे ( **आकृती ४** ).

मत्तवारणीबद्दलची माहिती पुढे दिली आहे. सध्याचा महत्त्वाचा प्रश्न म्हणजे ३२×१६ हातांचे नेपथ्यगृह सोडून प्रेक्षागृहाच्या उरलेल्या ३२×१६ हात विभागाचे रंगपीठ व रंगशीर्ष असे प्रत्येकी आठ हात रुंदीचे दोन विभाग असतात, की ३२×१६ हात मापाचा एकच विभाग असतो.

प्रेक्षागृहाचे नेपथ्यगृह, रंगशीर्ष व रंगपीठ असे तीन भाग होतात, हे मत विश्वेश्वरांनी व्यवस्थित दिले असल्याने ज्या टीकाकारांच्या मते प्रेक्षागृहाची विभागणी या तऱ्हेने होते त्यांचे मत विश्वेश्वरांच्या पद्धतीने मांडतो :

१ ) प्रथम आयताकार नाटचमण्डप ' द्विधा कुर्यात् ' असे सांगून भरतमुनींनी ६४×३२ हाताच्या जागेच्या लांबीचे दोन भाग पाडले आहेत. त्यामुळे ३२×३२ हातांचे दोन चौरस मिळतात.

२ ) यानंतर या दोन भागांपैकी जो मागचा भाग आहे (पृष्ठतो यो भवेद् भागो ) त्याचे ' द्विधाभूतस्य तस्य तु ' असे सांगून भरतमुनींनी दोन विभाग केले आहेत. तेव्हा ३२×१६ हातांचे दोन भाग झालेत. यांपैकी ३२×१६ हातांचा जो पुढला भाग त्याचे पुन्हा,

३ ) ' सममर्धं विभागेत ' असे सांगून भरतमुनींनी दोन सारखे विभाग ८×३२ हातांचे पाडले आहेत.

४ ) शेवटला १६×३२ हातांचा विभाग.

तेव्हा, पूर्वेकडून पश्चिमेकडे, ३२×३२ हातांचे प्रेक्षकगृह, नंतर ८×३२ हातांचे रंगपीठ, ८×३२ हातांचे रंगशीर्ष व १६×३२ हातांचे नेपथ्यगृह असे चार विभाग नाटचगृहाचे पडतात.

प्रेक्षागृहाचे नेपथ्यगृह सोडून रंगपीठ व रंगशीर्ष असे दोन भाग पडतात हे सांगण्यास काही अडचणी येतात त्या अशा—

भरतमुनींनी 'द्विधाभूतस्य तस्य तु' असे म्हटले आहे. हे सर्व शब्द नाटचमंडपाची विशेषणे आहेत. दोन भाग पाडलेल्या त्या नाटचमंडपाचा जो मागच्या बाजूचा (यो भागो पृष्ठतो भवेत्) भाग येतो त्याचे पुन्हा दोन सारखे भाग पाडावेत (सममर्धविभागेन रंगशीर्षं प्रकल्पयेत्). त्यांतील एक भाग रंगशीर्ष व पाठीमागील नेपथ्यगृह असते (पश्चिमे च विभागेऽच नेपथ्यगृहमादिशेत्) असा ना. शा. २.३३–३४ या सरळ अर्थ होतो.

विश्वेश्वर 'द्विधाभूतस्य तस्य तु' या शब्दप्रयोगाने प्रेक्षागृहाचे १६ × ३२ हातांचे दोन भाग पाडतात ते योग्य वाटत नाही. वरील शब्दप्रयोगाचा अर्थ 'दोन भाग पाडलेल्या नाटचमंडपाचा' असा होतो.

शिवाय रंगपीठ व रंगशीर्ष असे दोन भाग असतील तर रंगपीठाचा येथे उल्लेख नाही व रंगशीर्ष हे एकवचनी आहे. विश्वेश्वर यासाठी 'रंगशीर्षे' असा रंगशीर्षाचा द्विवचनी पाठ असावयास पाहिजे असा तोडगा काढतात. तो अर्थात अप्रयुक्त आहे.

मंकड यांनी रंगपीठ व रंगशीर्ष असे दोन विभाग आहेत हे सिद्ध करण्यासाठी श्लोक २.१०० चा आधार घेतला आहे.

**समुन्नतं समं चैव रंगशीर्षं तु कारयेत् ।**
**विकृष्टे तून्नतं कार्यं चतुरस्रे समं तथा ॥ ना. शा. २.१०० ॥**

मंकडांच्या मताप्रमाणे समुन्नत व सम अशा दोन प्रकारच्या रंगशीर्षांची माहिती देताना विकृष्ट नाटचमंडपात अधिक उंच रंगशीर्ष बांधावयास पाहिजे. आता रंगशीर्ष कशाहून उंच बांधावयाचे तर रंगपीठाहून असा येथे भरतमुनींचा अभिप्राय आहे असे म्हणून रंगशीर्ष व रंगपीठ असे दोन विभाग आहेत असे दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. अर्थात तो लंगडा आहे. येथे कसाही प्रयत्न केला तरी रंगशीर्ष रंगपीठाहून उंच असते असे या श्लोकात म्हटले आहे, इंगिताने दर्शविले आहे असे सिद्ध करता येत नाही. डॉ. व्ही. राघवन्ही याच श्लोकाच्या आधारे रंगपीठ व रंगशीर्ष निरनिराळे आहेत असे सांगतात. अभिनवगुप्तच्या टीकेचा या टीकाकारांच्या

मतावर बराच प्रभाव पडलेला दिसतो. या श्लोकाचा प्रस्तुत लेखकाला वाटणारा अर्थ पुढे योग्य ठिकाणी दिला आहे.

तसेच मंकड म्हणतात की श्लोक २.६८ त रंगपीठ व रंगशीर्ष यांचा निरनिराळा उल्लेख आला आहे. या मताचे खंडण सुब्बारावांनी रंगपीठ हे उपपीठाप्रमाणे व रंगशीर्ष म्हणजे त्याचा पृष्ठभाग असा अर्थ लावून केले आहे व तो अर्थ योग्य वाटतो. पुढे श्लोक २.६९–७१ मध्ये रंगपीठ काळ्या मातीने भरून काढावे असे म्हटले आहे व त्याचा जो पृष्ठभाग ते रंगशीर्ष व ते सपाट आरशाप्रमाणे समतल असावे असा आदेश दिला आहे.

मनमोहन घोषांनी रंगपीठ व रंगशीर्ष हे दोन विभाग नसून एकच आहेत यासाठी दिलेले मुद्दे असे–

१. नाट्यशास्त्राच्या पहिल्या अध्यायात नाट्यमंडपाच्या निरनिराळ्या विभागांचे रक्षण करण्याची जी व्यवस्था सांगितली आहे, तेथे रंगशीर्षाचा उल्लेख नाही. फक्त रंगपीठाचा उल्लेख आहे.

**पार्श्वे च रंगपीठस्य महेन्द्रः स्थितवान् स्वयम् ।**
**स्थापिता मत्तवारण्यां विद्युत्दैत्यनिषूदनी ॥ ना. शा. १.९० ॥**

**रंगपीठस्य मध्ये तु स्वयं ब्रह्मा प्रतिष्ठितः ।**
**इष्टयर्थं रङ्गमध्ये तु क्रियते पुष्पमोक्षणम् ॥ ना. शा. १.९५ ॥**

२. दुसऱ्या अध्यायात श्लोक २.३२–३३, जेथे नाट्यमंडपाची विभागणी दिली आहे तेथे फक्त रंगशीर्षाचा उल्लेख आहे, रंगपीठाचा नाही. तेव्हा पहिल्या अध्यायात ज्याला रंगपीठ म्हटले आहे, त्यालाच येथे दुसऱ्या अध्यायात रंगशीर्ष म्हटले आहे.

३. दुसऱ्या अध्यायात श्लोक ७२, ७३ व ७५ मध्ये फक्त रंगशीर्षाचा उल्लेख आहे. रंगपीठाचा उल्लेख येथे नाही. तसेच काही हस्तलिखितांत ‘ रंगशीर्षं प्रशस्यते ’ या जागी ‘ रंगपीठं प्रशस्यते ’ असाही पाठभेद मिळतो. त्यावरून असे वाटते की रंगपीठ व रंगशीर्ष हे शब्द एकाच अर्थी वापरलेले आहेत.

४. दुसऱ्या अध्यायात श्लोक १०२ ते १०४ मध्ये त्रिकोणी नाट्यमंडपाचे वर्णन आले आहे. येथे पुन्हा रंगपीठाचा उल्लेख आहे, रंगशीर्षाचा उल्लेख नाही. तेव्हा रंगशीर्ष व रंगपीठ हे वेगळे विभाग नाहीत.

५. दुसऱ्या अध्यायाच्या श्लोक ९०, ९१, ९६ व ९८ मध्ये चौरस नाट्यमंडपाचे वर्णन करताना रंगपीठाचा उल्लेख आला आहे व श्लोक १०० मध्ये रंगशीर्षाचा उल्लेख आला आहे. मात्र तेथेही रंगपीठ हा पाठभेद आहे.

तेव्हा या सर्व पुराव्यावरून रंगपीठ व रंगशीर्ष हे दोन्ही शब्द समानार्थी वापरलेले आहेत.

सुब्बारावांनी जरी तसे पुरावे दिलेले नसले, तरीही रंगपीठ म्हणजे उपपीठासारखा भाग व रंगशीर्ष म्हणजे त्याचा पृष्ठभाग असा अनुक्रमे रंगपीठ व रंगशीर्ष यांचा अर्थ केल्यास वर उल्लेखिलेल्या श्लोकांचा अर्थ अधिक व्यवस्थित लागतो, असे प्रस्तुत लेखकाचे मत आहे. ते कसे ते आता पाहू–

१. श्लोक १.९० व १.९५ येथे रंगपीठाचा उल्लेख आहे व तेथे रंगपीठ म्हणजे उपपीठ असा अर्थ घेतल्यास श्लोकाचा अर्थ नीट लागतो.

२. श्लोक २.३२–३३ मध्ये विकृष्ट नाट्यमंडपाची विभागणी दिली आहे. येथे रंगशीर्ष म्हणजे रंगपीठाचा पृष्ठभाग असा अर्थ केला, की श्लोक २.३३ चा अर्थ अधिक स्पष्ट होतो. कारण येथे विभागणी जमिनीची, पृष्ठभागाची करावयाची आहे.

३. श्लोक २.७२,७३ व ७५ मध्ये रंगशीर्षाची, रंगपीठाच्या पृष्ठभागाची माहिती आहे. रंगशीर्ष कासवाच्या पाठीप्रमाणे बहिर्वक्र किंवा माशाच्या पाठीप्रमाणे अंतर्वक्र नसावे; तर सपाट आरशाप्रमाणे समतल असावे, असे रंगपीठाच्या पृष्ठभागाचे वर्णन केले आहे. म्हणून येथे रंगशीर्ष हा शब्द वापरला आहे. रंगपीठ हा वेगळा भाग असता तर त्याच्याही पृष्ठभागाची लक्षणे द्यावयास हवी होती. खरे म्हणजे नाट्यमंडपाची विभागणी करतानाच ( श्लोक २.३२–३३ ) रंगपीठ

व रंगशीर्ष असे दोन विभाग दिलेले नाहीत. तेव्हा जे रंगशीर्ष वेगळे दिलेले नाही त्याच्या पृष्ठभागाची लक्षणे कशी देणार ?

४. श्लोक २.१०३ मध्ये त्रिकोणाकृती नाटचमंडपाचे वर्णन आहे व तेथे रंगपीठ हा शब्द आला आहे. तेथेदेखील रंगपीठ हे पीठ या अर्थी घेतले म्हणजे योग्य अर्थ लागतो. रंगपीठाच्या वर दुसरे दार करावे, असे म्हटले आहे. रंगपीठ हे पुढे व रंगशीर्ष मागे असा विभाग केल्यास रंगशीर्ष व रंगपीठ यांच्यामध्ये भिंत असून तेथे दार असते, असा अर्थ येथे काढावा लागतो. तो अर्थातच भरतमुनींना अभिप्रेत नाही.

५. श्लोक २.९०,९१,९६ व ९८ येथे रंगपीठाचा अर्थ पीठ या अर्थी आहे व श्लोक २.१०० मध्ये रंगशीर्ष हा शब्द आला आहे; कारण रंगपीठाचा पृष्ठभाग कसा असावा याबद्दलची माहिती या श्लोकात आलेली आहे.

तेव्हा रंगपीठ म्हणजे पीठ व रंगशीर्ष म्हणजे त्या पीठाचा पृष्ठभाग असा या दोन निरनिराळ्या शब्दांचा अर्थ घ्यावयास हवा. ते दोन निरनिराळे विभाग नाहीत.

यानंतर श्लोक २.३५–४२ पर्यंत पायाभरणीच्या वेळच्या पूजेचे वर्णन आहे. पाया खोदून झाल्यावर पायाच्या भिंती बांधून काढाव्यात असे श्लोक २.४३ मध्ये सांगितले आहे. नंतर नाटचमंडपाच्या चारी कोपऱ्यांवर जे खांब रोवावयाचे त्यांचे वर्णन आले आहे. आग्नेय कोपऱ्यात ब्राह्मणस्तंभ, नैर्ऋत्य कोपऱ्यात क्षत्रियस्तंभ, वायव्य व ईशान्य कोपऱ्यांत अनुक्रमे वैश्य व शूद्रस्तंभ रोवतात (ना. शा. २.४६–४९). येथे खांबांना जी जातिवाचक नावे दिली आहेत ती त्या त्या जातींनी त्या त्या खांबांचे संरक्षण करावे या अर्थी दिली आहेत. श्लोक १.८६ मध्ये खांबांचे रक्षण करण्याचे काम चारी वर्णांना दिले असा उल्लेख आहे.† श्लोक २.४४ ते ६२ पर्यंत खांब रोवतांना करावयाचा

† पहिल्या अध्यायात विश्वकर्म्याने दाखविलेल्या समुद्रमंथनाच्या नाटकात देवांचा जय व दानवांचा पराभव दाखविला आहे असे पाहून दानव खवळले व त्यांनी नाटकात विघ्ने आणावयास सुरुवात केली, असे दिले आहे. पुढे नाटच-

पूजाविधी, बलिविधी, ब्राह्मण, कर्मचारी व इतरांना भोजनदान यांचे वर्णन आहे.

खांब असा रोवावा, की तो त्याच्या स्थानापासून ढळणार नाही (अचल), स्वत:भोवती फिरणार नाही (अवलित) व कम्प पावणार नाही (अकम्प्य) अशी काळजी घ्यावी व हे दोष राहून गेले तर काय काय भयंकर आपत्ती ओढवतील याचीही माहिती दिली आहे. वास्तूचा मुख्य आधार खांब असल्याने ते पक्के व निर्दोष रोवले गेले पाहिजेत म्हणून येव्हढा कटाक्षपूर्ण उल्लेख येथे आला आहे. एव्हढेच नव्हे, तर खांबांनी हिमालयाप्रमाणे अचल राहावे अशी त्यांची प्रार्थनादेखील दिली आहे. (ना. शा. २.५४–६२)

यानंतर 'मत्तवारणी' या विषयावर नाट्यमंडपाचे वर्णन येऊन ठेपते. 'मत्तवारणी' म्हणजे काय, यावर निरनिराळ्या विद्वानांच्या कल्पना देऊन नंतर प्रस्तुत लेखकाचे त्या विषयीचे मत पुढे दिले आहे.

**मत्तवारणी–**

अभिनवगुप्तने मत्तवारणीचा अर्थ व्हरांडा असा केला आहे व ते दोन आहेत असे म्हटले आहे. मात्र मत्तवारणी हा शब्द व तिचे वर्णन करणारे शब्द पार्श्वे, कर्तव्या, चतु:स्तम्भसमायुक्ता हे एकवचनी आहेत. व्हरांडे जर रंगपीठाच्या दोन्ही बाजूंस असतील, तर हे सर्व शब्द द्विवचनी पाहिजेत. पण एकाच प्रकारचा व्हरांडा दोन्ही बाजूंना असल्याने येथे एकवचनी प्रयोग केला आहे असा निर्वाह अभिनवगुप्तनी केलेला आहे. शिवाय वास्तूचा व्हरांडा घराबाहेर असल्याने त्यांनी मत्तवारणींचे स्थान रंगपीठाच्या (८ × ३२ हातांच्या) दोन्ही बाजूंना मात्र रंगमंडपाच्या बाहेर असे दाखविले आहे. विश्वेश्वरांच्या मताने मत्तवारणीचा अभिनवगुप्तनी केलेला अर्थ व दाखविलेले स्थान बरोबर आहे.

---

मंडपाच्या निरनिराळ्या अवयवांचे कोणी कोणी राक्षसांपासून रक्षण करावे याचे वर्णन श्लोक १.८४–९८ पर्यंत आले आहे. त्यांत 'वर्णाश्चत्वार एवाथ स्तम्भेषु विनियोजिता:' । १.८५ $\frac{१}{२}$ । अशी खांबांच्या संरक्षणाबद्दल माहिती दिली आहे.

केतकरप्रभृती आधुनिक विद्वानांना मत्तवारणीचा अर्थ करणे अवघड गेलेले आहे व त्यांनी मत्तवारणी म्हणजे रंगपीठाच्या दोन्ही बाजूंना ८ × ८ हातांच्या खोल्या ( wings ) असा अर्थ दिला आहे. तेव्हा रंगपीठ ८ × १६ हातांचे व रंगमंडपाच्या आत या मत्तवारणी आहेत ( आकृती ५). केतकरांच्या मते रंगपीठाच्या दोन्ही बाजूंना चार चार खांबांवर उभारलेला लहान मनोरा असा अर्थ मत्तवारणीचा होतो. ' रंगपीठाच्या दोन्ही बाजूंस आठ चौरस हातांचे जे दोन भाग त्यांच्या चारी कोपऱ्यांवर चार खांब असत व खांब उंच काढून हत्तीच्या अंबारीसारखे लहानसे मनोरे उभारीत, यास मत्तवारणी म्हणत.' मत्तवारणीचा हा अर्थ म्हणजे कल्पनेचा डोलारा ( मनोरा ) आहे. मंकड, चंद्रभानगुप्ता वगैरे आधुनिक विद्वानांच्या मताने मत्तवारणी म्हणजे wings. नाटयमंडपाच्या विभागणीच्या वेळेला मत्तवारणींचा आकार व त्यांचे स्थान याबद्दल त्यांचे मत सांगितले आहे.

मत्तवारणीचा योग्य अर्थ लावावयास या विद्वानांपुढे काय समस्या आल्यात ते विश्वेश्वरांनी तिच्याबद्दल जी चर्चा केली आहे तीवरून चांगले कळून येते. म्हणून ती चर्चा येथे देतो.

विश्वेश्वर म्हणतात, मत्तवारणी हा शब्द कोशात किंवा साहित्यात मिळत नाही. मत्तवारण हा शब्द मिळतो. कोशात त्याचा अर्थ व्हरांडा असा आहे. शब्दकल्पद्रुम या कोशात ' मत्तं वारयतीति मत्तवारण: ' अशी व्युत्पत्ती देऊन 'प्रासादवीथीनां वरण्ड: ' असा मत्तवारणाचा अर्थ दिला आहे. कुट्टिनीमत नावाच्या ग्रंथात ' दिव्यधराधरभूमिरिव राजति मत्तवारणोपेता' असा मत्तवारणाचा उल्लेख आला आहे व त्याचा टीकाकार दामोदर गुप्त 'प्रासाद-वीथीनां वरण्ड:' असाच मत्तवारणीचा अर्थ देतात. महाकवी सुबन्धूच्या वासवदत्तात 'मत्तवारणयोर्वरण्डकेण' असा मत्तवारणाचा उल्लेख आहे.

मत्तवारणी हा शब्द भरताच्या नाटयशास्त्राखेरीज इतरत्र कोठेच मिळत नाही. तेव्हा असे अनुमान काढावे लागते की मत्तवारण




अ

आयताकार मंडप




ब

चौरस नाटचगृह




क

त्र्यस्र नाटचगृह

आकृती ५ –केतकर

या शब्दात ' नामैव स्त्रीति पेशलम् ' या सिद्धान्ताच्या अनुसार कदाचित मत्तवारणी असा बदल केला गेला असावा; परंतु डॉ. मिराशींच्या मताने मत्तवारण या शब्दाचे स्त्रीलिंगी रूप मत्तवारणा होईल.

मत्तवारणी हा शब्द व त्याला अनुषंगून आलेले शब्द एकवचनी आहेत, द्विवचनी नाहीत ही अडचण आहेच. विश्वेश्वर तो अर्धश्लोकच ' पार्श्वयो रंगपीठस्य कर्तव्यौ मत्तवारणौ ' असा बदलावयास तयार झाले आहेत. ते अर्थातच योग्य नाही.

डॉ. शहा व संदेसर [१७] मत्तवारणीचा अर्थ झरोका करतात. डॉ. मिराशींच्या [१७] मताने मत्तवारणी म्हणजे बाल्कनी, बोळ, खोली, कक्ष्या. मत्तानां राक्षसादीनां वारणी मत्तवारणी कक्ष्या । अशी ते मत्तवारणी शब्दाची व्युत्पत्ती देतात. डॉ. मिराशींनी बालरामायण, उदयन सुंदरीकथा यांच्यांत जेथे मत्तवारणीचा ( मत्तवारण म्हणून ) उल्लेख आला आहे, त्यांचे उदाहरण देऊन रथाच्या पुढे आलेल्या फळचा व मोठ्या खोलीच्या शेजारची लहानशी खोली असा अनुक्रमे अर्थ दिला आहे.

सुब्बाराव ' मत्तानां वारणानां श्रेणिः । ' अशी मत्तवारणी शब्दाची व्युत्पत्ती देऊन मत्तवारणी म्हणजे माजलेल्या हत्तींची रांग रंगपीठाच्या उभ्या भागावर दाखविली असते तिला म्हणतात, असा युक्तिवाद करतात. ' चतुःस्तम्भसमायुक्ता'च्या ठिकाणी ते ' चतुःस्तम्बसमायुक्ता ' असा फरक करतात. स्तंब म्हणजे माजलेल्या हत्तीस ठाणबंद करण्यास ठेवलेल्या खुंटचा. तेव्हा मत्तवारणी म्हणजे चारी बाजूंस खुंटचांना जेरबंद केलेल्या हत्तींची रांग असे अधिक स्पष्टीकरण ते देतात.

पुढच्या श्लोकात ( ना. शा. २.६५ ) मत्तवारणीला उद्देशून तयोः हा द्विवचनी शब्द आला आहे. इतर टीकाकारांप्रमाणे मत्तवारणी म्हणजे दोन व्हरांडे हा द्विवचनी अर्थ न घेता रंगपीठाची जी प्रेक्षकांसमोर बाजू येते तिच्यावर माजलेल्या हत्तींची रांग काढलेला पट्ट अशी एकवचनी मत्तवारणी सुब्बारावांनी सुचविल्याने

त्यांना तयोः हा शब्द अडला. त्यावर त्यांनी असे म्हटले आहे, की रंगमंडप व मत्तवारणी या दोघांची (तयोः) उंची एकमेकांस शोभून दिसावी असे भरतमुनी म्हणतात; व त्या अर्थी तयोः हा द्विवचनी शब्द आला आहे. श्लोक २.६४–६४½ याचा अन्वय ते असा देतात. मत्तवारणी अध्यर्धहस्तोत्सेधेन कर्तव्या रंगमंडपं ( अपि यथा ) उत्सेधेन तयोः तुल्यं ( भवेत् ) तथा कर्तव्यम् । अर्थात हा युक्तिवाद लंगडा आहे व त्याने तयोः या द्विवचनी शब्दाचा एकवचनी मत्तवारणीशी नीटसा संबंध जोडता आलेला नाही.

डॉ. ह. रा. दिवेकरांनी[११] सुब्बारावांचे वरील मत खालील मुद्दे देऊन खोडावयाचा प्रयत्न केला आहे.

सुब्बारावांच्या मताने मत्तवारणीच्या पट्टाची उंची फक्त नऊ इंच ( २२.८ सें. मी. ) असते व हा पट्ट रंगपीठाच्या लांबीइतका म्हणजे ४८ फूट ( १४.६३ मी. ) लांब असतो. अशा अगदी अरुंद पट्टाचा अलंकरणाच्या दृष्टीने उपयोग काहीच नाही.

'रंगपीठस्य पार्श्वे' असा शब्दप्रयोग मत्तवारणीचे वर्णन करताना आला आहे. पार्श्वेचा अर्थ अग्रे असा होत नाही. रंगपीठाचा जो भाग प्रेक्षकगृहाकडे आहे त्या बाजूला म्हणजे पुढच्या बाजूला मत्तवारणीचा पट्ट येतो असे सुब्बाराव म्हणतात, त्याला उद्देशून ही टीका आहे.

दिवेकरांच्या मताने मत्तवारणी म्हणजे रंगपीठाच्या दोन्ही बाजूंना दोन खोल्या ठेवतात त्यांना म्हणतात. यासाठी त्यांनी असा मुद्दा उपस्थित केला आहे की, पूर्वी राजे लोक मैदानावर हत्तींची झुंज लावीत. झुंजीच्या अगोदर या माजलेल्या हत्तींना मैदानाच्या दोन विरुद्ध बाजूंना असलेल्या खोल्यांत बंदोबस्तात ठेवीत व तेथून त्यांना झुंजीकरिता पाठवीत. तेव्हा मत्तवारणी म्हणजे दोन विरुद्ध बाजूंना असलेल्या खोल्या, मत्तः वारणः यस्याम् अशी व्युत्पत्ती त्यांनी दिली आहे. हीदेखील एक कल्पनेचीच भरारी आहे.

प्रो. भानूंनी नाट्यशास्त्राचे मराठीत भाषांतर केले आहे. तेथे[६] (पान ११) मत्तलोकांना रंगमंचावर येऊ न देणारा कठडा असा

मत्तवारणीचा अर्थ दिला आहे. प्रस्तुत लेखकाच्या मते हाच अर्थ योग्य आहे. त्यासाठी पुढे योग्य ते पुरावे दिले आहेत.

मध्ययुगीन टीकाकारांपैकी कुंभकर्ण मत्तवारणीचे वर्णन देतात –

............ तत्र स्यान्मत्तवारणी ॥ १.१.१०२ ॥

**दक्षिणोत्तरपार्श्वस्थ स्तम्भयुग्मसमाश्रया।**
**साधारकाष्ठरुचिरा वर्णकैरुपशोभिता ॥ १.१.१०३ ॥**

हे वर्णन लाकडी कठड्यास बरोबर लागू पडते.

विप्रदासांनी मत्तवारणीची माहिती दिली आहे ती अशी –

........... **तथा पीठस्य पार्श्वयोः ॥**

**दक्षान्ययो प्रकुर्वीत स्तंभयोर्मध्यसंश्रयाम्।**
**आधारकाष्ठसुभगां विचित्रां मत्तवारणीम् ॥**

येथे जास्त माहिती मिळते ती अशी, की मत्तवारणी हा कठडा रंगपीठाच्या दोन्ही बाजूंना, उजव्या व डाव्या बाजूंना, ठेवतात.

मत्तवारणी हा शिल्पशास्त्रातला शब्द आहे, तेव्हा त्याच्या अर्थासाठी शिल्पशास्त्राची पुस्तके पाहावयास हवी. या पुस्तकांत-देखील मत्तवारण असा शब्द आलेला आहे, मत्तवारणी नाही. समरांगणसूत्रधार या पुस्तकात हा शब्द कमीतकमी वीस वेळा आलेला आहे. राजवल्लभ, ईशानशिवगुरुदेवपद्धति व प्रासादमंडन यांत तो प्रत्येकी किमान एकवेळ तरी आलेला आहे. परिमाणमंजरी नावाच्या शिल्पशास्त्राच्या पुस्तकात मत्तवारणाची बरीच माहिती आली आहे. या सर्व पुस्तकांत मत्तवारण म्हणजे कठडा हाच या शब्दाचा अर्थ लागू होतो

राजवल्लभात (९.१५) राजवाड्याचे चार प्रकार दिले आहेत. शुद्ध, माड, मौड व शेखर. राजवाड्याला अलिंद असून त्याच्या सगळ्या मजल्यांना व्हरांडे असतील तर त्याला 'शुद्ध प्रकारचा राजवाडा म्हणतात. राजवाड्याचे छप्पर मत्तवारणासह

असेल तर तो माड प्रकारचा राजवाडा. येथे छाद्याच्यावर चारी बाजूंना जो कठडा असतो त्याला मत्तवारण म्हटले आहे. ‡

ईशान शिवगुरुदेवपद्धति, क्रियापाद, २९.७१ मध्ये ऋतुवर्धन या प्रासादाचे वर्णन करताना पुढच्या बाजूला सभा व मागच्या बाजूला मत्तवारण असलेला मंडप असतो असे म्हटले आहे. ¶ येथेही मत्तवारण म्हणजे कठडा. मंडप उघडा आहे, त्याला भिंती नाहीत; परंतु त्याच्या चारी बाजूंना जो कठडा असतो त्याला मत्तवारण म्हटले आहे.

प्रासाद मण्डनात* (८.३५) मत्तवारणाचा उल्लेख आला आहे. द्विशाळेच्या वरच्या मजल्यावर जी पट्टभूभी, मोकळी जागा ( गच्ची ), आहे तिच्या पुढच्या बाजूला मत्तवारण म्हणजे कठडा असतो.

प्रासाद मण्डनात$ ( ७.९ ) मुखमंडपाचे वर्णन आले आहे. हा मंडप अर्धा झाकलेला असतो. त्याच्या जवळजवळ निम्म्या उंचीइतकी भित असते. त्या भिंतीवर आसनपट्ट असतो व त्यावर मत्तवारण म्हणजे कठडा असतो.

समरांगणसूत्रधारांत$ मत्तवारणचा उल्लेख पुष्कळवेळा आलेला आहे. मत्तवारणी मंडपाच्या बाजूंना किंवा मुखभद्रापाशी असते. भद्र मंडप भिंतींनी पूर्णपणे न झाकता त्याचा वरचा भाग उघडा

‡ शुद्धोलिंदविशेषतश्च सकला भूम्यो वरंडयान्विता
छाद्येनाप्यथ मत्तवारणयुतं माडं तथार्द्धोद्रियम् ।
मौडो भद्रचतुष्किकाभिरुदितो माडेन युक्तस्तथा
मध्ये तुल्यसपादकैः सुमुकुलो वा शीर्षकैः शेखरः ॥ ९.१५ ॥

¶ पुरः पृष्ठे सभा मत्तवारणं मंडपो भवेत् ।
चतस्रोऽङ्गसभाः कार्याः शेषान्यङ्गानि पूर्ववत् ॥ २९.७१ ॥

* द्विशालमध्यषड्दारुपट्टा शालाग्रशोभितम् ।
मत्तवारणमग्रे च तदूर्ध्वं पट्टभूमिषु ॥ ८.३५ ॥

$ नवाष्टदशभागेषु त्रिभिश्चन्द्रावलोकनम् ।
हस्तैकं अंगुलोनं वा तदूर्ध्वं मत्तवारणम् ॥ ७.९ ॥

$ समरांगणसूत्रधार ३०.९, २७, १३८; ३१.१९४; ५६.२७३; ६६.२१, ३५; ६७.६१, ६६–७०, ७७; ६८.५२–५३ वगैरे.




आकृती ६
मत्तवारण

असतो. अधिष्ठानाच्यावर राजसेन, वेदिका, आसनपट्ट व मत्तवारण असे भिंतीचे (अर्ध्या उंचीच्या) भर विभाग येतात. वरचा खांबाचा (निम्म्या उंचीचा) भाग उघडा असतो. आकृती ६ पाहिल्यावर मत्तवारण म्हणजे काय याची समजूत पटते. तसेच फोटो १ वरूनही यथायोग्य कल्पना येईल.

म. रा. सा. सं. मं. ग्रंथालय
मंत्रालय



फोटो १ – मत्तवारणी



तेव्हा शिल्पशास्त्रातील निरनिराळ्या ग्रंथांवरून मत्तवारण ( मत्तवारणी असा शब्द मिळत नाही ) म्हणजे कठडा असा अर्थ मिळतो. भरतमुनींच्या नाट्यशास्त्रात आलेल्या मत्तवारणी शब्दाचा अर्थ कठडा असा होतो व उन्मत्त प्रेक्षकांपासून नटवर्गाचे रक्षण करणारा लाकडी कठडा असा त्याचा प्रो. भानूंनी केलेला अर्थ योग्य आहे.

मत्तवारणी १½ हात उंच व तिची लांबी रंगपीठाच्या लांबी-इतकी असते असे वर्णन भरतमुनी देतात. मत्तवारणीचा अर्थ व्हरांडा घेतला तर फक्त १½ हात उंचीचा व्हरांडा व तोही रंगपीठाच्या लांबीइतका ( ३२ हात ) कोठे येणार हा प्रश्नच आहे. याउलट हे वर्णन कठड्याला चपखल लागू होते.

मत्तवारणीचा उल्लेख सर्वत्र एकवचनी आहे. श्लोक २.६३–६४ यांत मत्तवारणी व तिचे वर्णन करणारे शब्द एकवचनी आहेत. श्लोक २.६५ मध्ये मत्तवारणीची ( तस्यां ) पूजा करावी असा परत एकवचनी उल्लेख आला आहे. श्लोक १.९०–९१ मध्ये$ मत्तवार-णीचा उल्लेख आला आहे व तेथेही तो एकवचनीच आहे. तेव्हा मत्तवारणी म्हणजे कठडा एकच आहे.

आता प्रश्न उरतो श्लोक २.६४½ त आलेल्या तमोः या द्विवचनी शब्दाचा निर्वाह कसा लावावयाचा ? विप्रदासांनी रंग-पीठाच्या उजव्या व डाव्या बाजूला दोन कठडे असतात असे सांगितले आहे. यापेक्षा ‘ तयो स्तुल्यं ’ या ऐवजी ‘ तया तुल्यम् ’ असा पाठभेद मिळतो तो स्वीकारणे हा उत्तम मार्ग. मत्तवारणी म्हणजे रंगशीर्षावर प्रेक्षकगृहाच्या बाजूच्या कडेवर असलेला कठडा असा अर्थ करावयाचा.

केरळात किटांगूर व त्रिचूर येथे जे नाट्यमंडप आहेत तेथे सागवानी लाकडाचे नक्षीदार कठडे रंगभूमीच्या दोन्ही बाजूंना

---

$ श्लोक १.९० पान छत्तीस पहा.

स्तम्भेषु मत्तवारण्याः स्थापिताः परिपालने ।
भूतयक्षपिशाचाश्च गुह्यकाश्च महाबलाः ॥ १.९१ ॥

बसविले आहेत. हे कठडे जमिनीशी ३० अंशाचा कोन करून बसविले आहेत. त्यांचा उपयोग गाणाऱ्या नटचा ( नयनार ), त्या बसून गात असल्याने, पाठीला टेकणासारखा करतात. तेव्हा असे वाटते, की विप्रदासांनी मत्तवारणीचा दिलेला अर्थ बरोबर आहे व प्रासादमण्डन वगैरे शिल्पशास्त्राच्या ग्रंथांत दिलेले मत्तवारण हे या मत्तवारणीचा तुलनेने अर्वाचीन आविष्कार आहे. तेव्हा मत्तवारणी म्हणजे लाकडाचा नक्षीदार कठडा. फक्त तो प्रेक्षक व रंगभूमी यांच्यामध्ये नसून तो रंगभूमीच्या दोन्ही बाजूंना केरळातील नाट्यमंडपात ठेवलेला आहे; व तसाच भरतमुनींना अभिप्रेत आहे का ? तसेच असेल तर ' तयो: ' या द्विवचनी शब्दाचे प्रयोजन समजते.

### षड्दारुक

आता पुढला जटिल शब्द म्हणजे षड्दारुक. रंगशीर्ष षड्दारुकासह असावे असे श्लोक २.६८ मध्ये भरतमुनींनी म्हटले आहे. तेव्हा षड्दारुक म्हणजे काय ? या प्रश्नाचे उत्तर शोधण्याचा अभिनवगुप्तती व अर्वाचीन विद्वानांनी बराच प्रयत्न केला आहे. त्यांची मते खाली देतो.

अभिनवगुप्तनी षड्दारुकाचे तीन अर्थ दिले आहेत :

१ नेपथ्यगृहाच्या भिंतीत आठ हात अंतरावर दोन खांब आहेत. त्यांच्यापासून प्रत्येकी चार हात अंतरावर आणखी दोन खांब आहेत ( **आकृती ७ अ** ). या चारी खांबांच्यावर एक पट्टी आहे व खालच्या बाजूला हे चारी खांब जोडणारी आणखी एक पट्टी आहे. या लाकडाच्या सहा भागांनी षड्दारुक तयार होते.

२. दुसऱ्या अर्थाप्रमाणे नेपथ्यगृहाच्या भिंतीच्या कोपऱ्यांपाशी दोन खांब आहेत. यांच्यातील अंतर ३२ हात आहे. आणखी दोन खांब या भिंतीतच पण एकमेकांपासून जवळ अंतरावर आहेत व या खांबाच्या मध्ये नेपथ्यगृहातून रंगशीर्षावर येण्यासाठी दोन दरवाजे आहेत ( **आकृती ७ ब** ). या खांबांच्या वर आणि खाली दोन लाकडाच्या पट्ट्या आहेत व ते सर्व मिळून षड्दारुक तयार होते.




**आकृती ७ अ, ब, क**

षड्दारुक – अभिनवगुप्त

३. तिसरा अर्थ जरा अवघड आहे व त्यात ऊह प्रत्यूह वगैरे शब्दांचाही अर्थ देण्याचा प्रयत्न केला आहे.

'ऊह' म्हणजे खांबांच्या वर असलेले व त्याच्या बाहेर आलेले लाकूड. 'प्रत्यूह' हे 'ऊह' च्या वर असून त्याच्या बाहेर त्याचे निर्गमन असते. 'निर्यूह' म्हणजे प्रत्यूहमधील जागा भरून काढणारे लाकूड. निर्यूहच्या खाली जी फळी बसविली जाते तिला 'सञ्जवनफलक' म्हणतात. हे चार लाकडाचे तुकडे झाले (आकृती ७ क). अनुबंध व कुहर हे दोन भाग राहतात. खांबांच्यावर सिंह, सर्प वगैरेंचे खोदून उठाव आणलेले पुतळे असतात त्यांना अनुबंध म्हणतात व खांब कोरून जे पुतळे करतात त्यांना कुहर म्हणतात.

या सहा लाकूडकामांस षड्दारुक म्हणतात. खरे पाहता षड्दारुकाचा हा तिसरा प्रकार म्हणजे ना. शा. २.७४–७६ ची व्याख्या आहे. त्याला षड्दारुक म्हणावयाचे की नाही याची शंकाच आहे.

मध्ययुगीन टीकाकारांपैकी कुंभकर्ण यांनी षड्दारुकाची व्याख्या दिली आहे. त्यांच्या मताने नेपथ्यगृहातून रंगशीर्षावर प्रवेश करण्यासाठी जो दरवाजा आहे, त्याच्या दोन्ही बाजूंना दोन दोन खांब असतात. त्यांच्या वर व खाली लाकडाचे पट्ट असतात, याला षड्दारुक म्हणतात ( १.१.९९–१०० ). विप्रदासांनी षड्दारुकाची माहिती हीच दिली आहे ( **आकृती ७ ड** ).

मंकड, विश्वेश्वर यांनी अभिनवगुप्तनी षड्दारुकाच्या दिलेल्या पहिल्या अथवा दुसऱ्या अर्थाशी सहमती दर्शविली आहे.

सुब्बाराव षड्दारुकाची व्याख्या निराळ्या रीतीने देतात. रंगपीठाच्या बाजूला लाकडाची चौकट व तिच्या कर्णावर पुन्हा दोन लाकडे अशी षड्दारुकाची रचना त्यांनी सांगितली आहे ( **आकृती ४** ).



**आकृती ७ ड**
षड्दारुक – कुंभकर्ण

शिल्पशास्त्रावरील ग्रंथांत षड्दारुकाबद्दल काय म्हटले आहे ते पाहू. ‘ वस्तुसारप्रकरणम् ’ या ठक्कुर फेरु यांनी प्राकृत भाषेत लिहिलेल्या शिल्पशास्त्रविषयक ग्रंथात षड्दारुक म्हणजे सहा प्रमुख विभाग असलेला खांब अशी व्याख्या केली आहे. घराच्या निर-निराळ्या विभागांच्या नावांचा अर्थ देताना खांबाला षड्दारु म्हणतात, असे म्हटले आहे.

**जालियनाम मूला थंभयनामं च हवइ खडदारं । १.६६½ ।**

राजवल्लभात (६.१६) षड्दारुकाची दुसरी व्याख्या दिली आहे–

**यत् षड्दारुकमुदितं ज्ञेया सा पट्टजा श्रेणी ॥ ६.१६ ॥**

पट्टांची रांग, ओळ म्हणजे षड्दारुक अशी ही व्याख्या आहे.

प्रासाद मंडनात जेथे मत्तवारणीचा उल्लेख आला आहे, तेथे षड्दारुचाही उल्लेख येतो.

**द्विशाला मध्यषट्दारुपट्टाशालाग्रशोभितम् । ८.३४½ ।**

येथे सहा लाकडी पट्टयांनी मिळून केलेली पट्टांची रांग, लाकडाची पडदी असा षड्दारुकाचा अर्थ होतो.

समरांगण सूत्रधारांत षड्दारुक हा शब्द कमीत कमी ३२ वेळा आला आहे. राजवल्लभांतही तो १७ ते १८ वेळा आला आहे. समरांगण सूत्रधारांत तसेच राजवल्लभांत ध्रुव, धन्य इत्यादी एक-शालांचे वर्णन आले आहे. या शालांमधील षड्दारुकाच्या स्थानावरून या एकशालांची नावे बदलतात.

राजवल्लभात ध्रुव, धन्य इत्यादी १६ एकशालांची माहिती दिली आहे (६.८). या एकशालांना अपवर्क (लहानशी खोली) असली म्हणजे याच शालांचे 'ईश्वरादि' निराळे प्रकार होतात (६.९–१०). या अपवर्कात षड्दारु असतील तर पुन्हा 'सुमुखादि' १६ निराळी घरे होतात (६.११–१२). हीच घरे जर पुढच्या बाजूला अलिंद व अपवर्कात दोन षड्दारुक असलेले असतील तर त्यांचे 'चूडामणि' इत्यादी १६ निराळे प्रकार होतात (६.१३–१४).

राजवल्लभ ६.२१–२२, २४–२७, २९, ३१ व ३४ येथे द्विशालांचे षड्दारुक असल्याने जे वेगळे प्रकार होतात त्याची माहिती दिली आहे. षड्दारुकाचा उल्लेख निरनिराळ्या द्विशाला, त्रिशाला व चतुःशालांच्या वर्णनांत अध्याय ७ व्यात आला आहे. श्लोक ७.२७ त चतुःशालेत दोन षड्दारुक असावेत असेही म्हटले आहे. वर दिल्याप्रमाणे श्लोक ६.१६ मध्ये (सहा) लाकडी पट्टयांची रांग तिला षड्दारुक म्हणावे अशी व्याख्याही दिली आहे. तेव्हा षड्दारुक म्हणजे लाकडी पडदी असा अर्थ असावा.

समरांगण सूत्रधारांत अवनिशेखर प्रासादाचे वर्णन दिले आहे. या राजगृहाला चारी बाजूंना कर्णप्रासादक असतात. या कर्णप्रासादां-

मधले अंतर षड्दारुक या पडद्याने ( partition wall ) झाकलेले असते ( ३०.७०–७२ ). हीच माहिती भुवनतिलक ( ३० ७६ ) व विलासस्तबक (३०.८६) या प्रासादांचे वर्णन करताना दिली आहे.

> चतुरश्रीकृते क्षेत्रे दशभागैर्विभाजिते ॥ ३०.७० ॥
> कर्णप्रासादकाः कार्या भागत्रितयविस्तृताः ॥
> तेषां षड्दारुकंमध्ये भित्तिर्भागार्धसम्मिता ॥ ३०.७१ ॥

अध्याय ४९ त रुचकादी प्रासादांचे लक्षण देताना उष्णीषप्रासाद श्रीकूटप्रासादाप्रमाणेच असतो, फक्त त्याचे पुढील दार षड्दारुकासह असते असा षड्दारुकाने फरक होतो असे सांगितले आहे.

> षड्दारुकसमायुक्तप्राग्द्वारस्त्वयमेव चेत् ॥ ४९.३७ ॥
> प्रासादस्तम्भगर्भः स्यात् तदोष्णीषोऽभिधीयते । ४९.३७½ ।

षड्दारुकाचे असेच पडदा म्हणून उल्लेख अवतंस प्रासाद ( ४९.५९ ), पृथीवीजय ( ४९.८२–८३ ), प्रमदाप्रिय (४९.९६½) कुबेर ( ४९.१०४ ) इत्यादी प्रासादांच्या वर्णनात आले आहेत.

षड्दारुक मर्ममध्यावर नसावे ( १३.१६ ) असे म्हटले आहे.

> षड्दारुकाण्यनुसिरागवाक्षालोकनानि च ।
> मर्ममध्योपगान्येतान्यावहन्ति धनक्षयम् ॥ १३.१६ ॥

षड्दारुकाच्या मध्ये, तुळई, खांब, खुंटी व गवाक्ष नसावीत असाही इशारा दिला आहे ( १३.१८ ).

> द्वारद्रव्यतुलास्तम्भनागदन्तगवाक्षकैः ।
> द्वारमध्यार्दितै रोगकुलपीडाधनक्षया ( :? न् ) ॥ १३.१७ ॥
> नृपदण्डभयंः पत्युः पीडनं च प्रचक्षते ।
> द्वारमध्येषु षड्दारुमध्येष्वपि च सूरयः ॥ १३.१८ ॥
> कर्णद्रव्यादिभिर्विद्धेष्वेतदेव फलं विदुः । १३.१८½ ।

षड्दारुक ( लाकडी ) पडदा असल्याने कुठल्याही तऱ्हेचा भार उचलण्यास तो सक्षम नसतो. तेव्हा षड्दारुकावर खांब, तुळई इतकेच काय पण खुंटीही ठेवू नये. वरील चर्चेवरून षड्दारुक म्हणजे लाकडाची पडदी असा अर्थ होतो असे म्हणावयास प्रत्यवाय नसावा.

**रंगपीठाची प्रेक्षकगृहाच्या पीठापासून उंची**

श्लोक २.६४½ मध्ये रंगमंडपाची उंची मत्तवारणीइतकी असावी असे भरतमुनी म्हणतात. अभिनवगुप्त मात्र रंगपीठाच्या दोन्ही बाजूंना जे व्हरांडे ( मत्तवारणी ) आहेत त्यांची व रंगपीठाची उंची सारखी आहे असा या श्लोकार्धाचा अर्थ लावतात. येथे अभिनवगुप्त रंगमंडपाचा अर्थ रंगपीठ करतात व त्याला अनुसरून विश्वेश्वरांनी 'रंगमंडपम्' हा शब्द काढून टाकून तेथे 'रंगपीठकम्' असा शब्द टाकला आहे. त्यांच्या मते रंगपीठ हे प्रेक्षकांच्या पीठापेक्षा उंच असावयास हवे.

रंगमंडपाचा अर्थ संपूर्ण नाट्यगृह किंवा प्रेक्षकगृह असा सामान्यत: होतो. रंगमंडपाचा अर्थ रंगपीठ मात्र नक्कीच होऊ शकत नाही. तेव्हा मत्तवारणीइतकी १½ हात उंची रंगमंडपाची असावी असे म्हटल्यावर प्रेक्षकगृहाची उंची १½ हात असावी असा अर्थ अभिप्रेत असावा, असे समजून घोष व मंकड यांनी रंगपीठापेक्षा प्रेक्षकांची बसावयाची जागा दीड हाताने उंच असावी असा अर्थ केला आहे. म्हणजे रंगपीठ खाली व प्रेक्षकांची बसावयाची जागा तुलनेने उंचावर अशी रचना होते.

या श्लोकाचा अर्थ जरा वेगळ्या रीतीनेही करता येईल. संपूर्ण रंगमंडपाचे (प्रेक्षागृह + प्रेक्षकगृह मिळून ) उपपीठ १½ हात उंचीचे. त्यावर पुन्हा १½ हात उंचीचे (?) रंगपीठ व रंगपीठावर १½ हात उंचीचा कठडा अशी रचना असावी. शिवाय रंगपीठ व प्रेक्षकांची बसावयाची जागा यात आठ हातांचे अंतर आहे ( ना. शा. २.९४ ). याच्यामुळे व प्रेक्षकांची बसावयाची बैठक जिन्याप्रमाणे चढती असल्याने ( ना. शा. २.९१ ) रंगशीर्षावरील दृश्य प्रेक्षकांना व्यवस्थित दिसावयाची सोय झाली आहे. तेव्हा रंगमंडपाचे म्हणजे संपूर्ण नाट्यगृहाचे उपपीठ १½ हात उंचीचे समजल्यास या श्लोकाचा शब्दांत कुठलाही फरक न करता सुसंगत अर्थ लावता येतो. रंगपीठ व प्रेक्षकांचे पीठ यांच्या उंचीबाबतची चर्चा चौरस नाट्यमंडपांत प्रेक्षकांची बसण्यासाठी पायऱ्यांच्या जिन्यासारखी जी योजना सांगितली आहे त्यावेळेस करू.

**रंगशीर्ष**

श्लोक २.६९ मध्ये रंगशीर्ष काळ्या मातीचे असावे असे म्हटले आहे. त्यासाठी जमीन नांगरून ती रंगपीठात भरावी असे भरतमुनी म्हणतात. रंगपीठाची भिंत चारी बाजूंनी अधिष्ठानाच्या, उपपीठाच्या किंवा वेदिकेच्या थररचनेप्रमाणे बांधून झाल्यावर ते रंगपीठ काळ्या मातीने भरावे.

काळ्या मातीचा सर्वांत वरचा पृष्ठाभागाचा थर कासवाच्या पाठीप्रमाणे मध्यभागी उंच व बाजूंना उतरता असा बहिर्वक्रही असू नये किंवा माशाच्या पाठीसारखा मध्यभागी खोल व बाजू वर उचललेल्या असा अंतर्वक्रही असू नये; तर सपाट आरशाप्रमाणे समतल असावा असा आदेश भरतमुनी देतात ( ना. शा. २.७२. ).

रंगशीर्ष तयार करताना काळी माती प्रयत्नाने वापरावी असे भरतमुनी आग्रहाने प्रतिपादतात. स्थापत्यशास्त्राच्या दृष्टीने रंग-पीठामध्ये भरावयाची माती ही मुरुमासारखी कठीण व मजबूत असावयास हवी. काळी माती पाण्यामुळे फुगते. पाण्याचे प्रमाण कमी झाल्यावर फार आकुंचित पावते व तिच्यात मोठ्या भेगा पडतात. येव्हढेच नव्हे, तर जमीन मध्यभागी खोलगट होते. काळ्या मातीचे असे गुणधर्म असताना देखील रंगपीठ भरण्यासाठी काळी मातीच वापरावी असा आग्रह भरतमुनी का धरतात हे समजणे अवघड आहे.

श्लोक २.२७ त पुष्यनक्षत्रीं नाट्यमण्डपाची आखणी करावी व पाया खणण्यास सुरुवात करावी असे म्हटले आहे. शिल्पशास्त्रात वास्तूचा पाया दगडाचा थर लागेपर्यंत किंवा जमिनीतील पाण्याच्या पातळीपर्यंत न्यावा असा सर्वसाधारण नियम आहे. †

नाट्यमण्डप ही फार भव्य वास्तू आहे तेव्हा तिचा पाया खोल घ्यावयास हवा. पाया खणावयाचा काल पावसाळ्यातील आहे. या वेळेला जमिनीतील पाण्याची पातळी इतर कालापेक्षा सर्वांत

† खात्वा क्षितिं तां पुरुषप्रमाणं जलान्तमश्मावधि वा सुलग्ने । १०.३½ । शिल्परत्न. शिवाय पहा—काश्यपशिल्प ४.६, प्रासादमंडन १.२४.

वर असते. तसेच पाया जमिनीतील पाण्याच्या पातळीपर्यंत न्याव-याचा या सर्व अटी पूर्ण होण्यासाठी नाट्यमंडपासाठी अशी जागा शोधत असतील की जेथे जास्तीत जास्त वर आलेल्या जमिनीतील पाण्याची पातळी ही जमिनीपासून बरीच खोल असेल.

रंगपीठाच्या पायाच्या भिंती वर येऊन अधिष्ठान बांधून झाले की जमिनीपासून अधिष्ठानाच्या वरपर्यंत व त्यावर रंग-पीठाच्या वरपर्यंत म्हणजे रंगशीर्षापर्यंत काळ्या मातीचा भराव टाकावयाचा किंवा रंगमंडपाच्या अधिष्ठानात मुरुमासारख्या मातीचा भराव टाकावयाचा व त्यावरील रंगपीठाच्या आत काळ्या मातीचा भराव टाकावयाचा. जमिनीतील पाण्याची पातळी पावसाळ्यात पायापर्यंत येणार व इतर काळी त्याहूनही खाली जाणार; तेव्हा काळ्या मातीच्या भरावात केशाकर्षणाने जमिनीतील पाणी येणार नाही व त्यामुळे माती प्रसरण पावणार नाही. तसेच रंगपीठ छपराखाली असल्याने या मातीतील पाणी बाष्पीभवनाने कमीही होणार नाही तेव्हा ती आकुंचन पावणार नाही. या कारणामुळे रंगपीठातील भरावासाठी काळी माती वापरली तरी तिच्यातील पाण्याचा अंश कमीजास्त होत नसल्याने ती प्रसरण पावून फुगणार नाही की आकुंचनाने तीत फटा पडणार नाहीत. अशा ठिकाणी काळी माती वापरावयास हरकत नाही.

भरतमुनी काश्मीरचे असे सांगतात. तेथे काळी माती असावी का? महाराष्ट्र, गुजराथ, मध्यप्रदेश वगैरे राज्यांत काळी माती चार मीटरपर्यंत देखील खोल आढळते. तिच्या खाली पिवळ्या मातीचा थर असतो. तेव्हा अशा जागी नाट्यमंडपाचा पाया काळ्या मातीतच घालावा लागणार म्हणून बहुधा भरतमुनी म्हणतात की एकदा मातीची परीक्षा होऊन ती पायासाठी योग्य आहे असे ठरले म्हणजे मग ती काळी असो की पिवळी (पांढरी) असो (कृष्णा गौरी च या भवेत्।), तीवर नाट्यमंडप उभारावा (२.२५). शिवाय म्हणूनच कदाचित जेथे काळी माती भरपूर आहे (तेथे अधिष्ठान तसेच) रंगपीठ यांतील भरावासाठी काळी माती वापरावी असे ते

म्हणतात. तेव्हा काळ्या मातीचा गुणधर्म पाणी शोषून खूप फुगणे व माती वाळल्यावर खूप आकुंचित होऊन तिच्यात भेगा पडणे हे माहिती असूनही ती वापरावी असे त्यांनी म्हटले असावे. किंवा येथे ( ना. शा. २.६९ ) काळी माती ' प्रयत्नतः ' वापरावी असे जे म्हटले आहे त्याचा अर्थ काळी मातीच वापरावी असा आग्रहदर्शक नसून काळी माती वापरल्यास ती पाण्याचा अंश बदलल्याने फुगणार अथवा आकुंचित होणार नाही याबद्दल काळजी घ्यावी अशा अर्थी ' प्रयत्नतः ' हा शब्द आला असावा.

## नाट्यमंडपाची, ध्वनिशास्त्रदृष्ट्या उभारणी

समतल रंगशीर्ष बांधून झाले की मंडपाच्या लाकूडकामास लागावे. दारांच्या व खिडक्यांच्या चौकटी, खिडक्यांच्या जाळ्या, खांब, त्यांच्यावर आधारलेल्या छप्पराच्या तुळया यांच्या उभारणीस लागावयाचे, लाकडी भागावर करावयाचे कोरीव काम व उठावाचे काम हेही याचवेळी उरकून घ्यावयाचे ( ना. शा. २.७५–७८ ).

दारे, खिडक्या यांची योजना अशी करावी की ज्यामुळे ध्वनिशास्त्रदृष्ट्या रंगमंडप निर्दोष होईल व नटांचा आवाज, गायन व वाद्यांचा स्वरमेळ मधुरपणे ऐकू येईल. याबद्दल काही महत्त्वाच्या सूचना भरतमुनींनी केलेल्या आहेत.

दाराच्या समोर दार किंवा खिडकी आली तर हवा खेळती राहते येवढेच नव्हे, तर हवेचा झोत, प्रवाह, झुळका एका दारापासून दुसऱ्या दाराकडे किंवा खिडकीकडे वाहू लागतो. त्यामुळे प्रेक्षागृहातील नटांनी उच्चारलेले शब्द प्रेक्षकगृहात बसलेल्या प्रेक्षकांपर्यंत नीट पोचत नाहीत. वाऱ्याचा झोत जसा कमीजास्त होईल त्याप्रमाणे उच्चारलेले शब्द, गायन ही प्रेक्षकांपर्यंत कमीजास्त प्रमाणात पोचतील व एकंदरीत प्रेक्षकांपर्यंत आवाज पोचण्याच्या व्यवस्थेत बिघाड होईल. म्हणून दारासमोर दार तसेच दारासमोर खिडकी नसावी. येवढेच नव्हे, तर खिडक्यांना जाळ्या लावून तसेच दारे बंद ठेवून नाट्यगृहात वाहत्या वाऱ्याचे प्रमाण कमीत कमी राहील ( निर्वात ) की ज्यामुळे नाट्यगृहात उच्चारलेला शब्द गंभीर

( अनुरणनपूर्वक ) प्रेक्षकांपर्यंत पोचेल अशी काळजी घ्यावी, असेही भरतमुनींनी ( ना. शा. २.८०–८२ ) म्हटले आहे.

याच कारणासाठी त्यांनी आणखी दोन महत्त्वाच्या सूचना दिल्या आहेत. एक म्हणजे नाटचगृहाची उंची दोन मजली असावी असा आदेश त्यांनी दिला आहे. दुसरी सूचना म्हणजे नाटचमंडप हा पर्वतातील गुहेप्रमाणे ( शैलगुहाकारः ) असावा म्हणजे त्याचे छप्पर सपाट परंतु चारी बाजूंना गुहेप्रमाणे ( किंवा चैत्यगृहाच्या छपराप्रमाणे ) गोलाकार असावे ( ना. शा. २.८० ). या दोन सूचना आधुनिक नाटचमंडप बांधताना देखील पाळल्या जातात.

**द्वारवेध**

दाराच्या समोर खांब, खुंटी किंवा खिडकी तसेच ( दुसऱ्या इमारतीचा कोपरा ) किंवा दुसरे दार येऊ देऊ नयेत ; नाही तर द्वारवेध होतो ( ना. शा. २.७९ ). द्वारवेधाची कल्पना शिल्पशास्त्राच्या ग्रंथांवरून अधिक विशद करता येते.

समरांगण सूत्रधारात ( अध्याय ३९ ) द्वारवेधाविषयी माहिती दिली आहे–

**कुड्यकोणतरुस्तम्भैर्भवनस्यन्दनादिभिः ॥ ३९॥**
**यद् विद्धं भवनद्वारं तत् शुभाय न जायते । ३९½ ।**

दाराच्या समोर दुसऱ्या घराची भिंत, कोपरा, मोठा वृक्ष, खांब, दुसरे घर किंवा रथ इत्यादी असल्यास द्वारवेध होतो व तो अशुभ असतो.

ठक्कुरफेरु वास्तुसारप्रकरणम् या ग्रंथात याविषयी म्हणतात की–

**दूम–कूव–थंभ–कोणय–किलाविद्धे दुवार वेहो य । १.१२०½ ।**

वृक्ष, विहीर, खांब, कोपरा, जनावरे बांधावयाची खुंटी ही जर दारासमोर असतील द्वारवेध होतो.

भरतमुनींनी ज्या अर्थी द्वारवेधाबद्दल अशीच माहिती दिली आहे, त्या अर्थी वेधाची ही कल्पना बरीच जुनी ( इ. स. पूर्वकाळाइतकी ) असावी असे दिसते. हा द्वारवेधाचा नियम बहुधा संरक्षणा-

साठी असावा. वृक्ष, खांब, दुसऱ्या घराचा कोपरा वगैरेंच्या आड उभे राहून दारातून बाहेर येणाऱ्या अथवा आत जाणाऱ्या व्यक्तीवर हल्ला करता येतो म्हणूनही दाराच्या समोर या गोष्टी नकोत. दारापुढे दार अथवा खिडकी येऊ नये हे योग्य. त्याचे कारणही भरतमुनी देतात ( ना. शा. २.८०–८१ ). परंतु नाट्यमंडपात दारापुढे खांब, कोपरा किंवा खुंटी आल्याने कांही फारसे बिघडणार नाही; तरी देखील हा नियम भरतमुनींनी दिलेला दिसतो त्या अर्थी वास्तुशास्त्रातले नियम पाळावेत असा त्यांचा कटाक्ष दिसतो.

**दोनमजली ( द्विभूमिः ) नाट्यगृह**

भरतमुनींनी नाट्यगृह दोन मजली असावे असे म्हटले आहे ( ना. शा. २.८० ). अभिनवगुप्तनी पाच निरनिराळे पर्याय 'द्विभूमी' करिता दिलेले आहेत.

१. द्विभूमी म्हणजे रंगपीठ ( किंवा नाट्यमंडप ) ज्या जमिनीच्या आधारावर उभे आहे ती एक भूमी व रंगपीठ जे उंच असते ती दुसरी भूमी.

२. मत्तवारणी म्हणजे व्हरांडे. हे रंगपीठाच्या बाहेर ८×८ चौरस किंवा ८ हात रुंद व १६ हात लांब असे आयताकार असतात ( आकृती १ क ). नाट्यमंडपाच्या भिंतीभोवती ८ हात रुंदी सोडून पुन्हा एक भिंत बांधतात. देवळातल्या प्रदक्षिणामार्गाप्रमाणे हा विभाग होतो. तेव्हा नाट्यमंडप ही एक भूमी व तिच्याभोवती हा जो बोळ ही दुसरी भूमी.

३. भूमी म्हणजे मजला; तेव्हा नाट्यमंडप ही एक भूमी व रंगभूमीवर मांडवासारखा असा भाग, जेथे नर्तकी नृत्य करते ही दुसरी भूमी; किंवा प्रेक्षकगृहात प्रेक्षकांसाठी बाल्कनी ठेवतात ती दुसरी भूमी.

४. भट्टतोत यांच्या मताने प्रेक्षकगृहातील प्रेक्षकांना बसण्यासाठी जिन्याच्या पायऱ्यांसारखी जी रचना त्यातील एका पायरीपासून दुसऱ्या पायरीपर्यंत जो पातळीत फरक येतो त्याला द्विभूमी म्हणावयाचे.

५. व्याकरणदृष्टचा द्विभूमीऐवजी 'अद्विभूमिर्नाटचमंडपः' असे म्हणता येते व भरतमुनींच्या मताने नाटचमंडप दोन मजली नसावा असाही अर्थ कोणी काढतात.

कुंभकर्ण ( १.१.१०५ ) व विप्रदास रंगपीठावर त्याच्या मापाने वरची भूमी करावी असे म्हणतात. म्हणजे रंगपीठावर आणखी एक मजला असावा असे त्यांचे मत दिसते. नृत्तरत्नावलीत जाय. सेनापति रंगपीठावर टांगता ( विमानस्था ) लहान मंडप असावा जेथे नर्तकी नाच करते (८.६९) असे म्हणतात. तेव्हा त्यांचे मत अभिनवगुप्तनी दिलेल्या तिसऱ्या प्रकारासारखे द्विभूमीच्या बाबतीत असावे. ते पुन्हा म्हणतात ( ७.२२३–२२४ ), की कळीच्या बाहुल्या ज्या निरनिराळे ( मधुर ) आवाज काढतात किंवा गाणे म्हणतात त्या या दुसऱ्या मजल्यावर ठेवाव्यात. शिवाय ते नाटचगृहाच्या छप्परालाही दुसरी भूमी म्हणतात ( ७.२२४ ). तेव्हा द्विभूमीचा आणखी एक निराळा पर्याय जाय सेनापतींनी दिला आहे असे म्हणावयास हवे.

आधुनिक विद्वानांमध्ये व्ही. राघवन् यांच्या मताने प्रेक्षकांची जी सर्वांत खाली बसावयाची जागा ( पिटाची ) ती एक भूमी व दीड हात उंच अशी जी रंगभूमी तो दुसरा मजला.

चंद्रभान गुप्तांच्या मताने रंगपीठावर आणखी एक मजला असावा. वरच्या मजल्यावर स्वर्गीय देव, अप्सरा वगैरे नाटकातील पात्रे दाखवित असतील व खालच्या मजल्यावर म्हणजे रंगपीठावर या भूलोकातील पात्रे काम करीत असतील. नाटचमंच हा पुष्कळदा दोन मजली असतो हे सिद्ध करण्यासाठी चंद्रभानगुप्तांनी नाटकातले काही प्रसंग दिले आहेत; पण त्यांत स्वर्गातली मंडळी वरच्या मजल्यावर व या लोकीची पात्रे रंगपीठावर काम करतात असे एकही उदाहरण त्यांनी दिलेले नाही.

प्रस्तुत लेखकाचे मत अगोदरच दिले आहे की ध्वनिशास्त्राच्या दृष्टीने नाटचमंडपाची उंची दोन मजली असावी, नाटचमंडपात दोन मजले नसावेत. दुसऱ्या मजल्याची काहीच माहिती भरतमुनी देत नाहीत. रंगपीठ कोणत्या मातीने भरावे, खांबांची रचना काय

असावी वगैरे बद्दलची माहिती भरतमुनी देतात आणि दुसऱ्या मजल्याची माहिती मात्र काहीच देत नाही हे कसे ? तेव्हा निराळा दुसरा मजला असे काही नसून नाटचमंडपाची उंची दोन मजली मंडपाइतकी असावी. मध्ययुगीन शिल्पशास्त्रातील ग्रंथांत दोन मजली मंडपाच्या उंचीचे अधिष्ठान, स्तंभ, मंच वगैरे थरविभाग दिलेले आहेत. त्या मापाचा शांतिक प्रकारचा मंडप आकृती ८ मध्ये दाखविला आहे.




आकृती ८
द्विभूमी शैलगुहाकार चौरस नाटचमंडप – भरतमुनी

नाटचमंडपाच्या भिती बांधून झाल्यावर त्यांना लेप (plaster) लावावा व वरून चुन्याचा पांढरा रंग द्यावा. त्या भितींवर सुंदर चित्रे काढावीत. सुंदर स्त्रिया, पुरुष तसेच राजाच्या आयुष्यातील त्याला आवडतील त्या प्रसंगांची चित्रे काढावीत. निरनिराळचा वेलबुटचा काढून भिती सुशोभित कराव्यात. एकंदरीत या व लाकूड-कामाच्या वर्णनावरून त्या काळचा मंडप किती सुंदर व कलापूर्ण दिसत असेल याची काहीशी कल्पना येऊ शकते. चित्रे काढण्यासाठी भितींना जो लेप देतात त्या विषयाची अधिक माहिती मध्ययुगीन शिल्पशास्त्राच्या ग्रंथांत मिळते.

केरळातील सध्या अस्तित्वात असलेल्या नाटचमंडपात संपूर्ण नाटचमण्डपाला छप्पर असतेच; पण केवळ रंगमंचालाही खूप नक्षीदार असे छप्पर असते. तेव्हा रंगभूमीपुरते छप्परावर छप्पर असते. भरतमुनींच्या मते द्विभूमीचा अर्थ असा होत असावा का ?

**चौरस नाटचमंडप**

आतापर्यंत ( ना. शा. २.८५ ) आयताकृती नाटचमंडपाची लक्षणे, तो बांधताना करावयाचा शांतिविधी व त्याची रचना यांचे वर्णन झाले. यानंतर चौरसाकृती नाटचमंडपाची माहिती भरतमुनी देत आहेत. येथे 'पुनरेव हि वक्ष्यामि' 'मी पुन्हा सांगतो' ( ना. शा. २.८६ ) असा शब्दप्रयोग भरतमुनींनी केला आहे. त्याचा अर्थ असा, की आयताकार मंडपाची जी माहिती सांगितली, ती चौरस मंडपाला देखील लागू होते व आयताकार मंडपाचे वर्णन करताना ज्याबद्दल (उदा., खांबांच्या मांडणीबद्दल) माहिती दिलेली नाही पण ती चौरस नाटचगृहाचे वर्णन करताना दिली आहे, ती आयताकार नाटचमंडपाकरिताही उपयोगी आहे.

चौरस कनिष्ठ प्रकारचा नाटचमंडप ३२ × ३२ हातांचा मानवांसाठी योग्य आहे. तेव्हा या मापाचा चौरस जमिनीवर आखून पायाच्या भिती तसेच जमिनीपासून छप्परापर्यंत मजबूत विटांच्या भिती बांधाव्यात. नाटचगृह उघडे न ठेवता त्याच्या चारी बाजू भितींनी बांधून काढाव्यात हे आयताकार नाटचमंडपाचे वर्णन

करताना सांगितलेले नाही. ही माहिती आता चौरसाकृती नाट्यमंडप कसा बांधावा हे सांगताना आलेली आहे व ही माहिती आयताकृती मंडपाला देखील उपयोगी आहे.

चौरस नाट्यमंडपाची निरनिराळ्या भागांत विभागणी खालीलप्रमाणे आहे. नाट्यमंडपाची लांबी व रुंदी ३२ × ३२ हात आहे. यातील प्रेक्षकगृह १६×३२ हातांचे व प्रेक्षागृह १६ × ३२ हातांचे असते. प्रेक्षागृहाचे आणखी सारखे दोन भाग होतात. रंगशीर्ष ८×३२ हातांचे व नेपथ्यगृह ८×३२ हातांचे. आकृती मध्ये चौरस मंडपाची अशी विभागणी दाखविली आहे.

कुंभकर्ण व विप्रदास यांच्या मतानेही चौरस नाट्यगृहाची मांडणी काहीशी वर दिलेल्या शंकुक इत्यादी टीकाकारांनी सांगितलेल्या मंडपासारखीच आहे. येथे मत्तवारणी तेवढ्या नाहीत; कारण या टीकाकारांच्या मते मत्तवारणीचा अर्थ लाकडी कठडा असा आहे.

शंकुक, भट्टलोल्लट, वार्तिककार तसेच अभिनवगुप्तचे गुरू भट्टतोत यांनी रंगमंडपाची विभागणी सारखीच केली आहे (आकृती ९). नेपथ्यगृह ३२ × ८ हात, रंगशीर्ष ३२ × ४ हात, रंगपीठ ८ × ८ हात व प्रेक्षकगृह ३२ × १२ हात अशी नाट्यमंडपाची विभागणी त्यांनी केली आहे. मत्तवारणी म्हणजे व्हरांडे नाट्यगृहाबाहेर आहेत. आकृती ९ मध्ये अभिनवगुप्तच्या मताने असलेली विभागणी, जी शंकुक इत्यादींनी केली त्याप्रमाणेच आहे, दाखविली आहे.

ज्या टीकाकारांच्या मते (मध्ययुगीन व अर्वाचीन) प्रेक्षागृहाची विभागणी रंगपीठ, रंगशीर्ष व नेपथ्यगृह अशा तीन भागांत होते त्यांच्या मते रंगपीठ ४ × ३२ हातांचे, रंगशीर्ष ४ × ३२ हातांचे व नेपथ्यगृह ८ × ३२ हातांचे असते (सुरेन्द्रनाथ दीक्षित १९७०, आकृती २). आता येथे रंगपीठ व रंगशीर्ष यांच्यात पडदा आला तर रंगपीठावर जेथे नाटक केले जाते ही अगदीच चिंचोळी लांबट जागा होते. ४ × ३२ हात हे रंगमंचाचे माप कोणालाही

योग्य व प्रमाणांत (proportionate) वाटणार नाही. तेव्हा रंगपीठ व रंगशीर्ष अशी नाट्यमंचाची दुभागणी नसावी असे या पुराव्यावरूनही वाटते.

भरतमुनींनी पुढे रंगपीठाचे माप ८×८ हात असे चौरस असावे असे म्हटले आहे ( ना. शा. २.९४ ) असे समजून$ इतर टीकाकारांनी नाट्यमंडपाची विभागणी निरनिराळ्या प्रकारे दिली आहे. केतकरांनी रंगपीठ तसेच रंगशीर्ष देखील ८ × ८ हाताचे दाखविले आहे. रंगपीठाच्या दोन्ही बाजूंना ८ × ८ हातांच्या मत्तवारणी दाखविल्या आहेत. येथे नाकापेक्षा मोती जड अशी परिस्थिती झाली आहे. ज्या रंगमंचावर नाटक करावयाचे तो झाला अगदी लहान आणि इतर गोष्टींनाच, ज्या भरतमुनींच्या मताने अस्तित्वातही नाहीत ( मत्तवारणी या खोल्या ), महत्त्व येऊन त्यांनी ऐसपैस जागा अडविली आहे. मत्तवारणी पुढच्या बाजूला, रंगपीठाच्या दोन्ही बाजूंना असल्याने रंगशीर्षालाही ८ × ८ हातांपेक्षा जास्त जागा देता आलेली नाही. मत्तवारणी या शब्दाचा चुकीचा अर्थ घेतल्यामुळे टीकाकाराला या सर्व अडचणी माहीत असूनही निराळी रंगमंचाची रचना करता आलेली नाही. ८ हात रुंद व १६ हात लांब असा प्रेक्षकांना खोल वाटेल असा रंगमंच येथे केतकरांनी दाखविला आहे. तो स्थापत्यशास्त्रदृष्ट्या योग्य वाटत नाही (आकृती ५).

मंकडांनी तर नेपथ्यगृह १२ × ३२ हातांचे, रंगशीर्ष ६ × ३२ हातांचे, रंगपीठ ८ × ८ हातांचे व मत्तवारणी १२ × १२ हातांच्या दाखविल्या आहेत ( आकृती १३ ).

चंद्रभान गुप्तांच्या मताने नेपथ्यगृह ४×३२ हात, रंगशीर्ष ८×८ किंवा ८×३२ हात, रंगपीठ ८×८ हात व रंगपीठाच्या दोन्ही बाजूंना ८×८ हातांच्या चौरस मत्तवारणी अशी प्रेक्षागृहाची विभागणी करावयास हवी. ( आकृती १६ )

मनमोहन घोष रंगशीर्ष व रंगपीठ हे एकाच अर्थाचे शब्द मानत असल्याने त्यांनी प्रेक्षागृहाची मांडणी जरा वेगळी दाखविली

---

$ या श्लोकाचा हा अर्थ कसा चुकीचा आहे ते पुढे दाखविले आहे.

आहे. मात्र मत्तवारणी म्हणजे व्हरांडे असाच अर्थ त्यांनीही केलेला असल्याने लेखकाच्या मते ही विभागणीही योग्य नाही. मनमोहन घोषांच्या मताने प्रेक्षकगृह २० × ३२ हात असते. प्रेक्षागृहांत ४ × ३२ नेपथ्यगृह व ८ × १६ हात रंगशीर्ष असते. त्याच्या दोन्ही बाजूंना ८ × ८ हातांच्या मत्तवारणी असतात. ( आकृती ३ )

सुब्बाराव यांनी प्रस्तुत लेखकाने नाटचमंडपाची जशी आखणी सांगितली आहे तशीच दिली आहे. ती म्हणजे ३२×१६ हातांचे प्रेक्षकगृह, ३२ × ८ हातांचे रंगशीर्ष व ३२ × ८ हातांचे नेपथ्यगृह (आकृती ४). सुब्बारावांच्या मताने मत्तवारणी ही अलंकरणार्थ असलेली माजलेल्या जेरबंद हत्तींची रांग रंगपीठाच्या उंचीवर




आकृती ९

चौरस नाटचगृह, चौरस व आयताकार मत्तवारणी – अभिनवगुप्त

दाखवितात तर प्रस्तुत लेखकाच्या मताने मत्तवारण हा रंगपीठाच्या कडेवर असलेला कठडा आहे. येवढाच या दोन्ही मतांत भेद आहे; त्याने नाट्यमंडपाच्या विभागणीत काही फरक पडत नाही.

### नाट्यमंडपातील खांबांची मांडणी

आता पुढला नाट्यमंडपाच्या बांधणीचा प्रमुख भाग म्हणजे त्यातील खांबांची रचना. प्रथम नाट्यमंडपाच्या चारी कोपऱ्यांना चार खांब रोवतात. आग्नेय कोणात ब्राह्मणस्तंभ, नैर्ऋत्य कोपऱ्यात क्षत्रियस्तंभ, वायव्य व ईशान्य कोणांत अनुक्रमे वैश्य व शूद्र स्तंभ असतात.

येथे एक गोष्ट स्पष्ट करावीशी वाटते, की नाट्यगृहाच्या चारी बाजूंना भिंत असूनही, भिंतींत असलेले असे चार खांब चारी कोपऱ्यांत सांगितले आहेत त्याअर्थी मंडपाच्या छप्पराचा भार खांब तोलून धरतात, भिंती नव्हेत. खांब 'धारिणीधारणाः' असे असावेत असेही भरतमुनी म्हणतात. तेव्हा भरतमुनींनी सांगितलेल्या खांबांपैकी काही खांब भिंतीतही असू शकतात. भरतमुनींनी दिलेली खांबांची रचना व कार्य यावरून त्या वेळी नाट्यमण्डप चौकटीच्या ( frame structure ) पद्धतीने बांधत असे दिसते. आधुनिक काळी जसे काँक्रीटचे खांब व तुळया यांनी वास्तूचे वजन तोलून धरले जाते, तशाच पद्धतीने लाकडी खांब व तुळया वापरून भरतमुनिकाळी वास्तू बांधत असतील. हीच घरे बांधावयाची पद्धत मध्ययुगीन शिल्पशास्त्राच्या ग्रंथांत दिलेली आहे.

मत्तवारणी हा कठडा प्रेक्षकगृह व प्रेक्षागृह यांच्या बरोबर, लांबीच्या दृष्टीने, मध्यभागी येतो. मत्तवारणीला चार खांब असतात. यांतील दोन खांब भिंतीत असून, उरलेले दोन खांब या खांबांपासून आठ हात अंतरावर असतात. या दोन खांबांमधील अंतर १६ हात असते. तेव्हा खांबांच्या अडथळ्याशिवाय १६ हात लांब व ८ हात रुंद येवढी रंगशीर्षाला जागा मिळते. भरतमुनींनी रंगपीठावर आणखी दहा खांब असावेत असे म्हटले आहे ( ना. शा. २·८९–८९½ ). नंतर प्रेक्षकगृहातील प्रेक्षकांच्या बसण्याची व्यवस्था कशी




अ




ब




क

**आकृती १० – भरतमुनींच्या मताने खांबांची योजना**

असावी ते सांगून येथे सहा खांब असावेत असे ते म्हणतात ( ना. शा. २.९२ ). पुन्हा त्यांच्या बाहेर ( तेषामुपरि ) आणखी आठ खांबांची योजना करावी असा आदेश दिला आहे ( ना. शा. २.९३ ). चौरस नाट्यगृहात याप्रमाणे केलेली खांबांची मांडणी आकृती १० ब मध्ये दिली आहे.

येथे एकंदर ३२ खांब दाखविले आहेत. लाकडी बांधकामाच्या दृष्टीने इतके खांब कमीत कमी आवश्यक आहेत. येथे प्रेक्षागृहातील खांबांमधील कमीत कमी अंतर आठ हात व जास्तीत जास्त १६ हात आहे. प्रेक्षकगृहातील खांबांमधील कमीत कमी अंतर चार हात व जास्तीत जास्त १६ हात आहे. प्रेक्षागृहात अ आ इ आणि ई हे चार खांब जास्त दिल्यास तेथील व प्रेक्षकगृहातील खांबांची संख्या सारखीच होते. ही खांबांची रचना सममिती अक्षाचा नियम पाळणारी, तर्कशुद्ध व स्थापत्यशास्त्रानुसारी आहे. भरतमुनिकाळी असेच नाट्यमंडप बांधत असतील. किंबहुना भरतमुनींनी नाट्यगृह पाहून त्या प्रमाणे वर्णन केले असावे असेही म्हणता येण्याइतपत ही खांबांची मांडणी शास्त्रशुद्ध आहे.

खांबांची अशीच रचना आयताकार व त्र्यश्र मंडपांत असणार. ती मांडणी आकृती १० अ व क मध्ये दिली आहे.




१ शंकुकमत २ ( भट्टलोल्लटादी ) अन्यमत

आकृती ११ – चौरस मंडप, खांबांची मांडणी




३ वार्तिककारमत




४ भट्टतोतमत

आकृती ११ – चौरस मंडप, खांबांची मांडणी

शंकुक, भट्टलोल्लट, वार्तिककार व भट्टतोत यांच्या मताने असलेली खांबांची रचना आकृती ११ मध्ये दिली आहे.(३४)

येथे एक लक्षात घ्यावयास पाहिजे, कीं शंकुकादी टीकाकारांनी चारी बाजूच्या भिंतीत कोठेच खांब दाखविले नाहीत. ह्यामुळे त्यांनी दिलेल्या खांबांची रंगपीठावर व प्रेक्षकगृहात नुसती गर्दी उडून गेली आहे. नाटक प्रेक्षकांपेक्षा खांबच बघत असावेत असे वाटण्या इतकी त्यांची गर्दी झाली आहे. शिवाय खांबांची ही मांडणी स्थापत्यशास्त्रदृष्टया योग्य नाही.

मध्ययुगीन टीकाकारांत कुंभकर्ण व विप्रदास यांनी दिलेली खांबांची मांडणी सारखीच आहे व ती अशी (आकृती १२) –



आकृती १२
कुंभमताने खांबाची योजना

खांब १ ते ४ हे ब्राह्मणादी चार खांब उपदिशांना आहेत. खांब १ व २ म्हणजे ब्राह्मण व क्षत्रिय स्तंभ यांच्या ६४ हात लांबीत

(येथे वर्णन विकृष्ट मंडपातील खांबांचे आहे) आठ हात अंतरावर खांब ५ ते ११ असे सात खांब आहेत. तसेच वैश्य व शूद्र या खांबांच्या मध्ये आठ हात अंतरावर सात खांब ठेवावेत (१२ ते १८). नंतर पूर्व व पश्चिम बाजूंना (अनुक्रमे शूद्र व ब्राह्मण स्तंभांच्या मध्ये व क्षत्रिय आणि वैश्य स्तंभांच्या मध्ये) प्रत्येकी चार खांब ठेवावेत (१९ ते २२ व २३ ते २६). त्यांच्यातील अंतर पुन्हा आठच हात ठेवावे. अर्थात हा हिशेब चूक आहे. चार खांबांनी पश्चिमेकडील (तसेच पूर्वेकडील) भागाचे पाच भाग होतात हे भान टीकाकाराला राहिलेले नाही. तेव्हा पूर्व व पश्चिम बाजू मिळून एकूण आठ खांब आहेत. नाट्यमंडपाच्या भितीतील हे २६ खांब आहेत. नाट्यमंडपाच्या मधल्या भागात प्रत्येकी चार खांबांच्या सात रांगा असाव्यात. हे २८ खांब (२७ ते ५४) होतात. एकूण खांबांची संख्या ५४ होते. चौरस नाट्यमंडपात खांबांची मांडणी अशीच असून संख्या ३८ असते.

खांबांची वर दिलेली मांडणी भरतमतापेक्षा वेगळी आहे. येथे हे लक्षात घ्यावयास हवे, की खांबांची संख्या भरतमुनींनी दिलेल्या ३२ या संख्येवरून ५४ वर, जवळ जवळ दुप्पटीवर गेल्याने रंगमंचावर तसेच प्रेक्षकगृहात खांबांचे अडथळे जास्त झालेत. प्रेक्षकांना प्रेक्षकगृहातील बहुसंख्य खांब आडवे येणार व रंगमंचावरील नाटक व्यवस्थित दिसणार नाही. रंगमंचावरील खांबांमधील अंतर फक्त ६ व ४ हात आहे. भरतमुनींनी मात्र वास्तूच्या स्थैर्यास जेवढे खांब आवश्यक आहेत तेवढेच दिले आहेत. टीकाकारांस हा पोच राहिलेला दिसत नाही. कदाचित ते कवी, पंडित असावेत. नाट्यमंडपाचे संपूर्ण ज्ञान असणारे शिल्पशास्त्री नसावेत.

केतकरांनी चौरस नाट्यगृहाच्या खांबांची रचना दिली आहे ती योग्य वाटत नाही (आकृती ५). मंकड व याज्ञिक यांनी दिलेली खांबांची मांडणी आकृती १३ व १४ त दिली आहे. ती काहीशी केतकरांनी दिल्याप्रमाणेच आहे. सुब्बाराव (आकृती ४) यांनी दिलेली मांडणी यथायोग्य आहे व ती प्रस्तुत लेखकाने दिलेल्या




अ आयताकार नाटयमंडप




ब : चौरस नाटयमंडप




क : त्रिकोणी नाटयमंडप

आकृती १३ – मंकड यांच्या मताने नाटयमंडप

खांबांच्या रचनेशी मिळतीजुळती आहे. केतकर वगैरे आधुनिक विद्वानांच्या बाबतीतही ते शिल्पशास्त्री नसून केवळ विद्वान असल्याने




आयताकार मंडप
आकृती १४ – याज्ञिक

त्यांना खांबांची मांडणी नीट समजली नसावी किंवा नाट्यमंडपाचा हा भाग तेवढासा महत्त्वाचा वाटला नसावा; किंवा असेही वाटते की त्यांनी या बाबतीत स्वतंत्रपणे विचार न करता अभिनवगुप्तच्या टीकेवरून त्यांची मांडणी दिलेली दिसते.

**नाट्यमंडपातील दरवाजांची संख्या व स्थान.**

दरवाजांची संख्या व स्थान याबाबतीत भरतमुनी काय म्हणतात ते पाहू. आयताकृती नाट्यमंडपाचे वर्णन करताना रंगशीर्ष व नेपथ्यगृह यांना विभागणाऱ्या भिंतीत ( लाकडी पडद्यास ) दोन दारे असावीत असे म्हटले आहे (ना. शा. २.६९ ). येथे याहून जास्त माहिती दिली नसली तरी नेपथ्यगृहात बाहेरून प्रवेश करण्यासाठी नाट्यगृहाच्या पश्चिमेकडील भिंतीत एक दार असावे.

त्रिकोणी मंडपाच्या वर्णनात या दाराचा उल्लेख आला आहे (ना. शा. २. १०३). एक दार प्रेक्षकांना प्रेक्षकगृहात प्रवेश करण्याकरिता पूर्वेकडील भिंतीत असावे. चौरस मंडपाच्या बाबतीत या दाराची योजना पूर्वेकडील भिंतीत केलेली आहे (ना. शा. २.९७). तेव्हा आयताकार मंडपासाठीही या दाराचे स्थान पूर्वेकडील भिंतीत असावे. आयताकार मंडपात अशी चार दरवाजांची योजना असते.

चौरस नाट्यमंडपाच्या बाबतीत नेपथ्यगृहातून रंगशीर्षावर प्रवेश करण्यासाठी एक दार असावे (ना. शा. २.९६ ) असे म्हटले आहे. तेव्हा आयताकार मंडपाप्रमाणे येथे नेपथ्यगृहातून रंगशीर्षावर प्रवेश करण्यासाठी दोन दारे नसून एकच दार आहे. कदाचित आयताकार मंडपात होणाऱ्या नाटकातील पात्रांची संख्या जास्त असल्याने ( १६ नायकांचे ' डिम ' नाटक) तेथे दोन दारांची योजना केली असावी. दुसरे दार रंगपीठाकडे तोंड केलेले असे प्रेक्षकगृहात प्रेक्षकांना येण्यासाठी पूर्वेकडील भिंतीत ठेवावे. उत्तर व दक्षिणेकडील भिंतीत दारे नाहीत, तेथे कदाचित खिडक्या ठेवीत असतील. एक दार बाहेरून नेपथ्यगृहात येण्यासाठीही असेल. अशा रीतीने चौरसाकृती मंडपात फक्त तीनच दारे ठेवावयास सांगितली आहेत. त्रिकोणी मंडपातही तीनच दारे व ती चौरस मंडपात दिलेल्या स्थानी ठेवावीत असे म्हटले आहे.

प्रेक्षकांना प्रेक्षकगृहात प्रवेश करण्यासाठी पूर्वदिशेकडील भिंतीत असलेले दार हे नाट्यमंडपाच्या अधिष्ठानाच्या वर आठ हात उंचीवर आहे ( आकृती ८ पहा ). तेव्हा नाट्यमंडपाच्या बाहेरच्या बाजूस पुन्हा एक जिना असावयास हवा. पण त्याबद्दल भरतमुनी काही बोलत नाहीत. हा दरवाजा अधिष्ठानावर असणार नाही हे नक्की. यापेक्षा रंगपीठ व प्रेक्षकांची बसावयाची बैठक यांच्यामध्ये जी आठ हातांची जागा सोडलेली आहे तेथे, उत्तरेकडील भिंतीत हे दार असणे अधिक सोयीचे झाले असते.

अभिनवगुप्तच्या मताने नेपथ्यगृहातून रंगशीर्षावर येण्यासाठी नाट्यगृहाचा आकार कसाही असला तरी दोन दारे असावीत. चौरस

व त्रिकोणी नाटचमंडपात सांगितल्याप्रमाणे येथे एकच दार नसते (आकृती १०).

कुंभकर्ण (१.१.९७–९८) व विप्रदास यांच्या मताने बाहेरून नेपथ्यगृहात, नेपथ्यगृहातून रंगशीर्षावर येण्यासाठी व प्रेक्षकगृहात प्रवेश करण्यासाठी अशी तीनच दारे असावीत. ही सर्व दारे आठ हात रुंदीची असावीत असी जास्त माहिती विप्रदास देतात.

केतकरांच्या मताने नाटचमंडपाला एकंदर पाच दारे असतात. दोन दारे नेपथ्यगृहातून रंगशीर्षावर यावयास व आणखी दोन दारे रंगशीर्षाच्या उत्तर व दक्षिण बाजूंस, मत्तवारणींच्या मनोऱ्यांतून रंगशीर्षावर येण्यासाठी अशी चार दारे प्रेक्षागृहात असतात. पाचवे दार पूर्वेकडील भिंतीत प्रेक्षकांना प्रेक्षकगृहात येण्यासाठी असते. केतकरांनी रंगशीर्षाच्या उत्तर–दक्षिण बाजूंना प्रत्येकी एक अशी दोन दारे असतात याला अध्याय १३ व्यातील खालील श्लोकांचा पुरावा दिला आहे–

**द्विधा क्रिया भवत्यासां रङ्गपीठ परिक्रमे ।**
**प्रदक्षिण प्रवेशा च तथा चैवाप्रदक्षिणा ॥ ५२ ॥**

**आवन्ती दाक्षिणात्या च प्रदक्षिणा पीठक्रमे ।**
**अपसव्य प्रवेशा तु पाञ्चाली चौड्रमागधी ॥ ५३ ॥**

**आवन्त्यां दाक्षिणात्यायां पार्श्वद्वारमथोत्तरम् ।**
**पाञ्चाल्यां औड्रमागध्यां योग्यं द्वारं तु दक्षिणम् ॥ ५४ ॥**

केतकर वरील श्लोकांचा अर्थ लावतात, 'पात्राने प्रथम नेपथ्यगृहात वेषभूषा करावयाची नंतर नेपथ्यगृहाच्या दारातून बाहेर पडावयाचे व रंगशीर्षाच्या डाव्याउजव्या बाजूंस असलेल्या दारांनी प्रवेश करावयाचा. आवन्ति व दाक्षिणात्य लोकांनी उत्तर दाराने प्रवेश करावा व दक्षिणद्वाराने बाहेर जावे. पांचाली व औड्र मागधी लोकांनी दक्षिण दाराने प्रवेश करावा व उत्तर दाराने बाहेर पडावे'.

या श्लोकांचा अर्थ विश्वेश्वर असा करतात, की आवन्ती तसेच दाक्षिणात्य लोकांनी उत्तरद्वाराने प्रवेश करून उत्तर द्वारानेच

बाहेर जावे. पाञ्चाली तसेच औड् मागधी लोकांनी दक्षिण द्वाराने प्रवेश करून दक्षिण दारानेच बाहेर जावे. हे सांगून पुढे ते म्हणतात की नेपथ्यगृहातून रंगपीठावर प्रवेश करण्यासाठी पात्रांसाठी दोन दारे असतात. असे वाटते की नेपथ्यगृह व रंगशीर्ष यांना विभागणाऱ्या भिंतीत ( लाकडी पडद्याला ) दोन दारे आहेत. ती दारे उजवी–डावीकडे किंवा उत्तर व दक्षिण दिशेकडे आहेत असे म्हणावयाचे. या दोन दारांहून जास्त दारे रंगशीर्षावर येण्यासाठी भरतमुनींच्या मताने नाहीत.




आयताकार नाट्यगृह
आकृती १५ – पिशारोटी

पिशारोटी नेपथ्यगृहातून रंगशीर्षावर येण्यासाठी दोन दारे दारे दाखवितात, व प्रेक्षकगृहाला एक नसून तीन दारे, पूर्व, उत्तर व दक्षिण दिशांना दाखवितात ( आकृती १५ ). मंकड व याज्ञिक यांनी दारांची योजना पेशारोटी यांनी दाखविली त्याप्रमाणे दिली

आहे (आकृती १३ व १४). चंद्रभानगुप्तांनी नेपथ्यगृह व रंगशीर्ष यांना दुभागणाऱ्या भिंतीत तीन दरवाजे दाखविले आहेत. मत्तवारणीतून रंगपीठावर येण्यासाठी दोन दरवाजे व प्रेक्षकगृहात येण्यासाठी पूर्वेकडील भिंतीत एक दार अशी एकूण सहा दारे दाखविली आहेत (आकृती १६). आधुनिक विद्वानांनी दिलेली दारांची संख्या व स्थाने ही भरतमुनिमतानुसारी नाहीत हे उघड आहे.




अ : आयताकार नाट्यमंडप

आकृती १६ – चंद्रभान गुप्ता

### प्रेक्षकांची बैठक

प्रेक्षकगृहात प्रेक्षकांना बसावयाची योजना भरतमुनी खालीलप्रमाणे सांगतात. प्रेक्षकगृह विटा व लाकडी फळ्या यांनी करावे (ना. शा, २.९०½). प्रेक्षकांना बसावयाची आसने एक हात उंचीची व एक हात रुंदीची अशी जिन्याच्या पायऱ्यांप्रमाणे वर वर चढत

जातील अशी असावीत. प्रेक्षकांची तोंडे रंगपीठाकडे येतील अशी आसनांची मांडणी करावी ( ना. शा. २.९१–९१½ ). प्रेक्षकांची आसनव्यवस्था व रंगपीठ यांत आठ हातांचे अंतर असावे व प्रेक्षकांच्या पीठाची उंची आठ हात असावी ( ना. शा. २.९० ). चौरस नाट्यमंडपात प्रेक्षकगृह ३२ हात लांब व १६ हात रुंद आहे. प्रेक्षकांची आसने रंगपीठापासून आठ हात सोडून सुरू होतात. तेव्हा प्रेक्षकांची बसावयाची जागा ३२ हात लांब व ८ हात रुंद झाली. आसनाची उंची एक हात व रुंदीही एक हात आहे; तेव्हा या जागेत या मापाच्या आठ पायऱ्या बसतात व त्यांची उंची आठ हात होते.




ब : चौरस नाट्यमंडप

क : त्रिकोणी नाट्यमंडप

आकृती १६ – चंद्रभान गुप्ता




आकृती १७ – प्रेक्षकांच्या बैठकीची रचना (भट)

रंगपीठ हे जमिनीलगत (अधिष्ठानाच्या) किंवा काहींच्या मताने १½ हात उंच आहे असे कसेही असले तरी प्रेक्षकांच्या आसनांच्या मानाने ते खालीच असणार (आकृती ८). भटांनी रंगपीठ १½ हात उंच असते व प्रेक्षकगृहांतील आसने जमिनीपासून सुरू होऊन जिन्याच्या पायऱ्यांप्रमाणे त्यांतील शेवटच्या आसनाची उंची रंग-पीठाच्या उंचीइतकीच असते असे म्हटले आहे व तशी आकृतीही दाखविली आहे (आकृती १७). ही मांडणी योग्य वाटत नाही. दीड हात म्हणजे ३६ अंगुले. या उंचीची आठ पायऱ्यांत विभागणी केल्यास प्रत्येक पायरी फक्त ४½ अंगुले किंवा ८½ सें. मी. उंचीची होईल. अशी पायरी बसण्यास सुविधाजनक होणार नाही हे स्पष्ट आहे.

**वेदिकेसारखे रंगपीठ**

रंगपीठ आठ हात रुंद असते व त्याचे थरविभाग वेदिके-प्रमाणे असतात (ना. शा. २.९८). बहुतेक आधुनिक विद्वान वेदिकेचा अर्थ व्हरांडा असा करतात असे भट(१७) म्हणतात. त्यांच्या मताने रंगपीठाच्या भोवती जर व्हरांडा बांधला तर मग रंगपीठाच्या दोन्ही बाजूंना असलेल्या मत्तवारणी ह्या व्हरांड्यांचे काय? त्यांच्या मते रंगपीठाच्या सभोवताली पायरीप्रमाणे रंगपीठा-पेक्षा कमी उंचीचा असा भाग बांधतात व त्यास वेदिका म्हणतात. किंवा रंगपीठ हे सुंदर वेदीप्रमाणे, जिच्यावर होमहवन करतात त्या वेदीप्रमाणे, बांधावे. त्यांनी दिलेला तिसरा पर्याय म्हणजे वेदिकेचा अर्थ कठडा (railing) असा करून तो रंगपीठाच्या दोन किंवा तीन बाजूंभोवती असतो व त्याच्या पलीकडे मत्तवारणी हे व्हरांडे असतात.

वेदीप्रमाणे रंगपीठाचे थरविभाग असावेत असा येथे वेदी-प्रमाणे रंगपीठ अलंकारावे याचा खरा अर्थ आहे. काश्यपशिल्पम् या शिल्पशास्त्राच्या पुस्तकात वेदिकेचे थरविभाग दिले आहेत. (आकृती १८). रंगपीठाचे थरविभाग त्याप्रमाणे असावेत.

**समुन्नत व समतल रंगशीर्ष**




आकृती १८ – वेदिकेचे थरविभाग
काश्यपशिल्प १०.८–१०

श्लोक २.१०० मध्ये आयताकार मंडपांतील रंगशीर्ष समुन्नत व चौरसमंडपातील रंगशीर्ष समतल असावे असे म्हटले आहे. मंकड, विश्वेश्वर इत्यादी आधुनिक विद्वानांनी रंगमंचाचे रंगशीर्ष व रंगपीठ असे दोन भाग का पडतात हे दाखविण्यासाठी या श्लोकाचा आधार घेतला आहे. त्यांचे म्हणणे थोडक्यात असे, की विकृष्ट मंडपाचे रंगशीर्ष समुन्नत, उंच व चौरस मंडपातील रंगशीर्ष समतल असते; पण उंच अथवा समतल हे कशाच्या तुलनेने तर त्यांच्या म्हणण्याप्रमाणे रंगपीठाच्या तुलनेने आणि म्हणून रंगमंचाचे रंगपीठ व रंगशीर्ष असे दोन भाग होतात. हा मुद्दा योग्य वाटत नाही. आपटे यांच्या संस्कृत–इंग्लिश कोशात समुन्नत, उन्नत याचा याचा एक अर्थ चढता ( rising, ascending ) असाही दिला आहे. प्रस्तुत लेखकाला असे वाटते, की रंगशीर्ष हा रंगपीठाचा पृष्ठभाग असून आयताकृती नाटचमंडपातील रंगशीर्ष प्रेक्षकगृहाकडून नेपथ्यगृहाकडे चढते बांधावे व चौरसाकृती नाटचमंडपातील रंगशीर्ष समतल बांधावे असा या श्लोकाचा अर्थ आहे. आयताकृती नाटचमंडपात पात्रांची संख्या फार असते. देवदानवांची युद्धे, ‘ डिम ’ प्रकारची १६ नायक असलेली नाटके इत्यादी या रंगशीर्षावर दाखवितात. सरासरी रंगमंचावर नटांची एकच रांग असते. नट एका पाठीमागे एक असे क्वचितच उभे राहतात; कारण मागचा नट पुढच्या नटामागे झाकला जाईल. पण पात्रांची संख्या जास्त झाल्यास काही नटांना पुढे उभे असलेल्या नटांच्या मागे उभे राहणे अपरिहार्य होते. अशा वेळेला प्रेक्षकांना सर्व नट दिसण्यासाठी रंगमंचाची मागील बाजू पुढल्या

बाजूपेक्षा उंच पाहिजे व त्या अर्थी भरतमुनी विकृष्ट नाटयमंडपात रंगशीर्ष चढते असावे व चौरस नाटयमंडपात जेथे नाटकात पात्रांची येवढी गर्दी नसते तेथे रंगशीर्ष समतल असावे असे म्हणतात.

**नाटयमंडपाचे छप्पर**

भरतमुनी नाटयमंडपाच्या छप्पराबद्दल फारशी माहिती देत नाहीत. पाव श्लोकात त्यांनी हा भाग आटोपला आहे. कार्यःशैलगुहाकारो ( ना. शा. २.७९½ ) असे छप्पराचे वर्णन त्यांनी केले आहे. डोंगरातील गुहेत आवाज घुमतो, त्या आवाजाला ' अनुरणन ' असते व तसा आवाज नटांच्या बोलण्याने, स्वरमेळाने, निर्माण व्हावयास हवा व त्यासाठी डोंगरातील गुहेच्या आकाराप्रमाणे म्हणजे मध्यभागी सपाट व कडांना (चारी बाजूंना) उतरता गोलाकार असा आकार नाटयमंडपाच्या छप्पराला द्यावा. नाटयमंडपाची उंची दोन मजली मंडपाइतकी असावी असेही भरतमुनी म्हणतात. वर्णनावरून बौद्ध लेण्यांतील चैत्यगृहांची आठवण येते. त्यांची उंची खूप असते व छप्पर डोंगरातील गुहेसारखेच असते. नाटयमंडप आतून दिसावयास या चैत्यगृहाप्रमाणे असावा.

या विधानास काहीसा बळकटी आणणारा पुरावा म्हणजे खांबांची रचना देखील चैत्यगृहातील खांबांप्रमाणेच सांगितली आहे. भिंत व खांबांची रांग यांत थोडे अंतर व खांबांच्या दोन रांगांत जास्त अंतर; शिवाय खांबांचे वर्णन करताना ते ' धारणीधारणाः ' ( ना. शा. २.९५ ) असे आडव्या तुळईचे वजन तोलून धरू शकतील असे असावेत असे म्हटले आहे. खांबांच्यावर येणारी ( दक्षिणोत्तर ) तुळई ती धारणी. या तुळयांवर ( पूर्वपश्चिम ) तुळया (तुला) असतात. त्यांवर पुन्हा दक्षिणोत्तर लाकडे जवळजवळ ठेवलेली असतात. त्यांच्या मधले अंतर लाकडी फळया टाकून निच्छिद्र कडीपाटाचे छप्पर करतात.

विप्रदासांच्या मताने छप्पर करण्यासाठी खांबावरती आडव्या व उभ्या तुळया अशा बसवितात, की त्याच्यामुळे ४० कोष्ठ तयार होतात. त्यावर पुन्हा आडवी लाकडे कमी अंतरावर ठेवतात व या

लाकडांमध्ये फळ्या टाकून निच्छिद्र छप्पर करतात. त्यावर निम्बाची पाने, विटा व त्यावर माती टाकून ती खूप धुमसून मजबूत करावी व असे खालून कडीपाटाचे व वरून धाब्याचे छप्पर तयार करावे.




सभाकार मंडप
आकृती १९

वरील वर्णनावरून नाट्यगृहाचे छप्पर कसे असावे याची कल्पना येते. छप्पराची दुसरी रचना आकृती १९ मध्ये दिली आहे. या मंडपास सभाकारमंडप म्हणतात. फोटो २ वरून या प्रकारच्या छप्पराची अधिक चांगली कल्पना येईल. भरतमतानुसार बांधलेले नाट्यगृह कसे दिसत असेल याची कल्पना आकृती २० व २१ वरून येऊ शकेल.

## सारांश

भरताच्या नाट्यमंडपाची रचना प्रस्तुत लेखकाच्या मताने कशी आहे ते येथे सारांशाने सांगतो.

१. नाट्यमंडपाचे आकाराप्रमाणे आयताकार, चौरस व त्रिकोणाकृती असे तीन प्रकार होतात. त्यांचे प्रत्येकी मापांप्रमाणे ज्येष्ठ, मध्यम व कनिष्ठ असे तीन प्रकार आहेत. ज्येष्ठ मंडपाचे माप १०८ हात, मध्यम मंडपांचे ६४ हात व कनिष्ठ मंडपाचे माप ३२ हात असते. मंडपाचे असे एकूण नऊ प्रकार आहेत.

२. मंडपाची मापे हातात सांगितली असली तरी ते माप दण्ड प्रमाणात (१ दण्ड = ४ हात) आहे.



फोटो २ – सभाकार नाट्यमंडप



आकृती २० : नाट्यमंडपाच्या छप्पराचा आतून देखावा.

( पर्सी ब्राउन यांच्या ' Indian Architecture ' मधील आकृत्यांवरून, प्रकाशकांच्या परवानगीने. )

म. रा. सा. स. म. ग्रंथालय
ग्रंथालय



आकृती २१ : नाटयमंडपाच्या छप्पराचा बाहेरील देखावा.
( पर्सी ब्राउन यांच्या ' Indian Architecture ' मधील आकृत्यांवरून, प्रकाशकांच्या परवानगीने. )

३. नाटचमंडपाचे प्रेक्षकगृह व प्रेक्षागृह हे दोन समान आकाराचे, मापाचे प्रमुख भाग आहेत. प्रेक्षागृहाचे नेपथ्यगृह व रंगशीर्ष असे पुन्हा दोन समान आकाराचे व मापाचे दोन उपविभाग होतात. रंगपीठाचा पृष्ठभाग म्हणजे रंगशीर्ष. रंगशीर्षास रंगपीठाहून निराळी जागा लागत नाही.

४. मत्तवारण(णी) हा व्हरांडा किंवा बाजूच्या लहान खोल्या (wings) नसून रंगपीठाच्या वर प्रेक्षकांच्या बाजूकडील रंगशीर्षाच्या कडेला दीड हातांचा चार खांब असलेला लाकडी कठडा असतो.

५. षड्दारुक म्हणजे लाकडी पडदा (partition wall).

६. सर्व नाटचमंडप अधिष्ठानावर उभा असतो. रंगपीठ अधिष्ठानाहून उंच असते. रंगपीठापासून आठ हात अंतर सोडून प्रेक्षकांचे आसनपीठ सुरू होते. चौरस नाटचमंडपात ते ३२ हात लांब व आठ हात रुंद असते. शेवटची पायरी अधिष्ठानापासून आठ हात उंचीवर असते.

७. नाटचगृहाची उंची दोन मजली मंडपाइतकी असते. त्यात कोठेही प्रेक्षागृहात अथवा प्रेक्षकगृहात दुसरा मजला नसतो.

८. चौरस नाटचगृहात रंगशीर्ष आयताकृती ३२ हात लांब व आठ हात रुंद असते. आठ हात लांबीरुंदीचे चौरस नसते.

९. खांबांची रचना आकृती १० मध्ये दाखविल्याप्रमाणे असते. काही खांब भिंतीत देखील असतात. भिंती नाटचगृहाच्या छप्पराचे वजन तोलून धरीत नाहीत. ते काम खांब व त्यांच्यावर असलेल्या तुळया यांच्या चौकटींनी (frame structure) केले जाते.

१०. दारांची संख्या आयताकृती नाटचमंडपात चार व चौरस आणि त्रिकोणी मंडपांत तीन असते.

११. आयताकृती नाटचमंडपात रंगशीर्ष नेपथ्यगृहांकडून प्रेक्षकगृहाकडे उतरते बांधलेले असते. चौरस नाटचगृहात रंगशीर्ष समतल असते. चौरस नाटचगृहातील रंगपीठाचे थरविभाग वेदिकेच्या थरविभागाप्रमाणे असावेत.

१२. बौद्ध लेण्यांतील चैत्यगृहाप्रमाणे नाटचमंडपाची उंची दोन मजली असते व छप्पर मध्यभागी कडीपाटाचे व बाजूंना गोलाकार उतरते असे असावे. खांबांची रचना चैत्यगृहांतील खांबांच्या मांडणीसारखीच असावी.

## संदर्भग्रंथसूची

१) ईशानशिवगुरुदेवमिश्र (१९२२), "**ईशानशिवगुरुदेवपद्धति**" (क्रियापाद), संपादक– म. म. गणपतिशास्त्री, त्रिवेंदम संस्कृत सिरिज क्र. ७७.

२) उपाध्याय, गंगाप्रसाद (१९६७), "**शतपथब्राह्मणम्**", हिंदी भाषांतर, प्रकाशक– The Research Institute of Ancient Scientific Studies, New Delhi.

३) कवी, एम्. रामकृष्ण (१९५१), "**भरतकोश**", प्रकाशक– श्रीवेंकटेश ओरिएन्टल इन्स्टिटयूट, तिरुपति.

४) काश्यप (१९१९), "**काश्यपशिल्पम्**" संपादक कृष्णराय वझे, आनंदाश्रम संस्कृत ग्रंथावलि क्र. ९५.

५) कुंभकर्ण (१९५७), "**नृत्यरत्नकोश**" (भाग १), संपादक र. छो. परिख, डॉ. प्रियबाला शहा, प्रकाशक राजस्थान पुरातत्वान्वेषण मंदिर.

६) केतकर, गो. वा. (१९२८), "**भारतीय नाटचशास्त्र.**"

७) गंगाधर (१९७०), "**शिल्प दीपक**", प्रकाशक महादेव रामचंद्र जागुष्टे, अहमदाबाद.

८) गुप्ता, चंद्रभान (१९५४), "*The Indian Theatre*" मोतीलाल बनारसीदास, वाराणसी.

९) घोष, मनमोहन (१९५०) "*The Nāṭyaśāstra*" इंग्रजी भाषांतर, रॉयल एशियाटिक सोसायटी ऑफ बंगाल, कलकत्ता.

१०) जोशी, लक्ष्मणशास्त्री (१९७२), "**वैदिक संस्कृतीचा विकास**" प्राज्ञपाठशाळा मंडळ, वाई, सातारा.

११) दिवेकर, ह. रा. (१९६१), "*Mattavāraṇī*" जर्नल ऑफ द ओरिएन्टल इन्स्टिटयूट ऑफ बडोदा, भाग– १०.

१२) दीक्षित, सुरेंद्रनाथ (१९७०), "**भरत और भारतीय नाटचकला.**"

१३) नाईक, बापुराव. "**नाटक**" मासिक, नोव्हेंबर १९५९ ते १९६०, मार्च ते जून १९५९ संपादक शं. ना. अंधटकर, नाशिक.

१४) नारद (१९२०), "**संगीतमकरन्द**", संपादक मं. रा. तेलंग, गायकवाड ओरिएन्टल सिरिज क्र. १६.

१५) पिशारोटी, के. आर. (१९४१), " *South Indian Theatre* " सर अन्नमलाई चेट्टियर कमोमोरेशन व्हाल्युम.

१६) बोधायन (१९६८), " शुल्बसूत्र "; इंग्लिश भाषांतर जी. थीबो, प्राचीन वैज्ञानिकाध्ययन अनुसंधान, नवी दिल्ली.

१७) भट, जी. के. (१९७५), " भरत नाट्यमञ्जरी " ; भांडारकर प्राच्य विद्या संशोधन संस्था, पुणे.

१८) भरतमुनी (१९५६), " (अभिनव गुप्तच्या विवृत्तीसह) नाट्यशास्त्र ", गायकवाड ओरिएन्टल सिरिज क्र. ३६, भाग १, दुसरे संस्करण.

१९) भुवनदेवाचार्य (१९५०), " अपराजितपृच्छा " ; गायकवाड ओरिएन्टल सिरिज क्र. ११५.

२०) भोज (१९६६), " समरांगण सूत्रधार " ; गायकवाड ओरिएन्टल सिरिज क्र. २५.

२१) मयमुनी (१९१९), " मयमत "; त्रिवेन्द्रम संस्कृत सिरिज क्र. ६५.

२२) मल्लनिकुल (१९०२), " परिमाण मंजरी " ; महादेव रामचंद्र जागुष्टे, अहमदाबाद.

२३) महापात्र रामचंद्र (१९६५), " शिल्पप्रकाश " ; एलिसबोनर, सदाशिव रमशर्मा, इ. जे. ब्रिल, नेदलँड्स्.

२४) मानव (१९५९), " शुल्बसूत्र " ; फॉन गेल्डर जॅनेट एम्. फॉन, मानवश्रौतसूत्रे, शतपिटक सिरिज क्र. १७, इंटरनॅशनल अॅकॅडमी ऑफ इंडियन कल्चर, दिल्ली.

२५) मंकड, डी. आर. (१९५०), "*Ancient Indian Theatre*" पुस्तक *The Theatre of Hindus* सुशिला गुप्ता लि. कलकत्ता.

२६) मंडन (१९४८), "प्रासादमंडन' कलकत्ता संस्कृत सिरिज क्र. ३२.

२७) मंडन (१९६५), " राजवल्लभ " महादेव रामचंद्र जागुष्टे, अहमदाबाद.

२८) याज्ञिक, आर. के. ( १९३३ ) "*The Indian Theatre*", जॉर्ज अॅलन आणि कं. लंडन.

२९) राघवन्, व्ही. (१९५०), " *Theatre Architecture in Ancient India* ", पुस्तक *The Theatre of Hindus*, सुशिला गुप्ता लि. कलकत्ता.

३०) वराहमिहिर (१९५९), " बृहत्संहिता " चौखम्बा विद्याभवन, वाराणसी.

३१) विप्रदास (१९५१), " संगीत चंद्र ", पुस्तक ' भरत कोश ', रामचंद्र कवी. पृ. ३२०.

३२) विश्वकर्मा (१९५८), "विश्वकर्मवास्तुशास्त्र"; प्रकाशक तंजावर सरस्वती महाल सिरिज क्र. ८५

३३) विश्वकर्मा, "विश्वकर्मीय रथशास्त्र" हस्तलिखित, भारतीय इतिहास संशोधन मंडळ, पुणे.

३४) विश्वेश्वर सिद्धान्त शिरोमणि (१९६०), "हिन्दी अभिनव भारती" १, २ व ६ वा अध्याय, प्रकाशक हिन्दी विभाग, दिल्ली विश्व-विद्यालय, दिल्ली.

३५) व्यास, द्वैपायन (१९००), "अग्निपुराण"; आनंदाश्रम संस्कृत ग्रंथावलि क. ४१.

३६) व्यास, द्वैपायन (१९०७), "मत्स्यपुराण"; आनंदाश्रम संस्कृत ग्रंथावलि क्र. ५४.

३७) व्यास, द्वैपायन (१९१२), "विष्णुधर्मोत्तरपुराण" प्रकाशक खेमराज कृष्णदास, मुंबई.

३८) शारदातनय (१९३०), "भावप्रकाशन", संपादक रामस्वामी शास्त्री शिरोमणि, गायकवाड ओरिएन्टल सिरिज क्र. ४५

३९) श्रीकुमार (१९२९), "शिल्परत्न" (पूर्वो भाग:); त्रिवेन्द्रम् संस्कृत सिरिज.

४०) श्रीनारायण (१९४५), "तंत्रसमुच्चय" संपादक बी. ए. रामस्वामीशास्त्री, अनन्तशयन संस्कृत ग्रंथावलि क्र. १५१.

४१) सुब्बाराव, डी. (१९५६); "*A critical survey of ancient Indian theatre in accordance with the second chapter of Bharata Nātyaśāstra*" *Appendix 6*, गायकवाड ओरिएन्टल सिरिज क्र. ३६, भाग १.

४२) सेनापती, जाय (१९६५), "नृत्तरत्नावली"; संपादक ए. ए. रामनाथन् व आर. के. पार्थसारथी, मद्रास गव्हर्नमेंट ओरिएन्टल सिरिज क्र. १०७.

४३) हम्मीर (१९५१), "शृंगारहार"; पुस्तक 'भरतकोश', संपादक रामकृष्ण कवी, पृ. ८६९.

४४) (१९४६), "मानसार", संपादक प्रसन्नकुमार आचार्य ४७, १-१७, पान ३०८-३०९.

४५) (१९१३), "वास्तुविद्या"; श्रीचित्रोदय मंजरी क्र. ३१.

४६) (१९५१), "संगीतनारायण" पुस्तक भरतकोश, संपादक रामकृष्ण कवी, पृ. ८६९.

४७) (१९५२), "हयशीर्ष पंचरात्र"; संपादक भुवनमोहन सांख्यतीर्थ, प्रकाशक नरेंद्र रिसर्च सोसायटी, राजशाही, पूर्व बंगाल.

■

# भरतमुनिप्रणीतं नाट्यशास्त्रम्

## श्रीः

## अथ द्वितीयोऽध्यायः

अध्याय दुसरा

**भरतस्य वचः श्रुत्वा प्रपच्छुर्मुनयस्ततः ।**
**भगवन् श्रोतुमिच्छामो यजनं रङ्गसंश्रयम् ॥ १ ॥**

भरत(मुनीं)चे बोलणे ऐकल्यानंतर ऋषींनी विचारले, "भगवन्, नाट्यमण्डपाच्या ( पूजेसाठी ) करावयाच्या यज्ञाची माहिती आम्ही ऐकू इच्छितो. ( १ )

**अथ वा याः क्रियास्तत्र लक्षणं यच्च पूजनम् ।**
**भविष्यद्भिर्नरैः कार्यं कथं तन्नाट्यवेश्मनि ॥ २ ॥**

किंबहुना नाट्यगृह कसे बांधावे, त्याची लक्षणे व त्याची पूजा ही भावी मानवांनी कशी करावी (ते आम्ही ऐकू इच्छितो.) (२)

**इहादिर्नाट्ययोगस्य नाट्यमण्डप एव हि ।**
**तस्मात्तस्यैव तावत्त्वं लक्षणं वक्तुमर्हसि ॥ ३ ॥**

( या भूलोकी ) येथे नाट्यशास्त्राची तसेच नाट्यगृहाची प्रथम उत्पत्ती झाली असल्याने त्यांचीच लक्षणे तुम्ही सांगावीत." ( ३ )

**तेषां तु वचनं श्रुत्वा मुनीनां भरतोऽब्रवीत् ।**
**लक्षणं पूजनं चैव श्रूयतां नाट्यवेश्मनः ॥ ४ ॥**

त्या ऋषींचे (वरील) बोलणे ऐकून भरत (मुनी) म्हणाले, "नाट्यगृहाचे लक्षण व पूजा ( विधी ) तुम्ही ऐकावीत. ( ४ )

**दिव्यानां मानसी सृष्टिर्गृहेषूपवनेषु च ।**
**नराणां यत्नतः कार्या लक्षणाभिहिता क्रिया ॥ ५ ॥**

देवांची सृष्टी ( जग ) तसेच त्यांची घरे व उद्याने ही मनानेच निर्माण होतात. (याउलट) मानवाला (प्रत्येक गोष्ट) प्रयत्नाने घडवावी लागते व त्यासाठी जी क्रिया करावयाची अभिप्रेत असेल तिची लक्षणे माहिती असणे आवश्यक असते. ( ५ )

**श्रूयतां तद्यथा यत्र कर्तव्यो नाट्यमण्डपः।**
**तस्य वास्तु च पूजा च यथा योज्या प्रयत्नतः ॥ ६ ॥**

तेव्हां नाट्यगृह कोठे व कसे बांधावयाचे, त्याची वास्तू (त्यासाठी लागणारे द्रव्य) व पूजा ही प्रयत्नपूर्वक कशी करावीत ते ऐका. (६)

**इह प्रेक्षागृहं दृष्ट्वा धीमता विश्वकर्मणा।**
**त्रिविधः सन्निवेशश्च शास्त्रतः परिकल्पितः ॥ ७ ॥**

बुद्धिमान विश्वकर्म्याने प्रेक्षागृह व प्रेक्षकगृह यांचे (इतर मंडपांपेक्षा निराळे) कार्य लक्षात घेऊन त्यांचे शास्त्रपूत असे तीन प्रकार सांगितले आहेत. (७)

[ प्रेक्षागृह नेपथ्य व रंगमंच मिळून होते. सन्निवेश म्हणजे जेथे प्रेक्षक बसतात ते स्थळ. येथल्याप्रमाणेच श्लोक २.६६ मध्ये 'प्रेक्षकाणां निवेशनम्' असा प्रेक्षकांच्या बसण्याच्या जागेचा रंगमंचाहून वेगळा उल्लेख आहे. येथेही प्रेक्षागृह व सन्निवेश असे नाट्यमण्डपाचे दोन प्रमुख भाग सांगितले आहेत. भरताने इतरत्र प्रेक्षागृह म्हणजे संपूर्ण नाट्यमंडप अशा अर्थीही हा शब्द वापरला आहे ( श्लोक २.१२, २.२१). ]

**विकृष्टश्चतुरश्रश्च त्र्यश्रश्चैव तु मण्डपः।**
**तेषां त्रीणि प्रमाणानि ज्येष्ठं मध्यं तथाऽवरम् ॥ ८ ॥**

मंडप आयताकार, चौरस व (त्रिकोणी) तीन बाजूंचा (या आकारांचा) असतो. त्यांचे (प्रत्येकी) तीन (निरनिराळ्या) मापांप्रमाणे ज्येष्ठ, मध्यम व कनिष्ठ असे प्रकार होतात. (८)

[ चतुरश्र याचा अर्थ चौकोन असा होतो येथे 'समचतुरश्र' म्हणजे चौरस असा अर्थ केला आहे. श्लोक २.८६ तसेच २.८८ पाहावेत. ]

**प्रमाणमेषां निर्दिष्टं हस्तदण्डसमाश्रयम् ॥**
**शतं चाष्टौ चतुःषष्टिर्हस्ता द्वात्रिंशदेव च ॥ ९ ॥**

त्यांची (मण्डपांची) दिलेलीमापे ही दण्ड हा हात समजून दिलेली आहेत. १०८, ६४ व ३२ हात ही ती मापे होत. (९)

**अष्टाधिकं शतं ज्येष्ठं चतुःषष्टिस्तु मध्यमम् ।**
**कनीयस्तु तथा वेश्म हस्ता द्वात्रिंशदिष्यते ॥ १० ॥**

१०८ हातांचा मंडप ज्येष्ठ ६४ हातांचा मध्यम व कनिष्ठ प्रकारचा मंडप ३२ हातांचा असावा. (१०)

[ येथे हात म्हणजे दण्डाचे माप. ]

**देवानां तु भवेज्जेष्ठं नृपाणां मध्यमं भवेत् ।**
**शेषाणां प्रकृतीनां तु कनीयः संविधीयते ॥ ११ ॥**

देवांकरिता ज्येष्ठ प्रकारचा (मंडप) असावा. राजांसाठी मध्यम (मापाचा मंडप) असावा. इतर सामान्य प्रजाजनांसाठी कनिष्ठ प्रकारचा (मंडप) सांगितला जातो. (११)

**प्रमाणं यच्च निर्दिष्टं लक्षणं विश्वकर्मणा ।**
**प्रेक्षागृहाणां सर्वेषां तच्चैव हि निबोधत ॥ १२ ॥**

विश्वकर्म्याने सर्व प्रकारच्या नाटचगृहांसाठी जी मापे निर्देशिली आहेत, त्या मापांची लक्षणे व परस्पर प्रमाण ऐकावे. (१२)

**अणू रजश्च वालश्च लिक्षा यूका यवस्तथा ।**
**अङ्गुलं च तथा हस्तो दण्डश्चैव प्रकीर्तितः ॥ १३ ॥**

अणू, रज, वाल, लिक्षा, यूका (ऊ) तसेच यव, अंगुल, आणि त्याचप्रमाणे हात व दण्ड ही मापे सांगितली आहेत. (१३)

**अणवोऽष्टौ रजः प्रोक्तं तान्यष्टौ वाल उच्यते ।**
**वालास्त्वष्टौ भवेल्लिक्षा यूका लिक्षाष्टकं भवेत् ॥ १४ ॥**

आठ अणूंचा एक रज सांगतात. आठ रज मिळून एक वाल होतो. आठ वालांनी लिक्षा होते व आठ लिक्षांनी यूका होते. (१४)

[ रज म्हणजे धुळीचा कण. वाल म्हणजे केस (केसाचे अग्र). लिक्षेला मराठीत लीखा म्हणतात व यूका म्हणजे ऊ. असे अणू या सूक्ष्म मापापासून ऊच्या मापापर्यंत परस्पर प्रमाण दिले आहे.]

**यूकास्त्वष्टौ यवो ज्ञेयो यवास्त्वष्टौ तथाङ्गुलम् ।**
**अङ्गुलानि तथा हस्तश्चतुर्विंशतिरुच्यते ॥ १५ ॥**

आठ यूकांचा यव जाणावा तसेच आठ यवांनी एक अंगुल होतो. २४ अंगुलांचा एक हात सांगतात. (१५)

**चतुर्हस्तो भवेद्दण्डो निर्दिष्टस्तु प्रमाणतः ।**
**अननैव प्रमाणेन वक्ष्याम्येषां विनिर्णयम् ॥ १६ ॥**

चार हातांचा दण्ड होतो. हे माप प्रमाण म्हणून दिले आहे. याच परिमाणाने यांची (निरनिराळ्या मंडपांची) मापे मी सांगणार आहे. (१६)

[ या श्लोकात मण्डपाची मापे दण्डप्रमाणात आहेत हे स्पष्ट केले आहे. दण्ड या मापानेच (अनेन एव) मापे देत आहे असे स्पष्ट म्हटले आहे. तसेच हाताच्या मापाने (१ हात=२४ अं. या मापाने) जर मंडपाचे माप घ्यावयाचे तर दण्डाचे माप द्यावयाचे काहीच कारण नव्हते. तेव्हा श्लोक २.९ मध्ये दिलेल्या हस्तदण्डप्रमाणतः याचा अर्थ दंड या हाताच्या मापाने मंडपाचे माप घ्यावे असाच होतो.]

**चतुःषष्टिकरान्कुर्याद्दीर्घत्वेन तु मण्डपम् ।**
**द्वात्रिंशतं च विस्तारान्मर्त्यानां यो भवेदिह ॥ १७ ॥**

येथील मर्त्य मानवांसाठी असलेल्या मंडपाची लांबी ६४ हात व रुंदी ३२ हात असावी. (१७)

[ हे आयताकृती श्रेष्ठ मध्यम मंडपाचे माप सांगितले. ]

**अत ऊर्ध्वं न कर्तव्यः कर्तृभिर्नाटयमण्डपः ।**
**यस्मादव्यक्तभावं हि तत्र नाट्यं व्रजेदिति ॥ १८ ॥**

नाटयमंडप बांधणाऱ्याने याहून मोठ्या (मापाचा) मंडप करू नये, कारण (तसे केल्यास) नाटयातील भावाभिव्यक्ती अस्पष्ट होत जाते. (१८)

**मण्डपे विप्रकृष्टे तु पाठ्यमुच्चारितस्वरम् ।**
**अनिस्सरणधर्मत्वाद्विस्वरत्वं भृशं व्रजेत् ॥ १९ ॥**

(वर दिलेल्या मापापेक्षा) जास्त लांबीचा मंडप असल्यास उच्चारिलेल्या शब्दाच्या स्वराचा प्रतिध्वनी निर्माण झाल्याने स्वर तत्काळ विकृत होतो. (१९)

**यश्चाप्यास्यगतो भावो नानादृष्टिसमन्वितः ।**
**स वेश्मनः प्रकृष्टत्वाद्व्रजेदव्यक्ततां पराम् ॥ २० ॥**

निरनिराळ्या दृष्टिक्षेपांसह (नटाच्या) चेहऱ्यावर जे (बदलते) भाव असतात, ते नाटयमंडप जास्त लांबीचा असल्यास पूर्णपणे दिसतनासे होतात. (२०)

**प्रेक्षागृहाणां सर्वेषां तस्मान्मध्यममिष्यते ।**
**यावत्पाठ्यं च गेयं च तत्र श्रव्यतरं भवेत् ॥ २१ ॥**

तेव्हा सर्व आकारांच्या नाटचमंडपांचे मध्यम प्रमाणाचे माप योग्य असते. त्यामुळे जे जे म्हटले आहे व गायले गेले आहे, ते ते चांगले ऐकावयास मिळते. ( २१ )

[ आयत, चौरस व त्रिकोणी या तिन्ही आकारांच्या मंडपांचे मध्यम माप योग्य समजतात. यावरूनही या तिन्ही आकारांच्या मंडपांचे मापांच्या दृष्टीने उत्तम, मध्यम व कनिष्ठ असे तीन प्रकार होतात. नाटचमंडपाचे असे एकंदर आकारांमुळे व मापांमुळे नऊ प्रकार होतात. ]

**देवानां मानसी सृष्टिर्गृहेषूपवनेषु च ।**
**यत्नभावाभिनिष्पन्नाः सर्वे भावा हि मानुषाः ॥ २२ ॥**

देवांची सृष्टी (जग) म्हणजेच त्यांची घरे व उद्याने ही मनानेच (मनोमात्रेकरून) निर्माण होतात. (याउलट) मानवाच्या सर्व भावांची अभिव्यक्ती प्रयत्नानेच निर्माण होऊ शकते. (२२).

[देव जड सृष्टी देखील मनोबलाने तयार करू शकतात. उलट, मानवाला निरनिराळचा भावना, ज्या मनाच्याच स्थिती असतात त्यादेखील व्यक्त करताना प्रयत्न करावा लागतो.]

**तस्माद्देवकृतैर्भावैर्न विस्पर्धेत मानुषः ।**
**मानुषस्य तु गेहस्य सम्प्रवक्ष्यामि लक्षणम् ॥ २३ ॥**

तेव्हा मानवाने देवांनी जे केवळ मनानेच निर्माण केले आहे तसे निर्माण करण्याची स्पर्धा करू नये. मानवांसाठी असणाऱ्या घराची (नाटचगृहाची) लक्षणे मी आता सांगतो. ( २३ ).

**भूमेर्विभागं पूर्वं तु परीक्षेत प्रयोजकः ।**
**ततो वास्तुप्रमाणेन प्रारभेत शुभेच्छया ॥ २४ ॥**

नाटचमंडप बांधणाऱ्याने प्रथम जमिनीच्या त्या भागाची ( जेथे नाटचमंडप बांधावयाचा आहे तेथील ) परीक्षा करावी. नंतर शुभ व्हावे अशा इच्छेने ( योग्य ) त्या मापाची वास्तू उभारावयास आरंभ करावा. ( २४ )

**समा स्थिरा तु कठिना कृष्णा गौरी च या भवेत्।**
**भूमिस्तत्रैव कर्तव्यः कर्तृभिर्नाट्यमण्डपः ॥ २५ ॥**

(जमिनीची परीक्षा करून ती) समतल, स्थैर्ययुक्त, मजबूत अशी असल्यास ती काळी किंवा पांढरी जशी असेल तशी ती जागा नाट्यमंडपासाठी बांधणाऱ्याने निवडावी. (२५)

**प्रथमं शोधनं कृत्वा लाङ्गलेन समुत्कृषेत्।**
**अस्थिकीलकपालानि तृणगुल्मांश्च शोधयेत् ॥ २६ ॥**

पहिल्यांदा जमिनीचे शुद्धीकरण करावे. (नंतर) ती नांगराने खणून काढावी. तिच्यावरील हाडे, लाकडाचे तुकडे, कवटया तसेच गवत व मुळे ही काढून जमीन शुद्ध करावी. (२६)

[कोठलीही वास्तू उभारावयाची तर अगोदर तिची आखणी करावयास हवी. आखणीच्या अगोदर ती जमीन नांगरून तेथे सात दिवस गाईंचा वास असतो. जमीन नांगरावयाच्या अगोदर भूत प्रेत पिशाच यांना बळी दिला जातो. 'अस्त्राय फट्' या मंत्राने उच्चाटन केले जाते व नंतर शिवमन्त्र म्हणून नांगरावयास सुरुवात करतात. नांगरणीच्या अगोदर जो हा विधी केला जातो, त्यास जमिनीच्या शुद्धीकरणाचा विधी म्हणतात.]

**शोधयित्वा वसुमतीं प्रमाणं निर्दिशेत्ततः।**
**पुष्यनक्षत्रयोगेन शुक्लं सूत्रं प्रसारयेत् ॥ २७ ॥**

जमिनीचे शुद्धीकरण करून नंतर (वास्तूची) सांगितलेल्या मापाप्रमाणे आखणी पुष्यनक्षत्री करावी. त्यासाठी पांढरी दोरी वापरावी. (२७)

**कार्पासं बाल्बजं वापि मौञ्जं वाल्कलमेव च।**
**सूत्रं बुधैस्तु कर्तव्यं यस्य च्छेदो न विद्यते ॥ २८ ॥**

शहाण्या (सूत्रधाराने) कापसाची, बल्बज किंवा मुंज नावाच्या गवताची आणि वल्कलांची (झाडांच्या सालींची) दोरी वापरावी. (वापरतांना ताणल्यावर) ती तुटता कामा नये. (२८)

**अर्धच्छिन्ने भवेत्सूत्रे स्वामिनो मरणं ध्रुवम् ।**
**त्रिभागच्छिन्नया रज्ज्वा राष्ट्रकोपो विधीयते ॥ २९ ॥**

दोरी मध्यभागी तुटली तर ( नाटयमंडपाच्या ) मालकाचा नक्कीच मृत्यू ओढवतो. दोरी तीन भागांत तुटली तर राष्ट्राचा ( राजाचा ) राग ओढवतो. ( २९ )

[ राष्ट्रकोप याचा अर्थ राज्यात, प्रजेत उपद्रव होईल असाही करता येईल. ]

**छिन्नायां तु चतुर्भागे प्रयोक्तुर्नाश उच्यते ।**
**हस्तात्प्रभ्रष्टया वापि कश्चित्त्वपचयो भवेत् ॥ ३० ॥**

चार भागांत दोरी तुटली तर ( नाटयमंडप ) बांधणाऱ्याचा नाश होतो असे सांगतात. ( दोरी ) हातातून निसटली तर (वास्तूची) काहीतरी पडझड होईल. ( ३० )

**तस्मान्नित्यं प्रयत्नेन रज्जुग्रहणमिष्यते ।**
**कार्यं चैव प्रयत्नेन मानं नाट्यगृहस्य तु ॥ ३१ ॥**

तेव्हा दोरी नेहमीच प्रयत्नपूर्वक हाताळावी; तसेच नाटय-मंडपाचे मापदेखील प्रयत्नाने अचूक घ्यावे. ( ३१ )

**मुहूर्तेनानुकूलेन तिथ्या सुकरणेन च ।**
**ब्राह्मणांस्तर्पयित्वा तु पुण्याहं वाचयेत्तथा ॥ ३२ ॥**

( नाटयमंडपाच्या कर्त्यास ) अनुकूल अशी तिथी असलेल्या दिवशी व ( त्या दिवसाच्या ) शुभ करणाच्या मुहूर्ताला ब्राह्मणांना तृप्त करून नंतर पुण्याहवाचन करावे. ( ३२ )

[ दिवसाचे ११ भाग करून त्यांतील प्रत्येक भागाला करण म्हणतात. तेव्हा दिवसांच्या या ११ करणांत जे करण शुभ असेल त्यावेळचा मुहूर्त धरावा. ]

**शान्तितोयं ततो दत्त्वा ततः सूत्रं प्रसारयेत् ।**
**चतुष्षष्टिकरान् कृत्वा द्विधा कुर्यात् पुनश्च तान् ॥ ३३ ॥**

शान्तिकारक पाणी त्यानंतर शिंपडून नंतर ( आखणीसाठी ) दोरी ताणावी. ६४ हात माप घेऊन त्याचे पुन्हा दोन भाग करावेत. ( ३३ )

[ ६४ हात हे आयताकृती मंडपाचे लांबीचे माप. तिचे प्रत्येकी ३२ हातांचे दोन भाग करावेत. ]

**पृष्ठतो यो भवेद्भागो द्विधाभूतस्य तस्य तु ।**
**सममर्धविभागेन रंगशीर्षं प्रकल्पयेत् ॥ ३४ ॥**

( या दोन भागांपैकी ) मागच्या बाजूचा जो भाग त्याचे दोन विभाग करावेत. त्यांतील निम्या भागाने रंगशीर्षाची कल्पना करावी. (३४).

[ नाटचमंडपाची लांबी पूर्वपश्चिम असेल तर पश्चिमेकडील ३२ हातांचा जो भाग त्याचे प्रत्येकी १६ हातांचे पुन्हा दोन विभाग करावयाचे. या दोन भागांपैकी पूर्वेकडील जो भाग, त्याला रंगशीर्ष म्हणतात. ]

**पश्चिमे च विभागेऽथ नेपथ्यगृहमादिशेत् ।**
**विभज्य भागान्विधिवद्यथावदनुपूर्वशः ॥ ३५ ॥**

पश्चिमेकडील ( पाठीमागील ) विभाग हा नेपथ्यगृहासाठी ठेवावा असा नियम आहे. पूर्वेकडून सुरुवात करून यथायोग्य विधीने ( नाटचमंडपाची ) निरनिराळचा भागांत विभागणी करावी. ( ३५ )

[ नाटचमंडपाचे ३२ × ३२ मापाचे दोन भाग करावयाचे. त्यांतील पूर्वेकडील भाग प्रेक्षकगृह व पश्चिमेकडील भाग प्रेक्षा-गृहासाठी असतो. प्रेक्षागृहाचे पुन्हा दोन विभाग पाडावयाचे ३२ × १६ हातांचे. त्यांतील पश्चिमेकडील भागांत नेपथ्यगृह असावे व पूर्वेकडील भागात रंगशीर्षाची योजना करावी. ]

**शुभे नक्षत्रयोगे च मण्डपस्य निवेशनम् ।**
**शङ्खदुन्दुभिनिर्घोषैर्मृदङ्गपणवादिभिः ॥ ३६ ॥**
**सर्वातोद्यैः प्रणुदितैः स्थापनं कार्यमेव तु । ३६½ ।**

शुभ नक्षत्रीं व योगकाली मण्डपाची पायाभरणी करावी. शंख, नगारे, मृदंग, पणव इत्यादी सर्व प्रकारच्या वाद्यांच्या घोषात व त्यांचा आवाज निनादत असताना स्थापनाचे कार्य करावे. ( ३६, ३६½ )

[ चंद्र व सूर्य यांच्या भ्रमणांची बेरीज ८०० कला झाली की एक योग होतो. असे एकंदर २७ योग आहेत. सूर्याची मध्यमगती दररोज ५९ कला ८ विकला आहे व चंद्राची मध्यमगती दररोज ७९० कला ३५ विकला आहे. या योगांची नावे दिली आहेत. त्यांच्या नावासारखीच त्यांची फळे असतात.

**विष्कम्भः प्रीतिरायुष्मान् सौभाग्यः शोभनस्तथा ।**
**अतिगण्डः सुकर्मा च धृतिः शूलस्तथैव च ॥**
**गण्डो वृद्धिर्ध्रुवश्चैव व्याघातो हर्षणस्तथा ।**
**वज्रं सिद्धिर्व्यतीपातो वरीयान् परिघः शिवः ॥**
**सिद्धः साध्यः शुभः शुक्लो ब्रह्मैन्द्रो वैधृतिस्तथा । ]**

**उत्सार्याणि त्वनिष्टानि पाषण्ड्याश्रमिणस्तथा ॥ ३७ ॥**
**काषायवसनाश्चैव विकलाश्चैव ये नराः । ३७½ ।**

त्यावेळेला पाखण्डी, जैन साधू, भगवी वस्त्रे धारण केलेले ( संन्यासी ) व रोगजर्जर अशा अनिष्टप्रद माणसांना तेथून हाकून द्यावे. ( ३७, ३७½ )

**निशायां च बलिः कार्यो नानाभोजनसंयुतः ॥ ३८ ॥**
**गन्धपुष्पफलोपेतो दिशो दश समाश्रितः । ३८½ ।**

रात्रीच्या वेळी निरनिराळ्या खाद्यपदार्थांनी युक्त असा व गन्ध, फुले व फळे यांच्यासह असलेला बळी दाही दिशांना द्यावा. (३८, ३८½)

**पूर्वेण शुक्लान्नयुतो नीलान्नो दक्षिणेन च ॥ ३९ ॥**
**पश्चिमेन बलिः पीतो रक्तश्चेवोत्तरेण तु । ३९½ ।**

पूर्व दिशेकडे ( द्यावयाचा बळी ) पांढऱ्या रंगाच्या अन्नाचा व दक्षिणेकडे (द्यावयाचा बळी) निळ्या रंगाच्या अन्नाचा असावा. पश्चिमेकडे पिवळ्या रंगाच्या व उत्तरेकडे तांबड्या रंगाच्या (अन्नाचा) बळी द्यावा. ( ३९, ३९½ )

**यादृशं दिशि यस्यां तु दैवतं परिकल्पितम् ॥ ४० ॥**
**तादृशस्तत्र दातव्यो बलिर्मन्त्रपुरस्कृतः । ४०½ ।**

ज्या दिशेला ज्या दैवताची कल्पना केली असेल तेथे ( त्या दिशेला ) त्या ( दैवताप्रमाणे ) मन्त्रपूत बली द्यावा. ( ४०, ४०½ )

[ उरलेल्या उपदिशा व ऊर्ध्व आणि अधः या सहा दिशांना द्यावयाच्या बलींची माहिती दिलेली नाही, ती वरील सामान्य कल्पना देऊन पुरी केली आहे. ]

**स्थापने ब्राह्मणेभ्यश्च दातव्यं घृतपायसम् ॥ ४१ ॥**

**मधुपर्कस्तथा राज्ञे कर्तृभ्यश्च गुडौदनम् । ४१½ ।**

स्थापनक्रियेच्या वेळी ब्राह्मणांना तूप व पायस खावयास द्यावे; राजाला मधुपर्क द्यावा व कारागिरांना गूळ घातलेला भात खावयास द्यावा. ( ४१, ४१½ )

**नक्षत्रेण तु कर्तव्यं मूलेन स्थापनं बुधैः ॥ ४२ ॥**

**मुहूर्तेनानुकूलेन तिथ्या सुकरणेन च ।**

**एवं तु स्थापनं कृत्वा भित्तिकर्म प्रयोजयेत् ॥ ४३ ॥**

शहाण्या माणसांनी स्थापनक्रिया ( पायाभरणी ) मूळ नक्षत्री करावी. ( नाट्यमंडपाच्या मालकाला ) अनुकूल अशा तिथीला व चांगले करण असलेल्या मुहूर्ताला अशा रीतीने स्थापना केल्यावर ( पायाची ) भिंत बांधावयास सुरुवात करावी. ( ४२, ४३ )

**भित्तिकर्मणि निर्वृत्ते स्तम्भानां स्थापनं ततः ।**

**तिथिनक्षत्रयोगेन शुभेन करणेन च ॥ ४४ ॥**

( पायाची ) भिंत बांधून झाल्यानंतर शुभकारक करण असेल अशा तिथीला, नक्षत्राला व योगकाली खांबांची स्थापना करावी. ( ४४ )

**स्तम्भानां स्थापनं कार्यं रोहिण्या श्रवणेन वा ।**

**आचार्येण सुयुक्तेन त्रिरात्रोपोषितेन च ॥ ४५ ॥**

**स्तम्भानां स्थापनं कार्यं प्राप्ते सूर्योदये शुभे । ४५½ ।**

रोहिणी किंवा श्रवण नक्षत्री खांबांची स्थापना करावी. तीन रात्री उपोषण केले आहे अशा अधिकारी आचार्याकरवी शुभ अशा सूर्योदयाच्या वेळेला खांबांच्या स्थापनेचे काम करावे ( ४५, ४५½ ).

**प्रथमे ब्राह्मणस्तम्भे सर्पिस्सर्षपसंस्कृतः ॥ ४६ ॥**

**सर्वशुक्लो विधिः कार्यो दद्यात्पायसमेव च । ४६½ ।**

पहिल्या ब्राह्मणस्तंभाच्या (स्थापनेच्या वेळी) तुपात मिसळ-

लेल्या (पांढऱ्या) मोहरीचा (नैवेद्य) दाखवावा. येथील सर्व विधी (गंध, उटणी, वस्त्र व नैवेद्य ही) पांढऱ्या रंगाचा असावा. त्या वेळेला (ब्राह्मणांना) पायस (खावयास) द्यावेत. (४६, ४६½).

**ततश्च क्षत्रियस्तम्भे वस्त्रमाल्यानुलेपनम् ॥ ४७ ॥**
**सर्वं रक्तं प्रदातव्यं द्विजेभ्यश्च गुडौदनम् । ४७½ ।**

त्यानंतर क्षत्रियस्तंभाला वस्त्र लेववून, गंध व उटणी लावावीत. ही सर्व (व नैवेद्यदेखील) तांबड्या रंगाची असावीत. (त्या वेळेस) ब्राह्मणांना गूळभात द्यावा. (४७, ४७½).

**वैश्यस्तम्भे विधिः कार्यो दिग्भागे पश्चिमोत्तरे ॥ ४८ ॥**
**सर्वं पीतं प्रदातव्यं द्विजेभ्यश्च घृतौदनम् । ४८½ ।**

पश्चिमोत्तर दिशेला (वायव्य कोपऱ्यात) वैश्यस्तंभ (रोवताना) करावयाचा विधी पूर्णपणे पिवळ्या रंगात करावा. (वस्त्र, गंध, उटणी, नैवेद्य ही पिवळ्या रंगाची द्यावीत.). ब्राह्मणांना तूपभात (खावयास) द्यावा. (४८, ४८½).

**शूद्रस्तम्भे विधिः कार्यः सम्यक्पूर्वोत्तराश्रये ॥ ४९ ॥**
**नीलप्रायं प्रयत्नेन कृसरं च द्विजाशनम् । ४९½ ।**

पूर्वोत्तर (ईशान्य) दिशेकडील शूद्रस्तंभ (रोवताना) करावयाचा विधी (वस्त्र, गंध, उटणी व नैवेद्य ही सर्व) प्रयत्नपूर्वक निळ्या रंगाचा करावा. ब्राह्मणांना (निळ्या रंगाचा) तीळभात द्यावा. (४९, ४९½).

**पूर्वोक्त ब्राह्मणस्तंभे शुक्लमाल्यानुलेपने ॥ ५० ॥**
**निक्षिपेत्कनकं मूले कर्णाभरणसंश्रयम् । ५०½ ।**

वर उल्लेखिलेल्या ब्राह्मणस्तंभास पांढऱ्या रंगाचे गंध व उटणी लावावी. त्याच्या मुळापाशी सोन्याचे कर्णफूल ठेवावे. (५०, ५०½).

**ताम्रं चाधः प्रदातव्यं स्तम्भे क्षत्रियसंज्ञके ॥ ५१ ॥**
**वैश्यस्तम्भस्य मूले तु रजतं सम्प्रदापयेत् ।**
**शूद्रस्तम्भस्य मूले तु दद्यादायसमेव च ॥ ५२ ॥**

क्षत्रिय नांवाच्या खांबाच्या खाली तांब्याचे (कर्णफूल) ठेवावे.

वैश्यस्तंभाच्या मूळाखाली चांदीचे ( कर्णफूल ) ठेवावे. शूद्रस्तंभाच्या मूळाखाली लोखंडाचे ( कर्णफूल ) ठेवावे. ( ५१, ५२ ).

**सर्वेष्वेव तु निक्षेप्यं स्तम्भमूलेषु काञ्चनम् ।**
**स्वस्तिपुण्याहघोषेण जयशब्देन चैव हि ॥ ५३ ॥**
**स्तम्भानां स्थापनं कार्यं पुष्पमालापुरस्कृतम् । ५३½ ।**

या सर्व खांबांच्या मुळापाशी सोनेदेखील ठेवावे. फुलांच्या माळा घालून नंतर शुभाशिर्वाचक पुण्याहवाचनाच्या व जयजयकाराच्या घोषात खांबांची स्थापना करावी. ( ५३, ५३½ )

**रत्नदानैः सगोदानैर्वस्त्रदानैरनल्पकैः ॥ ५४ ॥**
**ब्राह्मणांस्तर्पयित्वा तु स्तम्भानुत्थापयेत् तथा । ५४½ ।**

भरपूर रत्ने व गाईसह वस्त्रे यांचे दान करून ब्राह्मणांना संतुष्ट करावे व नंतर खांब उचलून रोवावेत. ( ५४, ५४½ )

**अचलं चाप्यकम्पश्च तथैवावलितं पुनः ॥ ५५ ॥**
**स्तम्भस्योत्थापने सम्यग्दोषा ह्येते प्रकीर्तिताः । ५५½ ।**

खांब त्यांच्या स्थानांपासून ढळणार नाहीत, कंप पावणार नाहीत तसेच स्वतःभोवती फिरणार नाहीत (अशी काळजी घेऊन खांब रोवावेत ). कारण खांबांच्या स्थापनेचे हे सर्व दोष सांगितले आहेत. ( ५५, ५५½ )

**अवृष्टिरुक्ता चलने वलने मृत्युतो भयम् ॥ ५६ ॥**
**कम्पने परचक्रात्तु भयं भवति दारुणम् ।**
**दोषैरेतैर्विहीनं तु स्तम्भमुत्थापयेच्छिवम् ॥ ५७ ॥**

खांबाच्या स्वस्थानापासून ढळण्याने दुष्काळाची आपत्ती ओढवते व स्वतःभोवती फिरण्याने ( मालकाच्या ) मृत्यूचे भय असते. खांब जर कंप पावला, तर भयंकर अशा परराजाच्या स्वारीचे भय असते. तेव्हा हे दोष टाळून शुभ अशा खांबांची स्थापना करावी. (५६,५७ ).

**पवित्रे ब्राह्मणस्तम्भे दातव्या दक्षिणा च गौः ।**
**शेषाणां भोजनं कार्यं स्थापने कर्तृसंश्रयम् ॥ ५८ ॥**

पवित्र ब्राह्मणस्तंभाकरिता दक्षिणा व गाय दान म्हणून द्यावी.

इतर (खांबां-)साठी त्यांच्या स्थापनेकरीता काम करणाऱ्या सगळ्यांना जेवण घालावे. (५८).

**मन्त्रपूतं च तद्देयं नाट्याचार्येण धीमता।**
**पुरोहितं नृपं चैव भोजयेन्मधुपायसैः ॥ ५९ ॥**

बुद्धिमान नाट्याचार्याने हे जेवण मन्त्र म्हणून पवित्र करावे. पुरोहित व राजा यांनाही मध व पायस ह्यांचे भोजन घालावे. (५९)

**कर्तॄनपि तथा सर्वान्कृसरां लवणोत्तराम् ।**
**सर्वमेवं विधिं कृत्वा सर्वतोद्यैः प्रवादितैः ॥ ६० ॥**
**अभिमन्त्र्य यथान्यायं स्तम्भानुत्थापयेच्छुचिः ।**
**'यथाऽचलो गिरिर्मेरुर्हिमवांश्च महाबलः ॥ ६१ ॥**
**जयावहो नरेन्द्रस्य तथा त्वमचलो भव'। ६१½ ।**

